रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९ । अंक ९४ । पृष्ठे ८+४ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

### जनसुरक्षा विधेयकाविरोधात आज निर्धार आंदोलन

**रायगड :** सर्व विरोध व जनमानस डावलून विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात पाशवी बहुमताच्या जोरावर जनसुरक्षा विधेयक मंजूर करण्यात आले. हा कायदा लोकशाही तत्त्वांना बाधा आणणारा आणि सत्ताधारी प्रशासनाला जास्त अधिकार प्रदान करून नागरिकांच्या हक्कांची गळचेपी करणारा आहे. या विधेयकाविरोधात महाविकास आघाडीच्यावतीने राज्यभर निर्धार आंदोलन बुधवारी (दि.१०) करण्यात येणार आहे. रायगड जिल्ह्यात ठिकठिकाणी आंदोलन केले जाणार आहे. या विधेयकाला प्रत्यक्ष व दिलेल्या संकेतस्थळावर सूचना व विरोध नोंदवण्यात आला. राज्यभरातून १३ हजार •> पान २ वर

रायगड, बुधवार, दि. १० सप्टेंबर २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹




# खड्डेमुक्तीसाठी 'संघर्ष'

- **महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांचे उपटले कान**
- **अलिबाग-वडखळ रस्त्यासाठी सर्वपक्षीय धडक**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

राष्ट्रीय महामार्ग असलेल्या अलिबाग-वडखळ रस्त्याची ठिकठिकाणी खड्डे पडून अक्षरशः चाळण झाली आहे. या खड्ड्यांमुळे अपघात होत आहेत. वाहन चालविणे कठीण होऊन बसले आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या अलिबाग तालुका रस्ते संघर्ष समितीच्यावतीने मंगळवारी पेण येथील राष्ट्रीय महामार्ग कार्यालयावर धडक देऊन खड्डेमुक्तीसाठी निवेदन देण्यात आले. यावेळी रस्त्याच्या दुरवस्थेकडे अधिकाऱ्यांचे लक्ष वेधत त्यांना शाल-श्रीफळ भेट दिली. रस्त्यावरील खड्डे तात्काळ भरा, अन्यथा रास्ता रोकोचा इशारा देण्यात आला. •> पान २ वर



**रस्त्याची अक्षरशः चाळण**

या मार्गावरील पिंपळभाट, राऊतवाडी, वाडगाव फाटा, खंडाळा, तळवली, मैनुशेठ वाडा, तिनविरा ते चरी, चरी फाटा, पेझारी पोलीस चौकी, पोयनाड, पांडबादेवी, शहाबाज अशा ठिकठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. अनेकवेळा खड्ड्यांमुळे अपघात झाले आहे. तातडीने खड्डेमुक्त मार्ग सुनिश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे. अन्यथा रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

**प्रशासनास उशिरा जाग**

समितीच्या दणक्याने राष्ट्रीय महामार्ग प्रशासन खडबडून जागे झाले. बुधवारपासून रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम केले जाईल, असे लेखी आश्वासन दिले. दरम्यान, सुरुवातीला कार्यकारी अभियंता यांची भेट घेऊन रस्त्यांच्या दुरवस्थेबाबत जाब विचारला, त्यानंतर त्यांना शाल व श्रीफळ भेट देण्यात आले.

> **अलिबाग-वडखळ हा मार्ग कायमच वर्दळीचा राहिला आहे. या मार्गावरून हजारो प्रवासी प्रवास करतात. मात्र, खड्डेमय रस्त्यांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. पर्यटनावर त्याचा परिणाम होत आहे. रस्त्याची दुरुस्ती बुधवारपासून सुरू केली नाही, तर त्या कार्यालयाला टाळे ठोकले जाईल. रास्ता रोको आंदोलनाची भूमिका राहणार आहे.**
>
> **- सुरेश घरत,** अलिबाग तालुका रस्ते संघर्ष समिती

# सावित्री खाडी पुन्हा प्रदूषित



**ऐन पावसाळ्यात पाण्याला लाल भडक रंग**

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाडजवळून वाहणारी सावित्री नदी आणि लगतच असलेली खाडी कालपासून ऐन पावसाळ्यात लाल भडक झाली आहे. पावसाचा फायदा घेत औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांकडून रसायनिक सांडपाणी नदीत सोडले जात आहे की वाया गेलेले रसायन वाहतूक करणारे टँकर खाडीत पाणी सोडतात की काय, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. प्रदूषणमुक्तीची टिमकी वाजवली जात असली तरी प्रदूषण मात्र कमी होत नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

महाड औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषण काही केल्या थांबण्याची चिन्हे दिसत नसून गेली दोन दिवसांपासून महाडजवळून वाहणारी सावित्री नदी आणि लगतच असलेली खाडी प्रदूषित झाली आहे. पावसामुळे गढूळ झालेले सावित्री नदीचे पाणी अचानक लाल झाल्याचे दिसून आले आहे. महाडपासून थेट खाडीपर्यंतचे पाणी प्रदूषित झाल्याने पावसाची संधी घेत औद्योगिक •> पान २ वर

> **सावित्री नदीपात्रातील पाणी दूषित रात्रीच्यावेळी अंधाराचा फायदा घेऊन राजरोसपणे कंपनीतील केमिकलयुक्त पाणी सोडण्यात येते. याचा आजूबाजूच्या रहिवाशांच्या आरोग्यावर घातक परिणाम होण्याची शक्यता आहे. लोकांचा उदरनिर्वाह नदी पात्रातील माशांवर आहे, यामुळे मासेमारांवर उपासमारीची वेळ येईल. तात्काळ प्रशासनाने यावर निर्बंध घालावे.**
>
> **- जयवंत पड्याळ,** स्थानिक रहिवासी, महाड

> **सावित्री खाडीचे पाणी लाल भडक झालेले आहे, अशी माहिती तुमच्याकडून समजली असली तरी स्थानिक रहिवाशांनी मात्र अद्याप कोणत्याही प्रकारची तक्रार केलेली नाही. पाण्याचे नमुने घेण्यात आले असून, पुढील कार्यवाही सुरू आहे.**
>
> **- तानाजी पाटील,** उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण मंडळ, महाड

**वेधक**

### लडाखमध्ये तीन जवानांना वीरमरण

**नवी दिल्ली :** लडाखमधील सियाचीन ग्लेशियरमध्ये मंगळवारी लष्कराच्या चौकीवर हिमस्खलन झाले. यात लष्कराच्या तीन जवानांना वीरमरण आले. घटनेची माहिती मिळताच लष्कर आणि हवाई दलाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. लेह आणि उधमपूर येथूनदेखील मदत मागवली. घटनास्थळी मदत आणि बचावकार्य तात्काळ सुरू करण्यात आले आहे. तीनही सैनिक महार रेजिमेंटचे होते.

### पाच राज्ये १०० टक्के साक्षर

**नवी दिल्ली :** देशभरातील साक्षरतेचा दर झपाट्याने वाढत आहे. विशेषतः गेल्या ११ वर्षांत देशाच्या साक्षरतेच्या दरात मोठी वाढ झाली आहे. देशात साक्षर आणि शिक्षित व्यक्तींची संख्या वाढली असून, अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने सोमवारी ही माहिती दिली. शिक्षण मंत्रालयाने सांगितले की, हिमाचल प्रदेशने १०० टक्के साक्षरतेचा मान मिळवला आहे. हिमाचल प्रदेश पूर्ण साक्षरता मिळवणारे पाचवे राज्य ठरले आहे.

# सीपी राधाकृष्णन नवे उपराष्ट्रपती

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताच्या १७ व्या उपराष्ट्रपतींच्या निवडणुकीसाठी मंगळवारी मतदान झाले. यात एकूण ९८ टक्के मतदान झाले. यामध्ये एनडीएचे उमेदवार सीपी राधाकृष्णन आणि इंडिया अलायन्सचे उमेदवार जस्टिस बी. सुदर्शन रेड्डी यांच्यात थेट लढत झाली. यामध्ये एनडीएचे उमेदवार सीपी राधाकृष्णन ४५२ मतांनी विजयी झाले.

देशाच्या १७ व्या उपराष्ट्रपती निवडणुकीसाठी मंगळवारी संसद भवनात सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदान पार पडले.



एकूण ७६८ खासदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. भारतीय संसदेत लोकसभा आणि राज्यसभेसह एकूण ७८८ खासदार आहेत. सध्या दोन्ही सभागृहात सात जागा रिक्त आहेत. अशाप्रकारे एकूण ७८१ खासदारांना मतदान करायचे होते, त्यापैकी १३ जणांनी मतदानात भाग घेतला नाही. यापैकी बीआरएसचे ४, •> पान २ वर

# पीक विम्याला अल्प प्रतिसाद

**यंदा रायगड जिल्ह्यात अवघ्या 9,917 शेतकऱ्यांची नोंद**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

आपत्कालीन परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पिकांना विम्याच्या माध्यमातून आर्थिक आधार मिळावा म्हणून यावर्षी खरिप हंगामासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजना सुरू करण्यात आली. यावर्षी अवघ्या नऊ हजार ९१७ शेतकऱ्यांनी नोंदणी केली. गतवर्षी ४० हजार ३४७ शेतकऱ्यांनी नोंदणी केली होती. त्यामुळे गतवर्षीच्या तुलनेने यावर्षी पिक विम्याला अल्प प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आहे आहे.

पेरणी न होणे, पूर, दुष्काळ, पावसातील खंड यामुळे होणारे नुकसान, गारपीट, भूस्खलन, क्षेत्र जलमय होणे, वीज कोसळणे, ढगफुटी अशा स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान व काढणीनंतर शेतात सुकवणीसाठी ठेवलेल्या पिकांचे होणारे नुकसान या सर्व बाबींकरिता विमा संरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला. रायगड जिल्ह्यात ॲग्रीकल्चरल इन्शुरन्स कंपनीमार्फत पीक विमा योजना राबविण्यात आली. रायगड जिल्ह्यांसाठी भात पिकासाठी विमा संरक्षित रक्कम ६१ हजार रुपये असून, नाचणी पिकासाठी विमा संरक्षित रक्कम ३५ हजार रुपये आहे. •> पान २ वर

**पीक विम्याची नोंदणी करण्यासाठी ॲग्रीकल्चरल इन्सुरन्स कंपनीमार्फत जनजागृती करण्यात आली होती. शेतावर जाण्यापासून वेगवेगळ्या बैठकीच्या माध्यमातून पीक विमा नोंदणीचे आवाहन करण्यात आले होते. वेगवेगळे फलक तयार करण्यात आले होते. या सर्व प्रयत्नातून अखेर नऊ हजार ९१७ शेतकऱ्यांनी तीन हजार ८३४.१९ हेक्टर क्षेत्रासाठी नोंदणी केली आहे.**



# नेपाळमध्ये अराजकता

**पंतप्रधान केपी शर्मांचा राजीनामा**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

नेपाळमध्ये भ्रष्टाचार आणि सोशल मीडिया ॲप्सवरील बंदीविरोधात देशभरातील तरुण रस्त्यावर उतरले. गेल्या दोन दिवसांपासून राजधानी काठमांडूसह देशभरात हिंसक निदर्शने सुरू आहेत. अनेकशहरांमध्येतरुणांकडूनतोडफोड आणि जाळपोळ केली जात आहे. आंदोलकांनी राष्ट्रपतींच्या खासगी निवासस्थानाला पेटवून दिले. या निदर्शनाच्या पार्श्वभूमीवर नेपाळचे पंतप्रधान केपी शर्मा ओली यांनी अखेर आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे.



पंतप्रधानांपूर्वी देशाचे गृहमंत्री रमेश लेखक, परराष्ट्र मंत्री डॉ. आरजू राणा देउबा, दळणवळण मंत्री पृथ्वी सुब्बा गुरुंग आणि ऊर्जा मंत्री दीपक खडका यांच्यासह अनेक मंत्र्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. आंदोलकांनी या सर्व मंत्र्यांची घरेही पेटवून दिली.

नेपाळ सरकारने सोशल मीडियावर बंदी घातल्यानंतर देशातील तरुणाई संतापली अन् थेट आंदोलन सुरू केले. निदर्शक आणि सुरक्षा दलांमध्ये हिंसक संघर्ष सुरू झाला. तरुणांनी संसद भवनात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला, परंतु सुरक्षा दलांनी बळाचा वापर करून परिसरात कर्फ्यू लावला. या घटनेत आतापर्यंत २१ जणांचा मृत्यू झाला आहे, तर अनेक जण जखमी झाले आहेत. गोंधळ वाढल्यानंतर सरकारने सोशल मीडियावरील बंदी उठवण्याचा निर्णय घेतला. मात्र, तरुणांनी आपली •> पान २ वर


### दिल्ली ते काठमांडू विमानसेवा बंद

**नवी दिल्ली :** नेपाळमधील घटनेनं जगभरातील राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आलं असून, भारतानेही याची दखल घेत नेपाळमधील भारतीयांना व नेपाळमध्ये जाण्याचं नियोजन करणाऱ्यांसाठी ॲडव्हाईजरी जारी केली आहे. त्यानुसार, नेपाळमधील परिस्थिती पूर्वपदावर येईपर्यंत कुणीही नेपाळचा प्रवास करू नये, असे भारत सरकारच्या विदेश मंत्रालयाने म्हटले आहे. तर, दिल्ली ते काठमांडू विमानसेवाही बंद करण्यात आली आहे. •> पान २ वर

# साखर चौथच्या गणरायाची आज प्रतिष्ठापना

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अकरा दिवसांच्या बाप्पाच्या विसर्जनानंतर साखर चौथच्या गणरायाच्या आगमनाची प्रतीक्षा लागून राहिली होती. अखेर ही उत्कंठा संपली. जिल्ह्यामध्ये बुधवारी (दि.१०) साखर चौथच्या ८८५ गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. मिरवणूक काढत बाप्पाचे जल्लोषात स्वागत केले जाणार आहे. त्यात ३९० सार्वजनिक, तर ४९५ घरगुती गणेशमूर्तींचा समावेश आहे.



मूर्तीकार मूर्ती तयार करण्यामध्ये मग्न असल्याने गणेशोत्सवामध्ये गणरायाची प्रतिष्ठापना करता येत नाही. त्यामुळे दहा दिवसांच्या बाप्पांच्या निरोपानंतर साखर चौथच्या गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना केली जाते, असे काही मंडळींकडून सांगण्यात आले आहे. तर, काही ठिकाणी गेल्या अनेक वर्षांपासून मित्रमंडळ एकत्र येत गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करून साखर चौथ गणरायाची मनोभावे पूजा केली जाते. त्यामुळे साखर चौथला गणेशमूर्ती प्रतिष्ठापनेचा उत्साह वाढू लागला आहे. शहरी भागासह ग्रामीण भागातदेखील हा क्रेझ वाढत आहे. ही परंपरा आजही कायम आहे. यावर्षीदेखील साखरचौथच्या गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. सकाळपासून बाप्पाच्या आगमनाची तयारी होणार आहे. काही ठिकाणी मिरवणूक काढत वाजत गाजत बाप्पाचे स्वागत केले जाणार आहे. तर, •> पान २ वर

# केंद्राच्या इंटेलिजन्स ब्युरोला रायगडात जमीन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

केंद्र सरकारच्या सब्सिडरी इंटेलिजन्स ब्युरोला रायगड जिल्ह्यातील आसुडगाव (ता. पनवेल) येथील शासकीय गायरानातील चार हेक्टर जमीन देण्यास मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या जमिनीवर केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाच्या सब्सिडरी इंटेलिजन्स ब्युरोच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी सेवा-निवासस्थाने बांधण्यात येणार आहेत. त्यासाठी आसुडगाव येथील सर्व्हे नंबर ३३ पैकी ४ हेक्टर जमीन रेडीरेकनर दरानुसार येणाऱ्या किमतीच्या ५० टक्के आकारुन देण्याचा निर्णय घेण्यात आला. ही जमीन उपसंचालक, सब्सिडरी इंटेलिजन्स ब्युरो, भारत सरकार, मुंबई विभाग यांना भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकाराने आणि कब्जा हक्काने देण्यात येणार आहे. यासाठी काही अटी व शर्तीही घालण्यात आल्या आहेत. सरकारच्या निर्णयामुळे निश्चितच पनवेलमधील आसूडगाव परिसराचा विकास पुढील काळात होण्यास मदत होणार आहे. सरकारच्या या निर्णयाचे सर्व स्तरातून स्वागत करण्यात येत आहे. सरकारने याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे.

**राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय**

**राज्याच्या मंत्रिमंडळ बैठकीत मंगळवारी अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यात शेतकऱ्यांना मोठा दिलासा देण्यात आलाय. उपसा जलसिंचन योजनेत वीज दर सवलतीला मुदतवाढ देण्यात आली आहे. याशिवाय नागरी पायाभूत सुविधा विकास कर्ज योजनेंतर्गत हुडकोकडून २०० कोटींचं कर्ज घेण्यास मान्यता दिली आहे. तसंच अकोला जिल्ह्यात लघु पाटबंधारे प्रकल्प योजनांच्या दुरुस्ती खर्चाची तरतूद केली आहे. .मंत्रिमंडळ बैठकीत उर्जा विभागाकडून मोठा निर्णय घेण्यात आला आहे.**

**G. M. VEDAK INSTITUTE OF TECHNOLOGY, TALA, RAIGAD**

**NAAC Accredited B**

(Approved By AICTE, Recognized by DTE, Govt. of Maharashtra and affiliated to University of Mumbai)

**INSTITUTE CODE – 3447**

**ADMISSION NOTIFICATION FOR FIRST YEAR ENGINEERING DEGREE COURSES FOR THE ACADEMIC YEAR 2025-26**

**FULL TIME ENGINEERING DEGREE COURSES**

| Branch | Civil Engineering | Mechanical Engineering | Computer Engineering |
|---|---|---|---|
| Vacant Seats | 27 | 23 | 31 |

- Applications are invited for **First Year Engineering**:

| Application issue Date : | Last Date of Application | Display of Merit List | Last Date of Admission |
|---|---|---|---|
| 10/09/2025 from 10.00 am | 11/09/2025 up to 4.00 pm | 11/09/2025 at 6.00 pm | 12/09/2025 |

- **Eligibility:** As per the notification of **DTE MS Information book, 2025**.
- Prospectus and Admission Form will be available at **Rs. 1500 /-** in college office.
- For detailed information read the Notice Board & please **Contact us: 9970534100**
- Cut of Date for all type of admission of Academic year 2025-26 will be **15/09/2025**.

**Dr. D. N. Jaiswal**
**Principal**

**G. M. VEDAK INSTITUTE OF TECHNOLOGY, TALA, RAIGAD**

**NAAC 'B' Accredited**

(Approved By AICTE, Recognized by DTE, Govt. of Maharashtra and affiliated to University of Mumbai)

**INSTITUTE CODE – 3447**

**ADMISSION NOTIFICATION FOR DIRECT SECOND YEAR ENGINEERING DEGREE COURSES FOR THE ACADEMIC YEAR 2025-26**

**AGAINST CAP VACANCIES FOR**

**FULL TIME ENGINEERING DEGREE COURSES**

| Branch | Civil Engineering | Computer Engineering |
|---|---|---|
| Vacant Seats | 05 | 05 |

- Applications are invited for Direct Second Year Engineering:

| Application issue Date : | Last Date of Application | Display of Merit List | Last Date of Admission |
|---|---|---|---|
| 10/09/2025 from 10.00 am | 11/09/2025 up to 4.00 pm | 11/09/2025 at 6.00 pm | 12/09/2025 |

- **Eligibility:** As per the notification of **DTE MS Information book, 2025**.
- Prospectus and Admission Form will be available at **Rs. 1500 /-** in college office.
- For detailed information read the Notice Board & please **Contact us: 9970534100**
- Cut of Date for all type of admission of Academic year **2025-26 will be 15/09/2025**.

**Dr. D. N. Jaiswal**
**Principal**

# नगरपरिषद प्रभाग रचनेबाबत
# केवळ सहा हरकती


(छायाचित्र : संजय गायकवाड)

। कर्जत । प्रतिनिधी ।

एक वर्षापासून रखडलेल्या कर्जत नगरपरिषद निवडणूक होऊ घातली आहे. त्यामुळे सर्व राजकीय पक्षांचा हुरूप वाढला आहे. निवडणूक आयोगाने इतर महत्त्वाच्या प्रक्रिया सुरू केल्यामुळे जानेवारी २०२६ मध्ये नगरपरिषदेची निवडणूक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. नगरपरिषद प्रभाग रचनेचे काम झाले असून, ही प्रभाग रचना अंतिम करण्यासाठी कर्जतकरांकडून दि. १८ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत हरकती आणि सूचना मागवण्यात आल्या होत्या. २०११ च्या जनगणनेनुसार कर्जत नगरपरिषदेची लोकसंख्या २९ हजार ६६३ आहे. मात्र, कर्जत नगरपरिषद हद्दीतून केवळ सहा हरकती आणि सूचना दाखल करण्यात आल्या होत्या.

प्रभागाच्या भौगोलिक सीमाबाबत दि. १८ ऑगस्टपासून ३१ ऑगस्टपर्यंत म्हणजे १३ दिवसांतच केवळ सहा हरकती आणि सूचना आल्या होत्या. जिल्हाधिकारी यांनी सुनावणीसाठी कर्जतचे उपविभागीय अधिकारी, प्राधिकृत अधिकारी म्हणून प्रकाश संकपाळ यांची नेमणूक केली होती. सोमवार, दि. ८ सप्टेंबर रोजी नगरपरिषद कार्यालयामध्ये ही सुनावणी घेण्यात आली. याप्रसंगी कर्जत नगरपरिषदेचे मुख्य अधिकारी तानाजी चव्हाण उपस्थित होते. या सुनावणीचा अभिप्राय अहवाल प्राधिकृत अधिकारी प्रकाश संकपाळ जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवतील, अशी माहिती मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांनी दिली.

# महिलेचे प्राण वाचविणाऱ्या पोलिसांचा सत्कार


(छायाचित्र : महेश पवार)

। नागोठणे । प्रतिनिधी ।

घरगुती भांडणातून स्वतःला संपविण्याच्या उद्देशाने नागोठण्यातील जुन्या ऐतिहासिक पुलावरून अंबा नदीत उडी मारलेल्या रामनगर येथील २५ वर्षीय आशा दीपक गुंजाळ या विवाहित महिलेला वाचविण्याची धडाकेबाज कामगिरी करणाऱ्या नागोठणे पोलिसांचा नागोठणे ग्रामपंचायतीकडून सत्कार करण्यात आला.

सत्कारमूर्तींमध्ये नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी, पो. ह. महेश लांगी, महामार्ग पोलीस पथकात महाड येथे कार्यरत असलेले पो.ह. सुनील वाघ, नागोठणे पोलीस ठाण्यातील पो.शि. स्वप्नील भालेराव यांचा समावेश आहे. नागोठणे ग्रामपंचायतीच्या स्व. बाळासाहेब ठाकरे ग्रामसचिवाल्याच्या इमारतीमधील सभागृहात मंगळवारी (दि.९) सकाळी संपन्न झालेल्या या कार्यक्रमाला नागोठणे ग्रामपंचायतीच्या सरपंच सुप्रिया महाडिक, पाहिले लोकनियुक्त सरपंच व विद्यमान सदस्य डॉ. मिलिंद धात्रक, उपसरपंच अखलाक पानसरे, सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे, प्रकाश कांबळे, ग्रामविकास अधिकारी राकेश टेमघरे, गुड्डू पोत्रिक, सज्जाद पानसरे, ग्रामपंचायत कर्मचारी प्रमोद चोगले, दिलीप तेलंगे, संतोष जोशी, अमोल ताडकर, होमगार्ड शशिकांत पाटील आदींसह पत्रकार उपस्थित होते. नागोठणे पोलिसांच्या या महत्त्वपूर्ण कामगिरीमुळे एका महिलेचे प्राण वाचविण्यास आम्हाला यश आले असले तरी कुटुंबात काही भांडण, वाद असतील, तर ते एकत्र बसून चर्चा करून सोडवावेत. आपल्या एका चुकीच्या निर्णयामुळे संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त होते. त्यामुळे स्वतःचे जीवन संपविण्यापर्यंतचा टोकाचा निर्णय घेऊ नये, असा मोलाचा सल्ला यावेळी नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांनी यावेळी दिला.


## जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी मौजे वरसोली, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत, मिळकतीचे विद्यमान श्री.भूषण माधव भंडारे व मीना भूषण भंडारे यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरची बिनशेती मिळकत निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ ) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| वरसोली ता.अलिबाग जि.रायगड | १६६/१९०/१९६/ १९७/१९८/१४१ | क्षेत्र ४.५०.०० | ४५.०० |

तरी वरील बिनशेती मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : ०९/०९/२०२५

**ॲड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु. नांदाईपाडा, पो. झिराड,
ता.अलिबाग, जि.रायगड.
मो.नं.९८२२१८६७४०



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील क्षेत्राचे वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) उमेश विनायक आठवले, २) सरोज विनायक आठवले, ३) निलीमा महेंद्र आठवले यांचे सोबत सदरहू मिळकतीचे बाबतीत व्यवहाराची प्राथमिक स्थरावरील बोलणी चालू आहेत व आमचे अशील सदरहू मिळकतीचे मालकी हक्क तपासत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड**

| भूमपान क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु. पैसे.) |
|---|---|---|
| २४३८ | जिरायत ००.६८.३० बागायत ००.६९.४० पो.ख.००.०२.५० एकुण ०१.४०.२० | २२.११/- |

वर वर्णन केल्या प्रमाणे क्षेत्राची जमिन मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबें कब्जा वहिवाटीतील असून, तिचे बाबतीत कोणताही निर्णय घेणेचा त्यांस हक्क अधिकार असल्या बाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीं वर अथवा तिचे कोणत्याही भागावर कोणतीही व्यक्ती वा संस्था कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरीहक्क दावा, अपील/आक्षेप, धारणाधिकार, देखभाल, मृत्युपत्र, लिस पेंडन्स, एफ.एस.आय.वापर, अतिक्रमण या अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे बाबतीत कोणत्याही व्यवहारास हरकत आल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून द्यावीत, मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काच्या आहेत व त्यावर अन्य कुणाचा ही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहीत धरले जाईल व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण: अलिबाग
दिनांक : ०९/०९/२०२५

**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु. नागांव, ता. अलिबाग
मोबा.क्र.९९२२७९८५२८


## पान १ वरून

### खड्डेमुक्तीसाठी ‘संघर्ष’

समितीच्या दणक्याने महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांना खडबडून जाग आली असून, त्यांनी बुधवारपासून (दि. १०) खड्डे भरण्याचे काम केले जाईल, असे लेखी आश्वासन देण्यात आले आहे.

यावेळी अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, ॲड. मानसी म्हात्रे, शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, ॲड. प्रवीण ठाकूर, निलेश पाटील, नागाव ग्रा.पं.चे माजी सरपंच निखिल मयेकर, विक्रांत वार्डे, दिलीप जोग, शैलेश चव्हाण, आकाश राणे, विकास पिंपळे, आमोद मुंडे, प्रमोद घासे, चेतन कवळे, योगेश पाटील, राजू विश्वकर्मा, संदीप गायकवाड आदी समितीचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

कार्यकारी अभियंता यांना देण्यात आलेल्या निवेदनानुसार, अलिबाग-वडखळ मार्गावर लाखो खड्डे, महाप्रचंड जंप, झटके, वळणे आहेत. हा मार्ग मानवी वापरास अयोग्य झाला आहे. या मार्गावरून शेकडो वाहनांसह हजारो प्रवासी प्रवास करतात. मुंबई-पनवेल ये-जा करणाऱ्या चालकांसह प्रवाशांना मानसिक, शारीरिक तसेच आर्थिक त्रास होत आहे.

**कामाची निविदा मंजूर, मात्र प्रवास खडड्यातूनच**

अलिबाग-वडखळ राष्ट्रीय महामार्ग २२ कि.मी. रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी २२ कोटींचे टेंडर मंजूर झाले आहे. निविदा, कामाचे तपशील आणि निर्णय महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभागाने वडखळ-अलिबाग एनएच-१६६ए हे २२.२ किमीचे रस्ते मजबुतीकरण मोडवर करण्यासाठी २२ कोटी १४ लाख २८ हजार रुपये इतक्या कामांची निविदा मंजूर करण्यात आली आहे. हा निधी मूळ मंजूर खर्चापेक्षा तब्बल ४३.८० टक्क्यांनी कमी आहे. देवकर अर्थमूव्हर्स कंपनीला काम देण्यात आले आहे. हे निर्णय २२ ऑगस्ट २०२५ रोजी मंत्रालयातील समितीच्या बैठकीत घेण्यात आले आहेत. कामासाठी नऊ महिन्यांचा कालावधी आणि तीन वर्षांची डेफेक्ट लायबिलिटी निश्चित करण्यात आली आहे. काम सुरू करण्यापूर्वी, परफॉर्मन्स सिक्युरिटी व निधी मंजुरीसंबंधीचे सर्व नियम पाळावेत, अशी अट घालण्यात आली आहे. मार्गावर रस्ता सुरक्षेचे उपाययोजना, ब्लॅक स्पॉट सुधारणा आणि प्रचलित मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रकारच्या फरकासाठी केंद्र सरकारची परवानगी आवश्यक राहील, अशी माहिती उपलब्ध झाली आहे.

### सीपी राधाकृष्णन नवे उपराष्ट्रपती

बीजेडीचे ७, अकाली दलाचे १ आणि १ अपक्ष खासदाराने मतदान केले नाही. ४२७ एनडीए खासदारांनी मतदान केले.

मतमोजणीच्या वेळी ७५२ मते वैध आढळली आणि १५ मते अवैध घोषित करण्यात आली. सीपी राधाकृष्णन यांना ४५२ पहिल्या पसंतीची मते मिळाली, तर इंडिया ब्लॉकचे उमेदवार बी सुदर्शन रेड्डी यांना फक्त ३०० पहिल्या पसंतीची मते मिळाली. विरोधी पक्ष आपल्या खासदारांना एकजूट ठेवू शकला नाही. एनडीएकडे एकूण ४२७ खासदार होते. जगनमोहन रेड्डी यांच्या पक्षाच्या वायएसआर काँग्रेसच्या सर्व ११ खासदारांनी एनडीए उमेदवाराच्या बाजूने मतदान केले, तर ही संख्या ४३८ पर्यंत पोहोचते. परंतु सीपी राधाकृष्णन यांना एकूण ४५२ मते मिळाली. म्हणजेच, १४ विरोधी खासदारांनी एनडीए उमेदवाराच्या बाजूने क्रॉस-व्होटिंग केले.

### नेपाळमध्ये अराजकता

निदर्शने सुरुच ठेवली. निदर्शकांनी राष्ट्रपती पौडेल यांच्या वैयक्तिक निवासस्थानाला आग लावली आहे. तसेच, पंतप्रधान केपी ओली यांच्या वैयक्तिक निवासस्थानावरही जाळपोळ करण्यात आली आहे. याशिवाय, ललितपूरमधील माजी पंतप्रधान पुष्पकमल दहल प्रचंड यांच्या निवासस्थानाचीही तोडफोड आणि माजी पंतप्रधान शेर बहादूर देउबा यांच्या घरासमोर निदर्शने करण्यात आली.

नेपाळमध्ये संसदेत घुसलेल्या निदर्शकांनी सैन्याची शस्त्रे हिसकावली. तसेच, अर्थमंत्री विष्णू पौडेल यांना बेदम मारहाण केली.या निदर्शनाच्या पार्श्वभूमीवर काठमांडू विमानतळाची सुरक्षा वाढवण्यात आली असून, त्रिभुवन आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन येणारी सर्व देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. दरम्यान, या सर्व हिंसाचारामुळे पंतप्रधान केपी ओली देश सोडून पळाल्याचा दावा नेपाळी वृत्त वाहिन्या करत आहेत.

### सावित्री खाडी पुन्हा प्रदूषित

क्षेत्रातील कंपनी अगर सांडपाणी वाहतूक करणाऱ्या वाहनाने हे सांडपाणी सोडून दिले असावे, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. महाडमधील सजग नागरिकांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या महाड कार्यालयाला कळवून याबाबत कारवाई करण्याची मागणी केली आहे.

महाड औद्योगिक परिसरातील कंपन्यांचे प्रदूषण ही एक चिंतेची बाब असून, गेली अनेक वर्षे याबाबत थेट कारवाया होऊनदेखील नदी प्रदूषित करण्याचा प्रकार आजदेखील सुरूच आहे. पावसाळ्यात कंपन्यांकडून रासायनिक सांडपाणी सोडून देण्याचे प्रकार यापूर्वीदेखील घडले आहेत. याबाबत महाराष्ट्र प्रदूषण मंडळ नोटीसी देण्याच्या पोकळ कारवाया करत आहे. महाड औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषण रोखण्यासाठी महाड उत्पादक संघटनादेखील प्रयत्न करत असल्याचे भासवत असले तरी औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांकडूनच प्रदूषण केले जात असल्याचे वारंवार समोर येत आहे. पावसाचा फायदा घेत रासायनिक सांडपाणी वाहून नेणारी वाहनेदेखील अंधारात हे पाणी नदीत सोडून देत असावीत, अशी शक्यता प्रदूषण मंडळाकडून व्यक्त केली जात आहे.

### पीक विम्याला अल्प प्रतिसाद

या योजनेंतर्गत भातासाठी एक एकर क्षेत्राकरिता १८३ रुपये, एक हेक्टर क्षेत्रासाठी ४५७ रुपये हप्ता आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे नाचणी पिकाचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे एक एकर क्षेत्रासाठी ३५ रुपये व एक हेक्टर क्षेत्रासाठी ८७.५० रुपये हप्ता आहे. पीक विम्याची नोंदणी करण्यासाठी ॲग्रीकल्चरल इन्सुरन्स कंपनीमार्फत जनजागृती करण्यात आली होती. शेतावर जाण्यापासून वेगवेगळ्या बैठकीच्या माध्यमातून पिक विमा नोंदणीचे आवाहन करण्यात आले होते. वेगवेगळे फलक तयार करण्यात आले होते. या सर्व प्रयत्नातून अखेर नऊ हजार ९१७ शेतकऱ्यांनी तीन हजार ८३४.१९ हेक्टर क्षेत्रासाठी नोंदणी केली.

मागील वर्षी खरीप हंगामात एक रुपयावर पीक विमा नोंदणी करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले होते. या आवाहनाला शेतकऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. गतवर्षी ४० हजार ३४७ अधिक शेतकऱ्यांनी नोंदणी केली होती. परंतु, यंदा पीक विमा नोंदणीला फारसा प्रतिसाद मिळत नसल्याचे चित्र आहे. गतवर्षीच्या तुलनेने ३० हजार ४३० शेतकऱ्यांनी यावर्षी पाठ फिरवल्याचे आकडेवारीनुसार दिसून आले आहे

### साखर चौथच्या गणरायाची आज प्रतिष्ठापना

काही ठिकाणी बाप्पाला डोक्यावर आणत पारंपरिक पद्धतीने बाप्पाचे स्वागत करण्यात येणार आहे.

दुपारपर्यंत विधीवत पूजा झाल्यावर मूर्तीची प्रतिष्ठापना केली जाणार आहे. दुपारपासून संध्याकाळपर्यंत सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. संध्याकाळी काही ठिकाणी संगीत खुर्ची, बाल्या नृत्यांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. साखर चौथच्या बाप्पाच्या स्वागतासाठी जिल्ह्यातील बाजारपेठांमध्ये मंगळवारी सायंकाळी गर्दी झाली होती. पूजेच्या साहित्यांसह फुले, फळे, सजावटीसाठी लागणारे साहित्य खरेदीसाठी बाजारपेठा फुलल्या होत्या. त्यामुळे सर्वत्र एक वेगळा उत्साह दिसून आला. या कालावधीत पोलीस ठाणे स्तरावर बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

### दिल्ली ते काठमांडू विमानसेवा बंद

नेपाळमधील सध्याची परिस्थिती विचारात घेता, भारतीय नागरिकांनी परिस्थिती पूर्ववत होईपर्यंत प्रवास करणे टाळावे. सध्या नेपाळमध्ये असलेल्या भारतीय नागरिकांनी सध्याच्या वास्तव्याच्या ठिकाणी सुरक्षित आश्रय घ्यावा. रस्त्यावर किंवा बाहेर पडणे टाळावे. सर्वोतपरी काळजी घ्यावी, असे आवाहन भारताकडून करण्यात आले आहे. नेपाळ प्रशासन तसेच काठमांडू मधील भारतीय दूतावासाच्या मार्फत प्राप्त होणाऱ्या स्थानिक सुरक्षा नियमांचे तंतोतंत पालन करावे. कोणत्याही मदतीसाठी, कृपया खालील हेल्पलाईन नंबरच्या माध्यमातून काठमांडू स्थित भारतीय दूतावास सोबत संपर्क साधावा, असेही आवाहन भारतीय नागरिकांना भारतीय दुतावासाकडून करण्यात आले आहे.

### जनसुरक्षा विधेयकाविरोधात आज निर्धार आंदोलन

हरकती दाखल करण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी ९५०० हरकती सदर विधेयक रद्द करा, हे स्पष्ट मांडणाऱ्या होत्या. सर्व हरकतींची दखल न घेता, हा कायदा पुढे रेटण्यात आला. सर्व विरोध व जनमानस डावलून विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात पाशवी बहुमताच्या जोरावर सदर कायदा मंजूर करण्यात आला. हा कायदा लोकशाही तत्त्वांना बाधा आणणारा आणि सत्ताधारी प्रशासनाला जास्त अधिकार प्रदान करून नागरिकांच्या हक्कांची, सरकारला लोकशाही मार्गाने जाब विचारणाऱ्यांची गळचेपी करणारा आहे. या कायद्याच्या विरोधात राज्यभर आंदोलनाची हाक देण्यात आली आहे. तालुका, जिल्हा शहर स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी यांच्या पुतळ्याजवळ जमून या कायद्याचा निषेध करण्यात येईल, सरकारला विरोधाचा असहकार आंदोलनाचा इशारा देण्यात येणार आहे. समाजात या जुलमी कायद्याची माहिती पोहोचावी, असा या आंदोलनाचा उद्देश आहे.


## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की मौजे पोटल, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विदयमान मालक १) जयश्री शक्ती नाईक २) शक्ती ब्रह्मा नाईक यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे पोटल, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ३८ | २ | ०-३४-०० पैकी वरील नमूद मालक यांचे मालकीचे क्षेत्र ०-१६-०० | २-७२ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.१०/०९/२०२५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो.९४२२०६८७५५



## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. सुभाष वसंत रजपूत यांनी मौजे-तळवली, ता. कर्जत जि. रायगड येथील जमीन मिळकतीचे मालक १. अरुण पांगो कातकरी, उर्फ पवार, २. सखू रामा कातकरी, उर्फ वाघमारे, ३. कुसुम भीमा कातकरी उर्फ पालकर, ४. ताराबाई बंडू वाघमारे उर्फ कातकरी, यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील व मालकीची, आणि भोगवटासदरी नावे असलेली खालील वर्णनाची जमीन मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. वरील मिळकत लिहून देणार यांचे मालकीची प्रत्यक्ष ताबा व कब्जा वहीवाटीची महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ३६ व ३६ अ ची आदिवासी खातेदार असलेली जमिन मिळकत आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**- मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे तळवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| गाव | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| तळवली | ३७/१/अ | ०.२९.६० पो.ख. ०.०६.३० एकूण : ०.३५.९० | ५.७५ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकबीस) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच खरेदीखत करुन पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत दि. १०/०९/२०२५

कळावे
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस:- श्री.साई सावली, सो.लि.दुसरा मजला, ब्लॉक नं.१०,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता. कर्जत, जि. रायगड, पिन ४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८



SARASWATI EDUCATION SOCIETY’S
**YADAVRAO TASGAONAKAR INSTITUTE OF ENGINEERING & TECHNOLOGY**
(Approved by AICTE, DTE Maharashtra State & Affiliated to University of Mumbai)
Village Chandhai, Post Nasrapur, Bhivpuri Road Railway Station, Tal. Karat, Dist. Raigad 410201 Maharashtra.

**ADMISSION NOTIFICATION 2025-26**

**DIRECT SECOND YEAR B.E. (Engineering) (DTE Code: EN 3147)**

**Applications are invited from eligible candidates for admission against vacant seats after CAP Round IV (ACAP) in** Direct Second Year B.E. (Engineering). **Interested candidates are required to submit their applications in the prescribed format along with necessary documents to the Admission Office within the stipulated time.**

| Name of Courses | Course code | Vacant Seat |
|---|---|---|
| B.E. in Computer Engineering | 314724510 | 08 |
| B.E. in Information Technology | 314724610 | 04 |
| B.E. in Civil Engineering | 314719110 | 08 |
| B.E. in Mechanical Engineering | 314761210 | 37 |
| B.E. in Electrical Engineering | 314729310 | 06 |
| B.E. in AIML | 314792110 | 04 |
| B.E. in Data Science | 314791710 | 06 |

**The schedule of admission procedure is as follows**

- Sale and Issue of Application Forms: From **09th September 2025 to 12th September 2025.** Time: **09:00 am to 04:00** pm Venue: **Admission Office. Cost of Information Brochure with Admission Form: ₹300/- only**
- **Submission of Completely Filled Application Forms:** 09th Sept. to 12th September 2025, Time: 10:00 am to 04:00 pm.
- **Display of Provisional Merit List:** 13th September 2025 at 03:00 pm **(On Institute Notice Board and Website)**
- **Reporting to the Institute by submitting completely filled admission form with relevant documents:** 10.00 am to 05.00 pm from **14th of Sept. 2025 to 15th of Sept. 2025.**
- Online Registration & Documents Verification is mandatory from the competent authority.
- **For schedule & changes please refer Govt. of Maharashtra state CET cell website** (https://cetcell.mahacet.org) and their Information Brochure A.Y. 2025-26.

-Principal
Yadavrao Tasgaonakar Institute of Engineering & TECHNOLOGY
principal.ytiet@tasgaonkartech.com

+91 9967640120 / +91 9768140203 | www.ytiet.com



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.अशिष जोतमल जैन, रा.राम मंदिर जवळ, जुनी बाजार पेठ, नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड, ४१०१०१, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली बिनशेती जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड, येथील बिनशेती जमिन मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (चौ.मी) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ४७६/३ | ३.१७.०० | ३१.७० | श्री.आकाश मोतीलाल चव्हाण व श्री.कुमार शंकर चव्हाण. |

वरील वर्णनाच्या बिनशेती जमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या १४(चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- १०/०९/२०२५.

सही / -
**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत, ‘‘पुष्प विमल’’ निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे .
मो.नं.७३८५००४८०६.



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. प्रकाश सुखाराम मेवाडा, रा. फ्लॅट नं.९०३, बिल्डींग नं.१६, निलसिद्धी, आमरांते को. ऑ.हौ.सो.लि., सेक्टर नं. ९इ, डी मार्ट जवळ, प्लॉट नं. ४, रोडपाली कळंबोली, कळंबोली नोड, रायगड, ४१०२१८, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे धामणी, ता.कर्जत, जि.रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| १६३/४ | ०.४०.०० पो.ख. ०.०५.०० | ०.२० | श्रीमती प्रीती झा. |
| | एकुण ०.४५.०० | | |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या १४(चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- १०/०९/२०२५.

सही / -
**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत, ‘‘पुष्प विमल’’ निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे .
मो.नं.७३८५००४८०६.



**महाराष्ट्र शासन**
जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय,
रायगड अलिबाग (खनिकर्म शाखा)
दूरध्वनी क्र. ०२१४१-२२२११८/२२२३२२ फॅक्स क्र. ०२१४१-२२२०२५/२२७४५१
email: raigaddmo003@gmail.com.
क्र. खशा/कात१/एम-सॅण्ड जाहीरात/जाहीर आवाहन/२०२५
दिनांक ०९/०९/२०२५

## जाहीरात

शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक:गौखनि- १०/०३२५/प्र.क्र.८०/ख-२ दि.२३.०५.२०२५ चे निर्णयान्वये राज्यात विविध बांधकामासाठी कृत्रिम वाळूचा वापर करण्याबाबत धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. सदर धोरणानुसार रायगड जिल्ह्यामध्ये प्रथम पुढाकार घेणाऱ्या ५० महाराष्ट्र राज्याचा अधिवास असलेल्या/ महाराष्ट्रात नोंदणी असणाऱ्या संस्था इत्यादींना एम-सॅन्ड (कृत्रिम वाळू) युनिट स्थापन करण्याकरीता उद्योग विभागाच्या व महसूल विभागाच्या सवलती लागू राहतील. तसेच शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्रमांक:गौखनि-१०/०३२५/प्र.क्र.८०/ख-२ दि.१७.०७.२०२५ अन्वये कृत्रिम वाळू धोरणाची अंमलबजाणी करण्याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे. त्यानूसार जिल्ह्यात कार्यरत असलेले क्रशरधारक, खाणपट्टाधारक, खाजगी जमिनीधारक अथवा शासनाकडे किंवा कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे निहीत असलेल्या जमिनीवर लिलावा अंती दि. २३.०५.२०२५ च्या धोरणानुसार १०० टक्के एम-सॅन्ड (कृत्रिम वाळू) उत्पादित करणेस इच्छुक आहेत अशा व्यक्ती/संस्था यांनी आवश्यक कागदपत्रासहीत महाखनिज या संगणक प्रणालीवर (https://mahakhanji.maharashtra.gov.in) महाईसेवा केंद्रामार्फत किंवा वैयक्तीकरीत्या १५ दिवसांत अर्ज करणेबाबत जिल्हा प्रशासनाच्यावतीने जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

सदरबाबत काही अडचणी अथवा शंका असलेस खनिकर्म शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड यांचेशी संपर्क साधावा.

**सही/**
**जिल्हाधिकारी रायगड**

क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/१४४/१२०१/२०२५

# निवडक

## राज्य ग्रामपंचायत कर्मचारी महासंघाचे साताऱ्यात राज्यव्यापी आंदोलन

**कोर्लई :** महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी महासंघाने प्रलंबित मागण्यांसाठी राज्यव्यापी आंदोलन छेडण्याच्या केलेल्या आव्हानाप्रमाणे सोमवार दि.८ सप्टेंबरपासून ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या सातारा येथील कार्यालयासमोर बेमुदत आंदोलन सुरू केले आहे. जिल्हा व तालुकानिहाय या आंदोलनात तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत कर्मचारी सहभागी होणार असून, येत्या १४ सप्टेंबर रोजी मुरुड तालुक्यातील ग्रामपंचायतीचे ३० कर्मचारी सातारा आंदोलनात सहभागी होणार आहेत. अशी माहिती मुरुड तालुका संघटना अध्यक्ष सचिन बिरवाडकर यांनी कृषीवलच्या प्रतिनिधींशी बोलताना दिली आहे. तसेच, पहिल्या टप्प्यातील आंदोलनानंतर मागण्या मान्य होतील, असे असताना त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे. याअनुषंगाने आता दुसऱ्या टप्प्यातील या आंदोलनात तालुक्यातील सर्व कर्मचाऱ्यांना सहभागी होण्याचे आवाहन ग्रामपंचायत कर्मचारी महासंघाने केले आहे.



## देवकान्हे-खांब मार्गावर वाहतूककोंडी

**खांब :** रोहा तालुक्यातील खांब-उडदवणे रस्त्यांतर्गत येणाऱ्या देवकान्हे ते खांब मार्गावर रोजच वाहतूककोंडी हात असते. त्यामुळे वाहनचालक व प्रवासीवर्गाला मोठा मनस्ताप स्विकारावा लागत आहे. मागील वर्षी या मार्गाचे पक्के डांबरीकरण करण्यात आले होते. परंतु, रूंदीकरणाच्या कामाला स्थानिक पातळीवर काहीजणांकडून स्वारस्य न दाखविल्याने रूंदीकरणाचे काम होऊ शकले नाही. परिणामी या मार्गावरील धानकान्हे ते देवकान्हे दरम्यानचा रस्ता फारच अरूंद असल्याने जेमतेम एकच वाहन एकावेळी मार्गक्रमण करू शकते. त्यामुळे नवख्या वाहनचालकाला किंवा त्याच्यामुळे इतर चालकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. त्यातच या रस्त्याचे डांबरीकरण व मजबुतीकरण करताना देवकान्हे ते चिल्हे या भागात रस्त्याची उंची वाढविण्यात आली आहे. परंतु, या रस्त्याच्या साईडपट्टीला कोणत्याही प्रकारचा भराव न केल्यामुळे या मार्गातून वाहने चालविताना अडचणीचे ठरत आहे.

## नवघर अंगणवाडीत आढळला अजगर

**पेण :** तालुक्यातील नवघर अंगणवाडी ही अंतोरा बंदराच्या खाडीवर असून पुराचे पाणी वारंवार या अंगणवाडीत शिरते. त्या पाण्याबरोबरचे सापजातीचे अनेक जनावरे या अंगणवाडीमध्ये शिरत असतात. त्यामुळे येथे काम करणाऱ्या अंगणवाडी सेविकेसह मदतनीस व विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. नवघर



अंगणवाडी सेविका पुनम पाटील आणि अंगणवाडी मदतनीस वैशाली कोळी या दररोज आपल्या जिवाशी खेळून अंगणवाडी उघडत असतात. त्यानंतर साफसफाई करूनच विद्यार्थ्यांना अंगणवाडीत घेतात. मंगळवारी (दि.९) रोजच्याप्रमाणे त्यांनी अंगणवाडी उघडली असता अंगणवाडीच्या स्वयंपाक घरात साप जातीचे पिल्लू आढळून आले. त्यानंतर सर्प मित्र दानिष शेंदोळे यांना बोलवल्यानंतर त्याने तो साप अजगर जातीचा असल्याचे सांगितले आणि त्याला पकडून सुरक्षितरित्या निसर्गाच्या आदिवासात सोडले. त्यामुळे वारंवार या अंगणवाडीत साप येत असल्याने अंगणवाडी कर्मचारी, विद्यार्थी व पालकांच्या मनात भिती निर्माण होत आहे. तरी या अंगणवाडीला योग्य ती उंची देऊन नव्याने बांधकाम करण्याची गरज असल्याचे बोलले जात आहे.



## कोळीबांधवाच्या बोटी निघाल्या दर्यात

**आगरदांडा :** कोकणात गणेशोत्सव मोठ्या आनंदात आणि उत्साहात साजरा केला जातो. गणेशोत्सवादरम्यान मुरुड, एकदरा व राजपुरी विभागातील कोळी बांधव आपल्या बोटी किनाऱ्यावर लावून मोठ्या उत्साहात सण साजरा करत असतात. ११ दिवसांच्या बाप्पाला निरोप दिल्यानंतर आपल्या उदारनिर्वाहासाठी कोळी बांधवांच्या बोटी पुन्हा सज्ज झाल्या आहेत. त्या करिता बोटींत महिन्याभराचे कडधान्य, बर्फ, पुरेसा औषध साठा, पिण्याचे पाणी आदिंसह आवश्यक सामान भरण्यासाठी कोळीबांधवाची लगबग सुरू आहे. वातावरणाचा अंदाज घेऊन मच्छिमार बांधव नव्या उत्साहात दर्यावर स्वार होण्यासाठी सज्ज झाले आहेत.



## रस्त्यावरील खडीमुळे नागरीक त्रस्त

**पनवेल :** नवीन पनवेलमधील रस्ते खड्डेमय बनले असून येथील नागरिक त्रस्त झाले आहेत. दरम्यान, पावसाने विश्रांती घेताच पालिकेकडून डागडुजीला सुरुवात करण्यात आली. परंतु, हा रस्ता किती दिवस टिकणार, यावर स्थानिकांमधून प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. तसेच, काही सेक्टरमध्ये नुसतीच रस्त्याच्या बाजूला खडी टाकण्यात आली असून खड्डे तसेच ठेण्यात आलेले आहेत. त्यामुळे या खड्ड्यांसह रस्त्याच्या बाजूला टाकलेल्या खडीमुळे पादचाऱ्यांसह वाहनचालकांना मोठा अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे पालिकेने तात्काळ रस्त्याकडेची खडी उचलून योग्य प्रकारे खड्डे बुंजवावेत, अशी मागणी प्रवासीवर्गातून होत आहे.

# पटनी एनर्जीविरोधात शेतकऱ्यांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

**पटनी एनर्जीसह दहा कंपन्यांनी प्रकल्पाच्या नावाखाली कवडीमोल भावाने शेतकऱ्यांच्या ७५० एकर जमिनी घेतल्या. परंतु, पंधरा वर्षे होऊनही त्या जागी कोणताही प्रकल्प उभारला गेला नाही. त्यांच्यावर ३८० शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी समाजक्रांती आघाडी संचलित अन्यायग्रस्त शेतकरी संघर्ष समितीच्यावतीने मंगळवारी (दि.९) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन व उपोषण सुरू केले आहे. हा लढा बी.जी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आला आहे.**

### पटनीसह दहा कंपन्यांनी फसवणूक केल्याचा आरोप

अलिबाग तालुक्यातील मेढेखार, कालवडखार, विभागीतल मेढेखार, कुसूंबळे, कातळपाडा, काचळी, पिटकीरी, खातविरे आदी गावांतील शेतकऱ्यांच्या जमीनी पटनी एनर्जीसह एकूण दहा भांडवलदार कंपन्यांनी प्रकल्प उभारण्यासाठी खरेदी केल्या. पिकत्या जमीनी कवडीमोल भावाने विकत घेऊनही अनेक वर्षे त्या जागेमध्ये कोणताही प्रकल्प उभा केला नाही. या कंपन्यांनी शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. खाडीच्या बाजूला असलेल्या या जमीनी २००६ मध्ये खरेदी करण्यात आल्या होत्या. या जमीनी कंपनीच्या नावावर झाल्या आहेत. खाडी किनारी असलेल्या जमीनीमध्ये अद्याप प्रकल्प उभारले नसल्याने या जमीनी नापिक झाल्या आहेत. पूर, भरती, उधाणामुळे जमीनीची धुप होऊन शेतजमीनी खाडीच्या पाण्यात गेल्या आहेत. या जागेत कांदळवनाची वाढ झाली आहे. भांडवलदार कंपन्यांमुळे जमीनीची दुर्दशा झाल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली असून मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. रोजगाराचे साधन नसल्याने उपासमारीची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. त्यामुळे न्याय मिळावा, म्हणून शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक धरणे आंदोलन व उपोषण केले आहे.

> **पोयनाड विभागातील काही गावातील शेतकऱ्यांचा अज्ञानपणाचा फायदा घेऊन त्यांच्या जमीनी पटनीसह दहा कंपन्यांनी कमी किंमतीमध्ये घेतल्या. त्यांना ५० टक्केदेखील रक्कम दिली नाही. कंपनीने जमीनी नावावरदेखील केल्या आहेत. ते याठिकाणी शेतीपुरक व्यवसाय प्रकल्प उभारणार आहेत. तसेच, नातेवाईकांना रोजगार देणार अशी ग्वाही देखील दिली. परंतु, खरेदी केलेल्या जमीनीची रक्कम दिली नाही. तसेच, रोजगारही दिला नाही. याबाबत गेली १९ वर्ष शेतकऱ्यांचे आंदोलन सुरु आहे. प्रशासनाकडून कोणतीही भूमिका घेण्यात आली नाही. अन्यथा तीव्र आंदोलन करून हा लढा सुरु केला जाणार आहे.**
> **– बी.जी. पाटील, आंदोलक**

याबाबत अपर जिल्हाधिकारी सूनील थोरात यांच्याशी संपर्क साधला होऊ शकला नाही.




# शिक्षकांमुळेच विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा

- पालकांनी व्यक्त केल्या भावना
- श्रीकृपा इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शिक्षक दिन साजरा

**। चौल । प्रतिनिधी ।**

विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देण्याचे व त्यांना घडवण्याचे कामशिक्षक करत असतात. शिक्षिकी पेशा हा अतिशय पवित्र पेशा आहे. विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार, उकार व ज्ञान देण्याचे पवित्र कार्य ते करतात, अशा भावना पालकांनी व्यक्त केल्या. रेवंदडा येथील श्रीकृपा इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शिक्षक दिनाचे औचित्य साधत सोमवारी (दि.८)या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना बोलण्याची संधी देण्यात आली होती. त्यावेळी त्यांनी आपले विचार मांडले.

शिक्षणाचा पाया मजबूत असेल, तर विद्यार्थ्यांना पुढे जाऊन कोणतीही अडचण येत नाही, हे खरं करुन दाखविण्याचे काम श्रीकृपा इंग्लिश मीडियम, रेवदंडा स्कूलने केल्याचे यावेळी पालकांनी सांगितले. प्ले ग्रुप ते सिनिअर केजीपर्यंत या स्कूलमध्ये मुख्याध्यापिका रिया प्रशांत झावरे यांच्या मार्गदर्शनाखाली मुलांचा शिक्षणाचा पाया मजबूत करण्याचे, त्यांना संस्कारपूर्ण शिक्षण देण्याचे काम येथील शिक्षक करीत आहेत. मुलांमध्ये लहानपणापासूनच सभाधीटपणा यावा, याच उद्देशाने पालकांच्या सोबतीने मुलांना शिक्षक दिनाचे औचित्य साधून बोलण्याची संधी देण्यात आली होती. दरम्यान, शाळेतील सर्वच मुलांनी आपल्या पालकांच्या सोबतीने शिक्षक दिन आणि आपल्या शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी मुख्याध्यापिका रिया प्रशांत झावरे, शिक्षिका निधी गुप्ता, प्रीती म्हात्रे, अंकिता नाईक, श्वेता ठाकूर यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी संगिता गोंधळी, संपदा मानकर यांना विद्यार्थ्यांनी गुलाबपुष्प देत नमस्कार केला.

# महावितरणच्या अनागोंदी कारभारावर मनसे आक्रमक

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरानमधील वीज ग्राहकांवर महावितरण कंपनी वेगवेगळ्या प्रकारे अडचणीत आणत आहे. आधीच शहरातील सतत खंडित होणारा वीज पुरवठा व तुटणाऱ्या वीज वाहिन्या या समस्यांनी ग्रस्त असलेल्या वीज ग्राहकांकडून आता आर्थिक लूट करण्याचा प्रयत्न महावितरण करीत असल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, महावितरणकडून सुरु असलेल्या लुटी बद्दल महाराष्ट्र नवनिर्माण सेना पुन्हा आक्रमक झाली आहे.

माथेरानमध्ये वीज बिले भरणा मुदत उलटल्यानंतर दिली जात असल्याने त्याचा आर्थिक भुर्दंड समस्त माथेरानमधील ग्राहकांना बसत आहे. येथील अधिकारी व कर्मचारी वर्ग कामचुकारपणा करत असून त्याचा भुर्दंड आम्हाला कशाला? असा प्रश्न माथेरानमधील ग्राहक विचारत आहेत. माथेरान हे जंगलाने व्यापलेले ठिकाण असल्याने भूमिगत वीज वाहिन्या टाकण्यात आल्या आहेत. मात्र, तरीदेखील वीज पूर्वतः खंडित होण्याच्या घटना घडत आहेत. त्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही महावितरणकडून केली जात नसल्याने मनसेतर्फे ठिय्या आंदोलन करून आवाज उठवला होता. त्यात आता महावितरणकडून वीज ग्राहकांच्या खिशातून वाढीव पैसे उकळले जात असल्याने ग्राहक नाराज आहेत.

# वैष्णो लॉजिस्टिक्स यार्डवर कारवाई

### सीमा शुल्क विभागाने ठोठावला साडेचार लाखांचा दंड

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

कंटेनर यार्डमध्ये साठवणूक करण्यात आलेल्या धोकादायक रसायनांची हाताळणी करण्यात आणि सुरक्षेतत ढिलाई दाखविल्याप्रकरणी उरण येथील वैष्णो लॉजिस्टिक्स यार्ड व्यवस्थापनाला जेएनसीएच्या सीमा शुल्क विभागाने दोषी ठरवले आहे. याप्रकरणी सीमा शुल्क विभागाच्या विविध कलमाखाली साडेचार लाख रुपये दंड ठोठावण्यात आला असुन कस्टम्स कार्गो सर्व्हिस प्रोव्हायडरचा परवानाही १५ सप्टेंबर पर्यंत निलंबित करण्यात आला आहे. १५ दिवसांपुर्वीच डीपी वर्ल्ड मल्टीमोडल लॉजिस्टिक्स प्रा. लि.कंपनीचा कार्गो कंटेनर आयात-निर्यात व्यवसाय परवाना जेएनपीए सीमा शुल्क विभागाने धडक कारवाई करीत निलंबित केला आहे. सीमाशुल्क विभागाच्या कारवाईमुळे मात्र नियमांचे उल्लंघन करणाऱ्या उरणमधील शेकडो सीएफएस मालकांचे धाबे दणाणले आहेत.

चिर्ले-उरण ग्रामपंचायतीच्या हद्दीतील वैष्णो लॉजिस्टिक्स यार्डमधुन कंटेनर मालाची हाताळणी आणि धोकादायक रसायनांची साठवणूक केली जात आहे. या यार्डमध्ये साठवण्यात आलेल्या धोकादायक रसायनांच्या कंटेनरला १५ जानेवारी २०२४ रोजी भीषण आग लागली होती. या भीषण आगीत साठवून ठेवण्यात आलेल्या कंटेनरमधील ६९,००० किलो घातक रसायन जळून नष्ट झाले होते. त्यामुळे जिवितहानी झालेली नसली तरी मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले होते. याप्रकरणी जेएनपीएच्या सीमा शुल्क विभागाकडून चौकशी केली जात होती. चौकशीअंती आपातकालीन यंत्रणा योग्य प्रकारे कार्यान्वित नव्हती. धोकादायक रसायनांची साठवणूक करताना योग्य प्रकारे दक्षता घेतली नव्हती. तसेच, चौकशीअंती सुरक्षा यंत्रणांच्याही अनेक त्रुटी उजागर झाल्या आहेत. याप्रकरणी निष्काळजी व हलगर्जीपणाचा ठपका ठेवून जेएनसीएच्या कस्टम्स आयुक्त (एनएस-जनरल) बी. सुमिदा देवी यांनी विविध नियमांखाली वैष्णो लॉजिस्टिक्स यार्डला साडेचार लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. तसेच, १५ सप्टेंबरपर्यंत कस्टम्स कार्गो सर्व्हिस प्रोव्हायडरचा परवानाही निलंबित करण्यात आला आहे. याआधीही १५ दिवसांपुर्वीच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या खोपटा ग्रामपंचायतीच्या हद्दीत असलेल्या डीपी वर्ल्ड मल्टीमोडल लॉजिस्टिक्स प्रा.लि.कंपनीचा आयात-निर्यात परवानाही निलंबित करण्यात आल्याची कारवाई सीमा शुल्क विभागाकडून करण्यात आली आहे.

# घरफोडीतील सराईत चोरटे गजाआड

- १५० सीसीटीव्ही कॅमेरेद्वारा लागला छडा

**। खोपोली । प्रतिनिधी ।**



शिळफाटा डिसी नगरमधील घरफोडीत लाखो रूपयांची सोने-चांदी चोरीच्या घटनेने खोपोली शहरात खळबळ उडाली होती. कोणताही पुरवा उपलब्ध नसतानाही पोलिसांनीही हे आव्हान स्विकारत जवळपास १५० सीसीटीव्ही कॅमेरे तपासून पुण्यातून तीन आरोपींना गजाआड केले आहे. या आरोपींनी गुन्ह्यांची कबूली दिल्यानंतर त्यांच्याकडून १७ तोळे सोने व १२५० ग्रॅम चांदी जप्त करण्यात आली आहे. त्यांना दहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. यातील आरोपी विशाल तांदळे (२९) याच्यावर २७ गुन्हे, पप्पू देवकर (२९) याच्यावर ३ गुन्हे, तर गणेश माळवे याच्यावर १ गुन्हा वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विशाल तांदळे, पप्पू देवकर आणि गणेश माळवे यांनी रात्रीच्या वेळी खोपोलीतील डी.सी. नगरमधील जगदिश इंद्रमल परमार यांच्या घरात चोरी केली. त्यांनी कपाटांतून एकूण १२ लाख ७३ हजार रूपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने चोरले होते. या चोरीचा शोध रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभीजीत शिवथरे, उपविभागिय पोलीस अधिकारी विशाल नेहूल, खोपोली पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे पोलिस उपनिरिक्षक अभिजीत व्हरांबळे यांच्या पथकाने सुरु केला. यामध्ये रेकॉर्डवरील गुन्हेगार तपासणी करण्यात आली. परंतु, कोणतीही माहिती मिळाली नाही. त्यानतंर या तपासामध्ये खोपोली, खालापुर, लोणावळा, खंडाळा, कोंढवा, कुसगांव टोलनाका व खालापूर टोलनाका परीसरातील सुमारे १५० सीसीटिव्ही कॅमेरांचे फुटेज तपासणी करण्यात आली. त्यामध्ये चोरट्यांनी स्वीप्ट डिझायर कारचा वापर केला असल्याचे निष्पन्न झाले आणि ही कार मुंबईकडे गेल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे विशाल दत्तात्रेय तांदळे याला मंचर पुणे पोलीस स्टेशन हद्दीतून, योगेश गोयकर याला कोंढवा येथुन, तसेच या गुन्ह्यांतील चोरीच्या सोन्याचे दागिने खरेदी करणारा गणेश चंद्रकांत माळवे याला यवत येथून ताब्यात घेण्यात आले. यांच्यासह गुन्ह्यात सहभागी असणारे उर्वरीत आरोपी शाहू कोकरे व महेश मंगळवेढेकर यांचा तपास सुरु आहे.

# शाकीब पालटेवर कारवाईची मागणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील हलाल टाऊनशिपचा वाद समोर आल्यावर ममदापूरचे माजी सरपंच शाकिब पालटे यांनी समाज माध्यमांवर हिंदू लोकांचा अपशब्दाने उल्लेख केला. त्याबद्दल विश्व हिंदू परिषद आक्रमक झाली असून नेरळ पोलीस ठाण्यात संबंधितावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

नेरळ जवळील ममदापूर येथील एका बांधकाम व्यवसायिकाने सुरू केलेल्या 'सुकून एम्पायर' या गृहप्रकल्पची जाहिरात केली आहे. त्या जाहिरातीत हा प्रकल्प फक्त मुस्लिम धर्माच्या लोकांसाठी उभारण्यात येत असून त्यात हलाल जीवन पद्धतीचा अवलंब केल्याचा आरोप करण्यात येत आहे. संबंधित जाहिरात बांधकाम व्यावसायिकाकडून सोशल मीडियावर प्रसिद्ध करण्यात आली. सुकून एम्पायर या बांधकाम व्यावसायिकाकडून जातीय द्वेष पसरविल्याबदल त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी विश्व हिंदू परिषदेकडून करण्यात आली आहे. हा मुद्दा प्रसार माध्यमांतून जनतेसमोर आणल्यानंतर याबाबत ५ सप्टेंबर रोजी शाकीब पालटे यांनी एका प्रसार माध्यमाला मुलाखत दिली. त्यात त्यांनी, तुम्ही काय हिशोबाने डिक्लेअर करता की, हा मिनी पाकिस्तान आहे. मुस्लिमानांना राहण्याचा अधिकार नाही का? पुढे अपशब्द वापरत हेच येथे राहतील का? असे वाक्य बोलल्याचा आरोप विश्व हिंदू परिषदेने केला आहे.

### रिसॉर्टमधील प्रशासनाची कसून चौकशी करण्याची मागणी

# सुरक्षेच्या अभावामुळे म्हात्रे यांचा मृत्यू

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील किहीम येथील श्रीनिवास म्हात्रे यांचा स्विमींग पूलमधील मृत्यू संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे. रिसॉर्टमधील व्यवस्थापनेने योग्य सुरक्षेची दखल न घेतल्याने हा अपघात घडला असल्याचे बोलले जात आहे. फार्म हाऊसमधील व्यवस्थापनाच्या निष्काळजीपणामुळे मृत्यू झाल्याची चर्चा सध्या जोर धरत आहे. रिसॉर्टमधील प्रशासनाची कसून चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत आहे. त्यामुळे अलिबाग पोलीस काय भुमिका घेणार, याकडे लक्ष लागून राहिले आहे.



थळ येथील बीच वॉक रिसॉर्ट भाड्याने घेतले असून विनोद गुप्ता नामक व्यक्ती हा रिसॉर्ट चालवित आहे. थळमधील बीच वॉक या रिसॉर्टमध्ये रविवारी (दि.७) श्रीनिवास म्हात्रे नातेवाईकांसमवेत गेले होते. तेथील स्विमींग पुलमध्ये पोहण्यासाठी श्रीनिवास म्हात्रे पाण्यात उतरले. मात्र, काही वेळातच त्यांना विजेचा झटका लागून ते पाण्यात बेशुध्द झाले. ही बाब तेथील नागरिकांच्या लक्षात आल्यावर त्यांना अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी नेले. परंतु, तेथील डॉक्टरांनी ते अगोदरच मृत झाल्याचे घोषित केले. त्यामुळे श्रीनिवास म्हात्रे यांच्या मृत्यूबाबत संशय व्यक्त केला जात आहे. रिसॉर्टमधील व्यवस्थापनाकडून निष्काळजीपणा केल्याने म्हात्रे यांचा मृत्यू झाल्याचा आरोप केला जात आहे.

यापुर्वी देखील या रिसॉर्टमधील स्विमींगपुलमध्ये विजेच्या झटक्याने मृत्यू झाल्याची घटना घडली होती. अशाच प्रकारची घटना वारंवार होत असताना पर्यटकांच्या सुरक्षेबाबत योग्य दखल न घेतल्याने श्रीनिवास म्हात्रे यांचा मृत्यू झाल्याचा आरोप होत आहे. रिसॉर्टमधील व्यवस्थापन म्हात्रे यांच्या मृत्यूला कारणीभूत असल्याची चर्चा जोर धरत आहे. रिसॉर्टमधील स्विमींग पुलमध्ये पोहण्यास येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेची काळजी घेणे आवश्यक असताना ती घेण्यात आली नसल्याची बोलले जात आहे. त्यामुळे कसून चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

> **किहीम येथील श्रीनिवास म्हात्रे यांच्या अपघाती मृत्यूमुळे मोठी शोककळा पसरली आहे. रिसॉर्टमधील व्यवस्थापनाने पर्यटकांच्या सुरक्षेची काळजी घेणे गरजेचे असताना ती घेताना दिसून आली नाही. त्यामुळे या प्रकरणाची योग्य ती चौकशी झाली पाहिजे. कुटुंबाला योग्य न्याय मिळावा अशी मागणी आहे.**
> **– ॲड. मानसी म्हात्रे, शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख**

## कुणबी समाजाला प्रमाणपत्र देण्याची मागणी

**कोलाड :** सरकार जर मराठवाड्यातील मराठा समाजाला हैदराबाद ग्रॅजेटप्रमाणे कुणबी प्रमाणपत्र देत असेल, तर कोकणातील कुणबी समाजालासुद्धा कुणबी प्रमाणपत्र मिळाळे पाहिजे. यासाठी अनेक मोर्चे काढले गेले तरी त्यांची मागणी मान्य झाली नाही. त्यामुळे कोकणवासियांवर शासन अन्याय करत असल्याची खंत कोलाड येथील सामाजिक कार्यकर्ते विश्वास बागुल यांनी व्यक्त केली आहे. कोकणात असणारा कुणबी समाजालाही हैदराबाद गॅजेटप्रमाणे एक गावात एक कुणबी असल्यास शासकीय अधिकाऱ्यांमार्फत सर्वे करून कुणबी प्रमाणपत्र वितरित करा, यासंदर्भात लेखी निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येणार असल्याची माहिती विश्वास बागुल यांनी दिली.

# उमर खालिदचा धडा

महाराष्ट्र सरकारने केलेल्या जनसुरक्षा कायद्याला विरोध केला जात आहे. शेकापसह सर्व विरोधी पक्षांच्या या संदर्भात बैठका सुरु असून नजीकच्या काळात आंदोलनेही होतील. हा कायदा किती भयंकर होऊ शकतो याचे उदाहरण दिल्ली दंगलीच्या खटल्याच्या निमित्ताने सर्वांच्या समोर आहे. या दंगलींचा कट रचल्याचा आरोप करून विद्यार्थी नेता उमर खालिद व त्याच्या सहकाऱ्यांना पाच वर्षांपूर्वी अटक करण्यात आली. तेव्हापासून ते तुरुंगात असून त्यांच्याविरुध्दचा खटला चालू झालेला नाही. उमर व इतरांनी जामिनासाठी केलेला अर्ज दिल्ली उच्च न्यायालयाने अलिकडेच फेटाळला. कहर म्हणजे या जामीन अर्जाची सुनावणी तीन वर्षे चालू होती. २०२२ मध्ये दाखल केलेल्या अर्जावर गेल्या आठवड्यात निकाल देण्यात आला. उमर व इतरांवर यूएपीए अंतर्गत दावा दाखल आहे. हा आपल्या जनसुरक्षा कायद्याचा दिल्लीतला मोठा भाऊ आहे. यामध्ये आपण निर्दोष आहोत हे आरोपीला सिध्द करावे लागते. म्हणजे पोलिसांनी खटला दाखल केला की पोलिसांची बाजू बरोबरच आहे असे मानून कोर्ट चालते. कायद्यानेच त्यांना तशी मुभा दिलेली आहे. इतर साध्या खटल्यांमध्ये जामिनाच्या अर्जावर विचार करताना न्यायालय दोन-तीन गोष्टी पाहते. एक म्हणजे आरोपीविरुध्दचे दाखल गुन्हे किती गंभीर आहेत, दुसरे- पोलिसांकडचा पुरावे प्रथमदर्शनी कितपत बळकट आहेत आणि आरोपीला जामिनावर सोडले तर तो साक्षीदारांवर प्रभाव टाकण्याची कितपत शक्यता आहे. याबाबत सर्वोच्च न्यायालयाने अनेकदा असे निकाल दिले आहेत की, आरोपीला तुरुंगात ठेवणे हा अपवाद असायला हवा. म्हणजेच बहुतेक प्रकरणांमध्ये आरोपपत्र दाखल झाले की जामीन मिळणे हा आरोपीचा हक्क मानला जायला हवा. यूएपीए कायद्याच्या तरतुदी अशा काही भयंकर आहेत की आरोपीचे हे हक्क बाद ठरतात. मुळात पोलिस जेव्हा या कायद्याखाली अटक करतात तेव्हा नेमक्या कोणत्या आरोपाखाली व कलमानुसार अटक केली गेली आहे हे सांगण्याचे देखील बंधन पोलिसांवर नाही. म्हणजे पोलिसांच्या मनात आले तर ते कोणालाही या कायद्याखाली उचलून आणू शकतात.

## बोगस साक्षींवर भरोसा

दुसरी बाब अशी की, आरोपपत्र दाखल केल्यानंतरही पुरावे, साक्षीदार याबाबत पोलिसांना गुप्तता पाळता येते. त्यामुळे आरोपी देशद्रोहाचे कृत्य करीत असल्याचे आमच्याकडे भक्कम पुरावे आहेत असे पोलिसांनी केवळ सांगितले तरी त्यावर विश्वास ठेवून न्यायालय आरोपीला जामीन नाकारू शकते. उमर खालिदच्या प्रकरणामध्ये नेमके हेच घडते आहे. उमर खालिद हा जवाहरलाल नेहरु विद्यापीठातील डाव्या कम्युनिस्ट विचारांचा लोकप्रिय विद्यार्थी नेता होता. भाजपप्रणीत अभाविप या विद्यार्थी संघटनेला त्याने जेएनयूमध्ये चांगलेच नेस्तनाबूत केले होते. त्याच बदला म्हणून पहिल्यांदा त्याच्यावर २०१६ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. काश्मीर आझाद करण्याच्या घोषणा त्याने व सहकाऱ्यांनी दिला असा हा खटला होता. तो पूर्णपणे खोटा होता. २०२० मध्ये केंद्र सरकारच्या नागरिकत्व कायद्याच्या म्हणजे सीएएच्या विरोधात दिल्लीत शाहीनबाग येथे आंदोलन झाले होते. यात त्याचा सहभाग होता. त्यानंतर दिल्लीत दंगल उसळली होती व त्यात ५३ जण मारले गेले होते. ही दंगल घडवण्याचा कट रचल्याप्रकरणी उमर व त्याच्या सहकाऱ्यांना अटक केली गेली. तेव्हापासून ते तुरुंगात असून पाच वर्षे झाली तरी त्या खटल्याची सुनावणी सुरुही झालेली नाही. पोलिसांनी उमरविरुद्ध सादर केलेले पुरावे दोन प्रकारचे आहेत. एक म्हणजे तो एका व्हॉटसॅप ग्रूपचा सदस्य होता जिथे सरकारला धडा शिकवण्याची भाषा काही लोकांनी केली होती. लक्षात घ्या, उमरने ही भाषा केलेली नव्हती. दुसरे म्हणजे असा कट रचला जात असून शस्त्रे व पैशांची जमवाजमव चालू असल्याचे आपण ऐकले असे कोणातरी हॉटेलच्या डिलिव्हरी बॉयकडून पोलिसांनी वदवून घेतले आहे. या साक्षीदाराची ओळख संरक्षित ठेवण्यात आली आहे. त्यामुळे त्याचे म्हणणे तपासून पाहण्यासाठी उमरच्या वकिलांकडे कोणतेही साधन नाही. साहजिकच न्यायालय पोलिसांच्या पुराव्यांवर डोळे झाकून विश्वास ठेवत असून त्याचा प्रतिवाद करण्यासाठी आरोपीच्या वकिलांना कोणतीही संधीच नाही अशी ही स्थिती आहे. लोकशाहीतील न्यायाच्या साध्या तत्वांना धाब्यावर बसवणारा हा प्रकार आहे.

## न्याययंत्रणेबाबत संशय

दंगल झाली तेव्हा उमर दिल्लीमध्ये नव्हता. त्याने शस्त्रे किंवा पैसे जमवण्यासाठी मदत केल्याचे कोणतेही पुरावे नाहीत. त्याने हिंसाचाराची थेट चिथावणी दिल्याचे एकही वाक्य पोलिसांकडे नाही. हे सर्व पोलिसांनी मान्य केलेले आहे. तरीही उमर हा व्यापक कटाचा सूत्रधार होता असा दावा ते करीत आहेत व न्यायालय त्यावर विश्वास ठेवते आहे. पोलिस हे तर सरकारच्या इशाऱ्यावरून असे खोटेनाटे खटले टाकत असतातच. अनेक प्रकरणांमध्ये ते दिसून आले आहे. पण न्याययंत्रणेने अशा पोलिसांना संरक्षण द्यावे हे धक्कादायक आहे. उमरविरुध्द आरोपपत्र दाखल झाल्यानंतर त्याने २०२२ मध्ये रीतसर जामिनासाठी अर्ज केला. वास्तविक जामिनाच्या अर्जाची सुनावणी कोणत्याही उच्च न्यायालयात तातडीने घेतली जाते. पण दिल्ली उच्च न्यायालयाच्या तत्कालीन न्यायमूर्तींनी सात महिने ही सुनावणी घेतलीच नाही. मग या न्यायमूर्तींनाही बढती मिळून ते दुसऱ्या राज्यात मुख्य न्यायाधीश झाले. मग उमरचा अर्ज ज्या दुसऱ्या न्यायमूर्तींसमोर आला त्यांनीही हेच केले. त्यांनाही बढती मिळाली. आता तिसऱ्या न्यायमूर्तींनी सुनावणी पूर्ण केली, पण कित्येक महिने निर्णय राखून ठेवला. आता त्यांनी अखेरीला निर्णय दिला व ते निवृत्त झाले. आता निवृत्तीनंतर त्यांना कदाचित एखादे पद दिले जाईल. या जामीन अर्जाच्या अंतिम सुनावणीच्या वेळी जी प्रश्नोत्तरे झाली ती भयंकर होती. पाच वर्षे कोणत्याही खटल्याशिवाय आपला अशील तुरुंगात असल्याचे उमरच्या वकिलांनी सांगितले. त्यावर देशविरोधी कारवाया करणाऱ्यांना खटल्याचा निकाल लागेपर्यंत असेच तुरुंगात सडत राहायला हवे असे उद्गार सरकारचे वकील तुषार मेहता यांनी काढले. इतकी वर्षे आरोपी तुरुंगात आहे हा जामिनासाठीचा आधार असू शकत नाही असेही ते म्हणाले. कहर म्हणजे न्यायालयानेही त्यांना अटकाव केला नाही. याचाच अर्थ, एखाद्यावर सूड घेण्यासाठी किंवा तो अमुक धर्माचा वा पक्षाचा आहे म्हणून त्याला सरकार तुरुंगात टाकू शकते व नंतर कितीही काळ सडवू शकते. वाईट म्हणजे दिल्ली उच्च न्यायालयासारखी मोठी न्यायालयेही पोलिसांना मूकपणे साथ देत राहतात. दिल्ली दंगलीमध्ये मारले गेलेल्यांमध्ये ७५ टक्के लोक मुस्लिम आहेत. तरीही या खटल्यातले बहुतांश आरोपी मुस्लिम आहेत. प्रत्यक्ष दंगलीचे ज्यांच्यावर गुन्हे होते त्यातले ८० टक्के आरोपी खटल्यातून निर्दोष सुटले आहेत. म्हणजे पोलिसांना ते खटलेदेखील चालवता आलेले नाहीत. पण कटाचा सूत्रधार असल्याचा आरोप असलेल्याला मात्र तुरुंगात सडवले जात आहे. जनसुरक्षामध्ये हेच घडण्याचा धोका आहे.

## विचार

# पितृऋणाला आदरांजली

***सांपत्तिक, आध्यात्मिक, वैचारिक संस्कार यांच्या पाठबळावरच प्रत्येकाचा जीवनपट आकार घेतो. म्हणूनच पूर्वजांचे उपकार, उपदेश, दूरदृष्टी, आपल्याला उपकृत करत असते. अशा या उपकाराची जाणीव ठेवून त्यांच्याप्रती आदरांजली व्यक्त करणारा पितृपंधरवडा विशेष ठरतो. समाजातला एक वर्ग या काळात नवी खरेदी, मंगल कार्याचा शुभारंभ करत नाही. पण हळूहळू या समजुतीत बदल घडत आहे.***

वैष्णवी कुलकर्णी

विश्वाच्या या प्रांगणात आपलं अस्तित्व किती क्षणभंगूर आहे याची नेमकी जाणीव सामान्य माणसाला आहे. आपली वाटचाल सुकर करण्यास, जगणं सुसह्य करण्यास पूर्वजांची पुण्याई कशा प्रकारे साह्यभूत ठरते याची त्याला कल्पना आहे. त्यामुळेच मनुष्य हा आपल्या वंशावळीचा सार्थ अभिमान असणारा आणि पूर्वजांचं पावन स्मरण ठेवणारा जीव आहे. जगभरातला प्रत्येक समाज कोणत्या ना कोणत्या पद्धतीने आपल्या पूर्वजांप्रती आदरांजली व्यक्त करताना दिसतो. एकत्र येऊन घरातल्या दिवंगतांना श्रद्धांजली अर्पण करताना दिसतो. आपल्याकडे पितृपंधरवड्यामध्ये पितृकर्मं पार पाडून ही प्रथा जपली जाते. आधीच्या पिढीने लावलेल्या रोपांचे वृक्ष होऊन त्याची मधुर फळं पुढच्या पिढीने चाखावीत; त्याच पद्धतीने आधीच्या लोकांनी घेतलेल्या कष्टांमुळेच आजच्या पिढीचं जगणं सुकर होत असतं. सांपत्तिक, आध्यात्मिक, वैचारिक तर कोणी कलासक्तीचे संस्कार देऊन पुढच्या पिढीसाठी समृद्ध पार्श्वभूमी तयार केलेली असते. काही अपवाद वगळता बहुतांश लोक या पूर्वपिठीकेवरुनच आपला जीवनपट सुरू करतात आणि आपल्या कामगिरीने तो रंगवतात. म्हणूनच पूर्वजांचे उपकार तसंच उपदेश दूरदृष्टी, गुणग्राहकता आणि द्रष्टेपणा आपल्याला उपकृत करत असतो. अशा या उपकाराची जाणीव ठेवून त्यांच्याप्रती आदरांजली व्यक्त करणारा पितृपंधरवडा विशेष ठरतो.

शास्त्राने सांगितलेले श्राद्धविधी या पंधरा दिवसांमध्ये पार पडतात, ते शक्य नसल्यास यथाशक्ती दानकर्म केलं जातं. सध्या गरजूंना आवश्यक त्या स्वरुपात मदत करुनही लोक पितृऋणाचा मान ठेवताना दिसतात. त्यामुळेच आता एकीकडे पारंपरिक पद्धतीने तर दुसरीकडे आधुनिक जाणिवांनिशी या पंधरा दिवसांकडे पाहिलं जातं. पण उपचार कुठलेही असले तरी ते करताना स्वर्गवासी पूर्वजांचं स्मरण असतंच. पूर्वी हे दिवस शुभकार्यासाठी निषिद्ध मानले जायचे. आजही बऱ्याच अंशी ही समजूत कायम आहे. त्यामुळे या दिवसांमध्ये कोणी आवर्जून शुभकार्य पार पाडताना दिसत नाही, पण तत्पश्चात सुरू होणाऱ्या उत्सवपर्वाची आणि त्यानंतरच्या लग्नसराईची पूर्वतयारी म्हणून हा काळ भलताच उपयुक्त ठरतो. श्रावणसोहळा आणि गणेशसोहळा आटोपल्यानंतर एक उसंत देणारे हे दिवस काहीसे संथ असतात असं काही लोक म्हणतात. कारण ते उत्सवसाखळी खंडित करणारे असतात. सणावारांच्या निमित्ताने महिनाभरापेक्षा अधिक काळ उत्सवी वातावरण अनुभवल्यानंतर पितरांच्या स्मरणाने हळवं करणारे असतात. मात्र पूर्वजांचे आशीर्वाद लाभले तर पुढे सगळं चांगलंच होईल ही आश्वस्तताही मोलाची असते. म्हणूनच आजच्या धकाधकीच्या काळातही पितरांना समर्पित असणारे पंधरा दिवस रुढीनुसार पार पडतात.



पुर्वजांनी मानवी वर्तणुकीचे नियम लिखित स्वरूपात घालून दिले. यालाच उपनिषदं, वेद, पुराण अशा नावांनी संबोधलं गेलं. या रूपरेषेवरून चालणं हे काही काळासाठी शक्य असलं तरी स्वत:ला सदा सर्वकाळ या नियमांमध्ये बांधणं शक्य नसतं. अशा वेळी या नियमांचा गरजेपुरता संदर्भ घेतला जातो आणि कार्य पार पाडलं जातं. स्वातंत्र्य आणि प्रलोभनं यांच्यामध्ये मानवी मन गुरफटत जातं आणि म्हणूनच अंतिम सत्याकडे डोळेझाक होऊ लागते. मानव बुद्धीसामर्थ्याच्या जोरावर उत्तम आरोग्य सुविधा निर्माण करतोच पण मृत्यूला जिंकण्याचेही मनसुबे रचतो. आयुष्यभरात जोडलेले आसपासचे नातेसंबंध त्याला अंतिम क्षणी मोहात पाडतात. आयुष्याच्या कातरवेळी तो गतकाळातल्या स्मृतींमध्ये रममाण होताना दिसतो. मृत्यूनंतर आपण सगे-सोयऱ्यांपासून लांब जाणार आहोतच, याशिवाय हा प्रवास आपल्याला एकट्याने करावा लागणार या जाणिवेने तो जास्त अस्वस्थ होत राहतो. मानवी जीवनातल्या प्रत्येक महत्वाच्या घटनेचे सोहळे साजरे केले जातात. या सोहळ्यात मृत व्यक्तीच्या संदर्भात असलेल्या सोहळ्यांचाही समावेश असतो. दु:खाची किनार असणारा हा सोहळा प्रियजनांच्या मरणोत्तर शांतीसाठी जड अंत:करणाने का होईना, पार पाडला जातो. भारतीय संस्कृतीमध्ये जिवंत व्यक्तीबरोबरच मृतात्म्यांच्या भावनांचाही विचार केला जातो. पितरांनी त्यांच्या मृत्यूनंतरही आपल्यावर कृपा करत रहावी, या सहज विचारसरणीतून पितृपक्षात घरातील मृत व्यक्तींसंबंधीची पितरकर्मं करण्याची प्रथा निर्माण केली गेली असावी.

'मृत्यूनंतरचा प्रवास' या संकल्पनेमुळेच मृत व्यक्तीचे श्राद्ध करणे, त्यांना तर्पण करणे या प्रथा आढळतात. भाद्रपदातला कृष्णपक्ष हा श्राद्धपक्ष किंवा पितृपक्ष मानला जातो. या पंधरवड्यात आपल्या पूर्वजांचे, पितरांचे स्मरण करून ते ज्या योनीत असतील तिथे सुख-शांती मिळावी म्हणून प्रार्थना केली जाते. धार्मिक कृत्यांच्या प्रथेनुसार श्राद्धाच्या दिवशी पितृदान तर्पण केले जाते. या कार्यानिमित्त घरातील सगळे एकत्र येतात, एकत्र बसून दोन घास खातात. यशाशक्ती दानकर्म पार पडते. हयात नसलेल्यांच्या आठवणी निघतात. एक प्रकारे हा पांगलेल्या कुटुंबाला एकत्र आणण्याचा उपचारही ठरतो. आता हयात नसलेल्या शरीरांनी पूर्वी या आप्तेष्टांमधला दुवा म्हणून काम केलेले असते. त्यांनी कुटुंबाची ही मोळी बांधून ठेवलेली असते, मोळी एकत्र टिकवून ठेवलेली असते पण गाठ सैल होताच मोळीतली काष्ठं विखुरण्यास वेळ लागत नाही. कदाचित हीच अप्रिय बाब टाळण्यासाठी आणि घरातील सर्वांना आपल्या मूळ वृक्षाच्या सयीच्या सावलीत पुन्हा एकत्र आणण्यासाठी या कर्माचं प्रयोजन असावं. कारण अगदी आत्ता-आत्तापर्यंत लोक एक वेळ सणाला एकत्र येत नसत पण घरातील पितृकर्माला आवर्जून उपस्थित रहात असत.

आधुनिक युगात पितृकर्माच्या रितींवर प्रत्येकाचा या सर्व कृतींवर विश्वास असेलच किंवा त्यासाठी पुरेसा वेळ देणं शक्य होईलच असं नाही. पितरांच्या उपकारांची उतराई होण्याचा सोहळा म्हणजे पितृपक्ष पंधरवडा. पितरांचं एखादं अपुरं ध्येय पुत्राने अगर कन्येने पूर्ण करण्याची जबाबदारी आनंदाने स्वीकारल्याने पिता अगर माता निश्चितपणे संतुष्ट होतील. हे करत असताना पुत्राला अगर कन्येलाही समाधान मिळेल. पितरांची आठवण करण्याचे हे दिवस पवित्र मानले पाहिजेत. आपल्यालाही पितरांप्रमाणे एक दिवस जायचं आहे, याचं भान याच दिवसात मनावर ठसलं जातं. या भूतलावर आपल्याला मिळणारा वेळ विधायक कामांसाठी वापरावा याचं भान येतं. या श्राद्धपक्षात सत्कृत्याचे पाथेय बांधण्याची मनाची जिद्द वाढते. एकदा सत्कृत्याचे पाथेय बांधण्याचा निश्चय केला की जीवन अधिकाधिक क्रियाशील बनतं. कदाचित हा धडा देण्यासाठी या पंधरवड्याचं प्रयोजन केलं असावं.

हा काळ अनेकदा अनिष्ट समजला जातो. या काळात नवी खरेदी, मंगल कार्याचा शुभारंभ केला जात नाही. समाजातला एक वर्ग अजूनही या काळाला नाकं मुरडतो. पण हळूहळू समाजाच्या समजुतीत बदल घडू लागला आहे. समाज जुन्यासोबत नव्या विचारांची गुंफण करून नवी विचारधारा प्रवाहीत करत आहे. त्यामुळे या काळातही काही नवीन कामांचा श्रीगणेशा होतो. या काळात बऱ्याच घरांमधून कर्मकांडाचा अतिरेक न करता विशिष्ट तिथीला दानधर्म करणं, वृद्धाश्रमात अथवा अनाथालयात अन्नदान वा इतर वस्तूंचं दान करणं, गरजू विद्यार्थ्यांना मदत करणं ही स्तुत्य कर्मं पार पाडली जातात. समजुतीने घेतलेलं हे चांगलं वळण आहे, असं म्हणावं लागेल. आपल्यातून गेलेल्या व्यक्तीचं मरणोत्तर जग आभासी आहे, आपल्या कल्पनेच्या पलीकडलं आहे. त्याला ओढून ताणून आपल्या जगात आणण्यापेक्षा या जगात, आपल्याबरोबर राहणाऱ्या पण जाणिवा मृतवत झालेल्या लोकांच्या आयुष्यात आशेचा एक किरण आणणं हे पितरकर्म नसेल कदाचित, पण मनुष्यकर्म नक्कीच आहे. या आयुष्यात मनुष्य म्हणून जगताना मनुष्यकर्म करणंही पुरेसं आहे. हे करत राहिलं तर आयुष्याच्या अखेरीस संध्याछाया दाटून आली तरी जीव कासावीस होणार नाही, काय केलं या सोन्यासारख्या आयुष्यात, असा व्यथित करणारा प्रश्न भेडसावणार नाही. संधी असूनही लोकांशी चांगलं वागू शकलो नाही ही खंत त्रास देणार नाही. उलटपक्षी, यमदूताच्या स्वागताला तनाबरोबर मनानंही आपण सिद्ध असू. मिळालेल्या आयुष्याबद्दल कृतार्थता आणि आत्तापर्यंत केवळ कथांमधून ऐकलेल्या स्वर्गनगरीच्या प्रवासाला सिद्ध असू.

## चर्चा आजची

# आंदोलनाच्या आड सरकारवर रोष?

संतोष राऊळ

नेपाळचे पंतप्रधान केपी ओली यांनी ४ सप्टेंबरपासून देशात सोशल मीडिया ॲप्सवर बंदी घातल्यामुळे देशभरात मोठा गोंधळ उडाला आहे. या बंदीविरोधात राजधानी काठमांडूसह अनेक शहरांमध्ये हजारो तरुणांनी हिंसक निदर्शने केली. यादरम्यान शेकडो तरुण नेपाळच्या संसदेत घुसले. त्यांना रोखण्यासाठी पोलिसांना अश्रुधुराचा आणि गोळीबाराचा वापर करावा लागला. परिस्थिती पाहता काठमांडूमध्ये कर्फ्यू लागू करण्यात आला होता. मात्र, पोलीस आणि आदोलकांच्या हातापायीत २० पेक्षा जास्त जणांना आपला प्राण गमवावा लागला. दुसऱ्या दिवशी देखील या आंदोलना हिंस्र स्वरूप आल्याने येथील नेत्यांची घरे देखील जाळण्यात आली. त्यामुळे सोशल मिडीया बंदी हे आंदोलन करण्याचे निमित्तमात्र ठरले असून, या निमित्ताने येथील तरूणांनी विद्यमान सरकारवर रोष दाखवला असल्याची चर्चा रंगली आहे. असाच रोष भारत देशात देखील उद्‌भवू शकतो, असे जाणकरांकडून बोलले जात आहे.

नेपाळ सरकारने फेसबुक, इंस्टाग्राम, यूट्यूब, व्हॉट्सॲप, रेडिट आणि एक्स सारख्या २६ सोशल मीडिया ॲप्सवर बंदी घातली. नेपाळ सरकारचे म्हणणे आहे की, या कंपन्या जेव्हा नेपाळमध्ये त्यांचे कार्यालये उघडतील, सरकारकडे नोंदणी करतील, तक्रारी ऐकण्यासाठी लोकांची नियुक्ती करतील, तेव्हाच ही बंदी उठवली जाईल. टिकटॉक आणि व्हायबरने सरकारच्या सूचनांचे पालन केले, म्हणून त्यांच्यावर बंदी घातली नाही. दरम्यान, नेपाळ सरकारने त्यांना नोंदणीसाठी सात दिवसांची मुदती दिली होती; मात्र, कंपन्यांनी सरकारच्या सूचनांकडे दुर्लक्ष केल्यामुळे बंदीचा निर्णय घेण्यात आला. मात्र, हा निर्णय देशातील हजारो तरुणांना आवडलेला नाही. राजधानी काठमांडूच्या रस्त्यांवर



सोमवारी मोठ्या प्रमाणात तरुणांनी निदर्शने केली. सरकारविरोधात घोषणा देण्यासोबतच निदर्शकांनी नेपाळच्या संसदेत घुसण्याचा प्रयत्न केला. हे पाहून पोलिसांना अश्रुधुर, पाण्याचा फवारा आणि हवेत गोळीबार करावा लागला. यामध्ये २० पेक्षा जास्त जणांचा मृत्यू झाला असून ३०० पेक्षा जास्त जण जखमी झाल्याची माहिती समोर येत आहे. निदर्शनादरम्यान सरकारने फोन आणि इंटरनेट सेवा खंडित केली. दरम्यान, सरकारच्या या निर्णयाला अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर हल्ला म्हटले जात आहे. तसेच, ही बंदी सरकारविरोधातील राग आणि भावना दडपण्याचा प्रयत्न असू शकतो, असेही बोलले जात आहे.

यानंतर थेट नेपाळचे गृहमंत्री रमेश लेखक यांनीच राजीनामा दिला आणि नेपाळ सरकारने सोशल मीडियावर घातलेली बंदी हटवली. आतापर्यंत गृहमंत्री, कृषी मंत्र्यांसह अनेक मंत्र्यांनी राजीनामा दिला आहे. दरम्यान, आक्रमक झालेल्या आंदोलकांकडून मंगळवारी मंत्र्यांची घरे पेटवली गेली. त्यातच देशाचे पंतप्रधान के.पी.शर्मा ओली यांनी देखील राजीनामा दिला आहे. हे देखील नेपाळमधून बाहेर जाऊ शकतात, अशी चर्चा रंगली आहे. तसेच, नेपाळचे आयटी मिनिस्टर पृथ्वी सुब्बा गुरुंग यांच्या घराला आग लावण्यात आली आहे. तर, उपपंतप्रधान, अर्थमंत्री विष्णु पौडेल यांच्या घरावरही हल्ला झालेला आहे.

नेपाळमध्ये जेनझींच्या आंदोलनाची तीव्रता मोठी आहे. कर्फ्यू लागू केला असला तरीही तरुणाई मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर उतरली आहे. त्यांनी थेट संसद भवनाकडे कूच करत त्याला देखील आग लावली आहे. दरम्यान, या आंदोलनामागे बालेन शाह नामक व्यक्तीचा हात असल्याची चर्चा होताना दिसत आहे. तसेच, आंदोलनकर्ते बालेन शहा यांची तुलना थेट पंतप्रधानांसोबत करत आहेत. त्यामुळे देशात या व्यक्तिचा क्रेझ किती आहे, हे लक्षात येते. त्यामुळे सोशल मिडीया बंदी हे निमित्त मात्र ठरले असून, आंदोलकांचा सुत्रधार त्यावर आपळी पोळी भाजून घेण्याच्या प्रयत्नात तर नाही ना, अशी चर्चा देखील मोठ्या प्रमाणात रंगत आहे.

या आधी भारताच्या शेजारील देशांत म्हणजेच श्रीलंका, बांगलादेश आणि पाकिस्तानमध्ये अशा प्रकारची आंदोलने होऊन सरकार पाडल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यातच आता नेपाळमध्ये हिसंक आंदोलन सुरू आहे. त्या ठिकाणी ज्या कारणांनी आंदोलने झालीत तीच एक ना अनेक कारणे आपल्या भारत देशात देखील आहेत. मात्र, या ठिकाणी अद्याप अशी घटना घडलेली नाही. भारत देश हा प्रगत देश आहे. परंतु, येत्या काही दिसवांत भारतात देखील अशी घटना घडू शकते, असा अंदाज जाणकरांकडून वर्तविला जात आहे. त्यामुळे विद्यमान सरकारने वेळीच शहाणे बनून आधिच यावर उपाययोजना करण्याची गरज असल्याचे बोलले जात आहे. कारण भविष्यात अशी घटना घडली आणि सरकारवर संकट आले तर ते सुरक्षित ठिकाणी पळून जातील. मात्र, श्रीलंका, बांगलादेश, पाकिस्तान आणि आता नेपाळ सारखी सर्वसामान्य जनता यात भरडली जाईल, हे नक्की.

## लोकसंसद

### अनधिकृत फलकबाजीचा विद्रूप चेहरा

मुंबई महानगरपालिकेने दोन दिवसांत तब्बल साडेसात हजार अनधिकृत फलक काढल्याची बातमी प्रसिद्ध झाली. ही आकडेवारीच न्यायालयाच्या आदेशाची पायमल्ली किती मोठ्या प्रमाणात चालते याचे निदर्शक आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राजकीय, धार्मिक आणि व्यावसायिक जाहिरातींचे फलक उभे राहतात. यामध्ये सर्वाधिक आघाडी राजकीय पक्षांची असते. बंदी असूनही अशी फलकबाजी सुरू राहते, याचा अर्थ कायदा अंमलबजावणीपेक्षा शक्तिप्रदर्शनाला प्राधान्य दिले जाते. या फलकांवर लाखो रुपयांची उधळण होत असते, पण तो पैसा समाजोपयोगी उपक्रमांवर खर्च करण्याचा कोणी विचार करत नाही. उलट हे फलक रस्त्यांवर अडथळे निर्माण करतात, अपघातांना कारणीभूत ठरतात आणि शहराचे सौंदर्य बिघडवतात. महानगरपालिकेची कारवाई कौतुकास्पद असली तरी ती सातत्याने आणि कठोरपणे होणे गरजेचे आहे. फलक लावणाऱ्यांवर तसेच छपाई करणाऱ्यांवर थेट गुन्हे दाखल झाले तरच या विकृतीला आळा बसेल. गणेशोत्सव हा श्रद्धा, ऐक्य आणि संस्कृतीचा उत्सव आहे; तो फलकबाजीतून विद्रूप होऊ नये हीच अपेक्षा.

**– दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

### यंदाही उंच गणेशमुर्त्या समुद्र किनाऱ्यावरच!

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी अनंत चतुर्दशीच्या दुसऱ्या दिवशी गिरगाव चौपाटीच्या किनाऱ्यावर कितीतरी उंच गणेशमूर्त्या विसर्जनाविना उभ्या होत्या तर कितीतरी मुर्त्या किनाऱ्यावर कोसळून छिन्न विच्छिन्न अवस्थेत पडलेल्या होत्या. ज्या श्री गणेशाला दहा दिवस मनोभावे पुजले जाते, त्याच्या चरणी नवस केले जातात, त्याच्या आगमनासाठी सुंदर सजावट केली जाते, वाजत गाजत त्याची मिरवणूक काढली जाते अशा गणेश मूर्तींची झालेली अवहेलना पाहून मनाला वेदना होतात. उंच मुर्त्यांचे दर्शन घेण्यासाठी देश विदेशातून लाखो भाविक दरवर्षी मुंबईत येत असतात. मात्र याच उंच मुर्त्या दुसऱ्या दिवशी समुद्राच्या किनारी पाहिल्यावर गणेश मूर्ती ही शोभेची आणि प्रदर्शनाची वस्तू बनू लागली आहे का असा प्रश्न पडतो. यंदा भरती ओहोटीच्या अंदाज चुकल्याने दरवर्षी सकाळी १० वाजेपर्यंत होणारे लालबागच्या राजाचे विसर्जन यंदा १० तास लांबले तरीही लालबागच्या राजा मंडळाने बाप्पाचे नेहमीप्रमाणेच साजेसे विसर्जन केले. मग उंच मुर्त्या आणणारे या मुर्त्यांचे खोल समुद्रात विसर्जन का करत नाहीत. मंडळाकडे तेव्हढे कार्यकर्ते नाहीत, किंवा भांडवल नाही तर ही मंडळे उंच मुर्त्या तरी का आणतात? अनंत चतुर्दशीला अनेक मंडळे बाप्पाच्या चरणाला पाणी लागले की तेथून पळ काढतात. भरती सरल्यावर या उंच मुर्त्या किनाऱ्यावर उभ्या असलेल्या पाहायला मिळतात.

**– सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी**

## दिनविशेष

# साखरचौथ गणपती उत्सव

गणपती बाप्पांचे मोठ्या थाटामाटात घरोघरी स्वागत झाले, तसेच सार्वजनिक गणेश मंडळातही धुमधडाक्यात बाप्पा विराजमान झाले होते. गेल्या १० दिवस सर्वत्र गणेशोत्सवाची धूम पाहायला मिळाली. घरोघरी आणि मोठ्या शहरातही गणेशोत्सावाचा उत्साह पाहायला मिळाला. मात्र, भावूक वातावरणात बाप्पांना निरोपही देण्यात आला.दीड दिवस, ५ दिवस, ७ दिवस बाप्पांची पूजा करुन अनंत चतुर्दशी दिवशी देशभरातील गणपती बाप्पांचे विसर्जन करण्यात आले. प्रशासनाने बांधलेल्या कृत्रिम



ठिकाणी, तसेच समुद्र, तलाव आणि विविध जलाशयांत बाप्पांचे विसर्जन करण्यात आले. गणपती बाप्पांचे विसर्जन झाल्यानंतर कोकणात साखर चौथ गणेशोत्सव साजरा करण्याची पद्धत आहे. यावेळी, गणपती बाप्पांचे वाजत गाजत घरी स्वागत केले जाते. अनंत चतुर्थीचे गणपती विसर्जन झाल्यानंतर येणाऱ्या पहिल्याच संकष्ट चतुर्थीला साखर चौथ गणेशोत्सव साजरा केला जातो. हा गणेशोत्सव दीड दिवसांचा असतो. कोकणात देखील साखर चौथचे गणपती बाप्पा रायगड जिल्ह्यातील अलिबाग, मुरुड,पेण, पनवेल, उरण, अलिबाग, रोहा, माणगाव, महाड आदी सर्वच तालुक्यात हा गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे. गावो गावी सार्वजनिक तसेच घरगुती पद्धतीने साखर चौथ गणपती बाप्पांचे आगमन होते. या दिड दिवसांच्या बाप्पाला आज रायगड जिल्ह्यांत ठिकठिकाणी निरोप देऊन विसर्जन केलं जातंय.


साखरचौथीच्या गणपतीची प्रथा वर्षानुवर्षे, परंपरांगत चालत आली आहे. या साखर चौथ गणपती उत्सवाचा प्रथेकरता काही पौरणिक दाखला मिळत नाही किंवा कोणती पौराणिक कथा आढळून येत नाही. पितृपक्ष जरी असला तरी गणेश हा गणनायक असल्याने स्थापनेसाठी पितृपक्षाचा विचार केला जात नाही. ही प्रथा कोकणातच प्रचलित आहे. कोकणात गणपती मुख्य कुटुंबात एकच बसवला जातो. कुटुंबातील मूळ गणपतीची सेवा मुख्य कुटुंबाला करावी लागते. अशा कुटुंबातील भक्त श्रद्धेने गणेशाकडे काही नवस करतात आणि त्याची पूर्तता झाली की भाद्रपदातल्या संकष्टी चतुर्थी म्हणजेच साखरचौथीला गणपतीबाप्पाची स्थापना करतात. नवसाचे हे गणपती तीन वर्षे आणेन, पाच वर्षे आणेन असे नवस बोलले जातात पण ज्यांना ह्यांचा सहवास कायम हवा असतो ते कायम म्हणजे दर साखरचौथीला गणपतीबाप्पाची स्थापना करतात. साखरचौथीचा सार्वजनीक गणपतीही आणला जातो. साखरचौथीच्या गणपतीच्या स्थापनेचा विधी गणेश चतुर्थीच्या विधी सारखाच केला जातो. फक्त गणपती बाप्पाचे आवडते मोदक हे साखरेच्या पुरणाचे केले जातात. उंदीरमामाच्या मोदकांची कावड साखर भरुन केली जाते. गणेशचतुर्थीच्या दिवशी पहिल्या दिवशी चंद्र पाहिला जात नाही. काही जण तर चंद्र पहायचा नाही म्हणून घरातूनही बाहेर पडत नाहीत. पण साखरचौथीला मात्र पुराण कथेत गणपतीने चंद्राला जो उ:शाप दिला होता तो पाळावा लागतो. त्यामुळे चंद्रोदय झाल्याशिवाय, चंद्राचे तोंड पाहिल्या शिवाय गणपती बाप्पाला नैवैद्य दाखविला जात नाही. आधी चंद्राची पूजा केली जाते. प्रथम चंद्राला ओवाळून मग गणपतीबाप्पाची आरती केली जाते.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१० सप्टेंबर**

१) श्री.चंद्रकांत गोवर्धन शेट
वेश्वी, अलिबाग १०-०९-१९५२
२) श्रीम.मंदाकिनी मोहन म्हात्रे
रामनाथ रोड, अलिबाग १०-०९-१९४९
३)श्री.मनोहर यशवंत खराडे
खंडाळे, अलिबाग १०-०९-१९५२
४)श्रीम.सुवासिनी नारायण कडवे
मु.सारळ, अलिबाग १०-०९-१९५४
५)श्रीम.प्रतीक्षा पांडुरंग पाटील
वरसोली, अलिबाग १०-०९-१९५६
६)श्रीम.दक्षता दिलीप चिकाटे
चेंढरे, अलिबाग १०-०९-१९६०
७)विजय मदुसुदन साष्टे
बाजारपेठ, अलिबाग १०-०९-१९५१

## सुवर्णकण



**आपल्या जीवनात निर्भयता ही ईश्वर दत्त अशा प्रसादा मुळे प्राप्त होते.**

**श्रीज्ञानेश्वर भावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण**

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

## यशवंत लाडगे यांचे निधन

**। रोहा । प्रतिनिधी।**

रोहा तालुक्यातील नडवली गावचे रहिवासी तथा जेष्ठ मार्गदर्शक यशवंत महादेव लाडगे यांचे सोमवारी (दि.८) वयाच्या ७७ व्या वर्षी राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले.



त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी तसेच त्यांचे सगे सोयरे व मित्र परिवार यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांचे अंत्यदर्शन घेऊन त्यांच्या परिवाराचे सांत्वन केले. यशवंत महादेव लाडगे यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, भाऊ, बहिणी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे दशक्रियाविधी मंगळवारी (दि.१६) तर अंतिम धार्मिक विधी (तेरावे) शुकवारी (दि.१९) राहत्या निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे. यशवंत लाडगे यांनी आपल्या गावाच्या विकासासाठीही वेळोवेळी योगदान दिले.

## विदेशी मद्य विक्रीवर पोलिसांचा छापा

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

देवरूख ते मार्लेश्वर येथील एका बांधाच्या आडोशाला होणाऱ्या विदेशी मद्य विक्रीवर पोलिसांनी कारवाई केली आहे. ही कारवाई रविवारी (दि.७) रात्रीच्या सुमारास करण्यात आली असून यात पोलिसांनी ४ हजार २९० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी देवरुख पोलीस ठाण्यात संशयिताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अंकुश लक्ष्मण पोवार (वय ३८, रा. गोठणे पुर्नवसन, ता. संगमेश्वर) असे संशयिताचे नाव आहे. संशयित विनापरवाना विदेशी मद्य विक्री करत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्या आधारे पोलिसांनी रविवारी ही कारवाई केली. या कारवाईत संशयिताकडे ४ हजार २९० रुपयांच्या विविध विदेशी मद्याच्या बाटल्या आढळल्या असून पोलिसांनी त्या जप्त केल्या आहेत. या प्रकरणी पोलीस हेड कॉन्स्टेबल अभिषेक वेलवणकर यांनी देवरुख पोलीस ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीवरून पोलिसांनी मद्य विक्री करणाऱ्या संशयितावर गुन्हा दाखल केला आहे.

# नेरळ-कळंब रस्ता खड्डेमय

**● संपूर्ण गणेशोत्सवात भक्तांचा खड्ड्यातून प्रवास; दहिवली पुलावरून जड वाहतूक सुरूच**



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ-कळंब रस्त्यावर नागरिकांना संपूर्ण गणेशोत्सवात खड्ड्यातून प्रवास करावा लागला असून या खड्ड्यांमुळे हा रस्ता वाहतुकीस धोकादायक बनला आहे. रस्त्यावर मोठे-मोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे प्रवास करताना वाहनचालकांची दमछाक होत आहे. त्यामुळे नागरिकांकडून लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला जात आहे.

नेरळ-कळंब हा महत्वाचा मार्ग म्हणून ओळखला जातो. परंतु, या रस्त्याची खड्डयांमुळे अत्यंत दुरावस्था झाली असून वाहने चालवणे कठीण झाले आहे. या मार्गांवरील दहिवली पूल, कोदिवली, अवसरे, पोही भागात मोठे खड्डे पडले आहेत. गणेशोत्सव पार पडला तरीही रस्तावरील खड्डे भरले नाहीत. त्यामुळे संपूर्ण गणेशोत्सवात खड्ड्यातून प्रवास करावा लागला आहे.

तसेच, धोकादायक पूल घोषित केलेल्या दहिवली पुलावरून जड वाहतूक सुरूच आहे. कोणताही सुरक्षारक्षक तेथे उपलब्धनसतो, त्यामुळे बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी थोडी लाज बाळगून या रस्त्याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे. गणेशोत्सव काळात खड्डे भरले नाही. त्यामुळे गणपती बाप्पाचे आगमन आणि विसर्जनदेखील खड्डयांतून प्रवास करून झाले. आता गणपती बाप्पा बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना चांगली बद्धी दे आणि आमचा प्रवास प्रवास सुखाचा होऊ दे, अशी प्रार्थना नागरिक, प्रवासी, आणि वाहनचालकांकडून केली जात आहे.

### अपघात घडल्यास जबाबदार कोण?

दहिवली पूल हा जड वाहनांसाठी बंद करण्यात आल्याचे फलक तेथे लावण्यात आले आहे. परंतु, तरीही एस.टी महामंडळाची बस सेवा, तसेच मोठेमोठे टेम्पो पुलावरून जात आहेत. कोणत्याही प्रकारचा सुरक्षारक्षक तेथे उभा करण्यात आला नाही. त्यामुळे जर पुलावर मोठा अपघात घडला तर त्याला जबादार कोण?, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

दहिवली पुलावरील नवीन पुलाचे काम सुरु करण्यात आले आहे. परंतु, हे काम बंद अवस्थेत असल्याने हे काम कधी पूर्ण होईल सांगता येत नाही. जुन्या पुलावरून दरवर्षी पुराचे पाणी जाऊन वाहतूक बंद होत असते. यावर्षीदेखील ३ वेळा पुलावरून पाणी जाऊन वाहतूक बंद होती. पुराच्या पाण्याने पुलावर मोठमोठे खड्डे पडले असून पुलाची रेलिंगदेखील तुटली आहे. त्यामुळे अपघाताची भीती निर्माण झाली आहेत. परंतु, याकडे लक्ष देण्यास बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना वेळ मिळत नाही.

## वडगाव येथे होणार भजन स्पर्धा

**। खरोशी । वार्ताहर ।**

ॐ मित्र मंडळ वडगांवतर्फे साखरचौथ गणेशोत्सवानिमित्त बुधवार दि. १० ते शुक्रवार दि. १२पर्यंत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी भाविकांनी दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.


बुधवारी (दि.१०) सकाळी ९.०० वा. श्रींची प्रतिस्थापना संग्राली रोशन पाटील यांच्या हस्ते होणार असून सकाळी ११.३० वा. महाआरती, तर सायं. ६.३० ते ७.३० वा. रघुनाथ रसाळ महाराज यांचे प्रवचन होणार आहे. तसेच, रात्री ७.३० ते ८ वा. अथर्वशिर्ष सामुदायिक वाचन करण्यात येणार आहे. त्यानंतर रात्री ८ ते ८.३० वा. महाआरती तर रात्री ९.३० वा.भजन स्पर्धा होणार आहेत.

तसेच, गुरुवारी (दि.११) सकाळी ११ वा. महाआरती सायंकाळी ६.३० ते ८ वा. तुळजा भवानी भजन मंडळ वडगांव यांचा भजनाचा कार्यक्रम सायं. ८ ते ८.३० वा. त्यानंतर महाआरती रात्री ८.३० ते ९ वाजेपर्यंत होईल. बक्षीस वितरण गणेश सजावट रात्री ९.३० वा., योगेश आग्रावकर प्रस्तुत ऑर्केस्ट्रा स्वराविष्कार होणार आहे. तर शेवटच्या दिवशी शुक्रवारी (दि.१२) सकाळी ११ वा. महाआरती सायं. ४ वा. महाआरती झाल्यानंतर भव्य मिरवणुक विसर्जन सोहळा सायं. ५ वाजता होणार आहे.

## सुतारवाडी पूल मोजतोय अखेरची घटका

**। सुतारवाडी । प्रतिनिधी ।**

गेल्या ७० वर्षांची साक्ष देणारा सुतारवाडी येथील सुमारे ४० मीटर लांबीचा छोटा पूल आता अखेरची घटका मोजताना दिसत आहे. या पुलावरून अनेक लहान-मोठी वाहने तसेच अवजड वाहने रात्रंदिवस ये-जा करत असतात. पंधरा दिवसांपूर्वी या पुलाचे संरक्षक कठडे तोडून ट्रेलर पुलाखाली पलटी झाला होता. त्या एका बाजूचे संरक्षक कठडे पुलाखाली पडलेल्या अवस्थेत आहेत.



या पुलाखालून पाणी वाहात असल्यामुळे त्या ठिकाणी गणपती विसर्जनासाठी उत्तम प्रकारे व्यवस्था केलेली आहे. या ठिकाणी पाच दिवसाचे आणि दीड दिवसाच्या गणपतीचे विसर्जन केले जाते. येथील पुलाची गॅरंटी जवळजवळ संपत आल्याचे दिसत आहे. या पुलाला दोन्ही बाजूंनी भेगा पडल्या आहेत. या पुलाची वेळीच दखल घेतली नाही तर रहदारीचा मार्ग बंद होईल, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे.

सुतारवाडी परिसरामध्ये अनेक फार्म हाऊस असल्यामुळे वर्षभर पर्यटकांची याच पुलावरून त्यांची ये-जा सुरू असते. त्यामुळे रात्रंदिवस या ठिकाणावरून सर्रासपणे ही वाहने धावत असतात. दरम्यान, या पुलाची आता बिकट अवस्था झाली असून, या ठिकाणी सुसज्ज पूल होणे काळाची गरज आहे.

## नाझनीन खान राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

रा.जि.प.पाभरे उर्दु शाळा शिक्षिका नाझनीन इर्शाद खान यांनी रायगड जिल्ह्यात शैक्षणिक क्षेत्रात दैदिप्यमान काम केले असल्याने त्यांना कौमी उर्दु शिक्षक कर्मचारी संघातर्फे दिल्ली येथे शुक्रवारी (दि.५) शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिक्षक कर्मचारी संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष वासील अलीसर आणि मान्यवरांच्या हस्ते शाल, सुवर्ण पदक, प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. या सन्मान सोहळ्यात विविध राज्यातील २२ शिक्षक व प्राध्यापक यांचा सन्मान करण्यात आला.



या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय अध्यक्ष वासील अलीसर, सेक्रेटरी विकास कुमार राणा, कुमार श्रीवास्तव, मुस्लिम युनिव्हर्सिटी प्रोफेसर जीयारहेमान आलीगड, राज्य स्तरीय मान्यवर प्रोफेसर आणि शिक्षक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमांचे सूत्रसंचालन उत्तर प्रदेशचे प्रा. सहाना सैफी यांनी केले.

रायगड जिल्ह्यातील म्हसळा तालुका पाभरे येथील उर्दु शिक्षिका नाझनीन इर्शाद खान यांची जिल्हा भरातून एकमेव उर्दू शिक्षिका पुरस्कार प्राप्त निवड झाली आणि त्यांना राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आल्याने खान यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## जखमी गायीला जीवदान

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

मुरुड तहसील कार्यालयामागील व दुय्यम निबंधक कार्यालयालगत एक गाय जखमी अवस्थेत विव्हळत होती. हे दुय्यम निबंधक कार्यालयातील सह दुय्यम निबंधक महेश आर्डे व रतिष जमादार यांच्या निदर्शनास येताच त्यांनी सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर फलेभाई यांना सांगितले. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत शहरातील पशुवैद्यकीय कार्यालयात जाऊन माहिती दिली असता



कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत जखमी गायीवर औषधोपचार करून तिला जीवदान दिले. महेश आर्डे व रतिष जमादार यांच्या तत्परतेमुळे गायीला जीवदान मिळाल्याबद्दल प्राणीप्रेमींकडून त्यांचे कौतुक केले जात आहे.

## एसटी मार्ग फलकांसाठी खडूचा वापर

**● आगार प्रशासनाने लक्ष देण्याची गरज**

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

प्रवासी वाहतुकीचे केंद्र असलेल्या चिपळूण आगारात मार्ग फलकासाठी बसेसच्या काचेवर खडूने मार्ग लिहून त्या रवाना केल्या जात असल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे लिहिलेले मार्ग वेळीच न पुसता तिच बस अन्य मार्गावर नेली जाते. अगोदरचे खडूने लिहिलेल्या मार्गाचे नाव तसेच ठेऊन नियोजित दुसऱ्या मार्गासाठी राहत असल्याने प्रवाशांमध्ये संभ्रमावस्था निर्माण होत आहे. हा प्रकार रोखण्यासाठी आगार प्रशासनाने याकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे बोलले जात आहे.



यापूर्वी आगारात चालकांना मार्गफलकासाठी स्वतंत्र सूचना दिल्या जात होत्या. शिवाय नियम न पाळल्यास कारवाई होत असे. मात्र सद्यस्थितीत आगार प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसत आहे. नियोजित मार्गावर एसटी बस रवाना होत असताना त्या फलाटावर येण्यापूर्वी त्यांना मार्गफलक असणे बंधनकारक आहे. अनेकदा चालक बस फलाटावर आल्यानंतर मार्गफलक लावत असल्याचे चित्र आहे. तर काही चालक या नियमावलीची पूर्णतः पायमल्ली करत मार्गफलक न मिळाल्याने नवी शक्कल लढवत बसेसच्या काचेवर खडूने नियोजित मार्गाचे नाव लिहून फलक तयार करतात.

### प्रवाशांमध्ये गोंधळाचे वातावरण

विशेष म्हणजे त्या मार्गावरून ही एसटी बसस्थानकात आल्यानंतर तो खडूने लिहिलेला फलक पुसणे नसल्याने ही बस अन्य मार्गावर जातेवेळी चालक पुन्हा नियोजित दुसऱ्या मार्गाचे फलक लावत असल्याने यामुळे एकच बस दोन मार्गाने दर्शवली जाते. या प्रकारामुळे प्रवाशांची मोठी फसगत होत आहे. खरंतर खडूचे मार्ग लिहून बस रवाना केल्यास त्या चालकांवर कारवाई होत असे. मात्र, आगार प्रशासनाला याचा विसर पडला असल्याचे चित्र आहे.

## चिखली गावात लंपीचा शिरकाव

**। संगमेश्वर । प्रतिनिधी ।**

संगमेश्वर तालुक्यातील चिखली गावात जनावरांना लंपी आजाराची लागण मोठ्या प्रमाणावर झाली आहे. दिवसेंदिवस परिस्थिती गंभीर होत चालली आहे. एका शेतकऱ्याच्या ६ गायींना या आजाराची लागण झाली असून एका गायीचा या आजारात मृत्यू झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. मात्र, याबाबत पशुधन विभागाकडून योग्य ती माहिती दिली जात नसल्याने शेतकऱ्यांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

### ऑपरेशन सिंदूरमध्येही होते सहभागी | भातसई ग्रामस्थांकडून जाहीर सत्कार

# उत्तम खरीवले सैनिक सेवेतून निवृत्त

**। रोहा । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील आदर्श गाव भातसई या गावचे सुपुत्र व गावातील पहिले सैनिक नायक उत्तम नथुराम खरीवले हे १७ वर्षानंतर भारतीय सैनिक सेवेतून निवृत्त झाले आहेत. निवृत्त झाल्यानंतर गावातील युवक, ग्रामस्थ व महिला मंडळकडून त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. गावातील आई महादेवी मातेच्या मंदिरात त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.



सैनिक उत्तम खरीवले यांची वयाच्या १८ व्या वर्षी लष्करात भरती झाली. विशेष म्हणजे ते पहिल्याच प्रयत्नात यशस्वी झाले. त्यांना लहानपणापासूनच फौजी होण्याची प्रचंड इच्छा होती. प्रचंड इच्छाशक्ती आणि त्यांनी केलेले कठोर परिश्रमामुळे त्यांनी यशाला गवसणी घातली. देशाची सेवा करण्याची संधी मिळाल्याने सैनिक उत्तम खरीवले यांनी आपल्या छोट्याशा गावाचे नाव देश पातळीवर नेऊन ठेवले. आज जवळजवळ त्यांनी १७ वर्षे देशसेवेत अर्पण केली. त्यांच्या या योगदानाबद्दल सर्व गाववासियांना सार्थ अभिमान आहे. गावातील सर्व तरुणांना त्यांनी एक आदर्श निर्माण करून दिला आहे. अगदी कठीण प्रसंगी, कोणत्याही सुख, सोयी आजूबाजूला उपलब्ध नसताना त्यांनी गावातून पहिले भारतीय सेनेत भरती होण्याचा मान मिळविला. गावातील प्रत्येक तरुण, युवावर्ग आज त्यांना आपले आदर्श मानतात. समस्त ग्रामस्थांसाठी एक ऐतिहासिक काल, जो पुढच्या कित्येक पिढ्यानंपिढ्या कथन केला जाईल की, भातसई गावामध्ये देशासाठी लढणारे तरुण जन्माला आले. त्यांची थोरवी वर्षानुवर्षे ऐकवली जाईल. असे जीवित्कार्य आज नायक उत्तम नथुराम खरीवले यांच्या हातून घडून आले आहे, असे मत अनेक ग्रामस्थांनी नियोजित कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केले.

यावेळी रोहा पोलीस निरीक्षक मारुती पाटील, माजी सरपंच लिलाधर थोरवे, हरिश्चंद्र खरीवल, तंटामुक्त अध्यक्ष मोरेश्वर खरीवले, निवास खरीवले, प्रेस क्लब अध्यक्ष सुहास खरीवले, गणेश खरीवले, ग्रा.पं. सदस्य निरज खरीवले, अनिल खरीवले, समीर खरीवले, सुरेश कोतवाल, भरत कोतवाल, उदय थोरले, सामाजिक तसेच राजकीय अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निवडक

### दिलीप शिंदे तंटामुक्त समितीच्याअध्यक्षपदी



**खांब** : तालुक्यातील राजकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण समजल्या जाणाऱ्या आरे बुद्रुक ग्रूप ग्रामपंचायतच्या महात्मा गांधी तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते तथा माजी सरपंच दिलीप सहदेव शिंदे यांची सर्वानुमते दुसऱ्यांदा फेर नियुक्ती करण्यात आली. आरे बुद्रुक ग्रूप ग्रामपंचायतचे सरपंच राजेंद्र मळेकर यांच्या अध्यक्षतेखाली ग्रा.पं.कार्यालयात सर्वसाधारण सभा पार पडली. या सभेमध्ये त्यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली असून उपाध्यक्ष नरेश दगडू चोंदे यांच्यासह वन विभाग, पोलीस प्रशासन, कृषी विभाग आदी विविध शासकीय क्षेत्रांतील तसेच ग्राम पंचायतस्तरीय प्रतिष्ठित मान्यवरांची तंटामुक्ती समितीमध्ये निवड करण्यात आली. याप्रसंगी सभेचे अध्यक्ष तथा सरपंच राजेंद्र मळेकर, उपसरपंच दिनेश पोंगडे, ग्राम विकास अधिकारी प्रिया कुंडे, विघ्नेश मळेकर, चंद्रकांत शिंदे, भावेश वाघमारे आदींसह ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

### हेमकांत गोयजी यांना पुरस्कार



**आगरदांडा** : महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभाग अंतर्गत जिल्हा परिषद शाळेमध्ये कार्यरत शिक्षकांना दरवर्षी जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात येते. यावर्षी मुरूड तालुक्यातील रा.जि.प. शाळा खामदे येथे कार्यरत असणारे हेमकांत गोयजी यांना जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ जाहीर झाल्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी माध्यमाद्वारे कळविण्यात आले आहे. हेमकांत गोयजी यांनी २० वर्षाच्या सेवा काळात उल्लेखनीय कार्य केले. ते उपक्रमशील शिक्षक असून ते विविध स्तरांवर काम करतात. त्यांनी विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरतील अशा कृतिपुस्तकांची निर्मिती केली आहे. तसेच राज्य व जिल्हा स्तरावर शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी तज्ञ मार्गदर्शकाची भूमिकाही बजावली आहे. शाळेच्या विकासासाठी ते स्वंयसेवी संस्था, दानशूर व्यक्तीकडून शाळा सुधार निधी मिळविण्यासाठी प्रयत्न करतात. त्याचबरोबरीने शासकिय योजनांचा लाभ विद्यार्थ्यांना मिळावा यासाठी पाठपुरावा करतात. आत्तापर्यंत त्यांनी शिकविलेले विद्यार्थी बँक, हॉटेल, सरकारी आस्थापनेवर कार्यरत झाले आहेत.



### तंटामुक्ती अध्यक्षपदी कुणाल पेडणेकर

**बोर्ली पंचतन** : श्रीवर्धन तालुक्यातील बोर्ली पंचतन गृप ग्रामपंचायतच्या महात्मा गांधी तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी कुणाल चंद्रकांत पेडणेकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. मंगळवारी (दि.९) झालेल्या ग्रामसभेमध्ये सर्वानुमते कुणाल पेडणेकर यांच्या नावाला पाठिंबा देण्यात आला. यावेळी मागील अध्यक्षा वसुधा खोत यांचा सन्मान करण्यात आला. नवनियुक्त अध्यक्ष कुणाल पेडणेकर यांना ग्रामपंचायतीच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या. ग्रामस्थरावर असलले तंटे गावातच मिटवून गावात शांतता व सुव्यवस्था यांचा सलोखा अबाधित राहण्यासाठी तंटामुक्ती समिती सदस्यांच्या सहकार्याने आम्ही प्रयत्न करणार, असा निर्धार यावेळी नवनियुक्त अध्यक्ष कुणाल पेडणेकर यांनी व्यक्त केला.

### दहशतीला पोलिसांचे चोख प्रत्युत्तर

**ठाणे** : उल्हासनगर परिसरात दहशत माजविणाऱ्या नामचीन दरोडेखोराची विठ्ठलवाडी पोलिसांनी भरवस्तीत धिंड काढून त्याच्या दहशतीला चोख प्रत्युत्तर दिले आहे. सुमित कदम उर्फ लाला असे या दरोडेखोराचे नाव असून त्याने तीन महिन्यांपूर्वी आशेळे गावात गाड्यांची तोडफोड व महिलेवर तलवारीने वार केले होते. या हल्ल्यानंतर तो फरार होता. सुमित कदम हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असून त्याच्यावर तीन दरोड्याचे गुन्हे दाखल आहेत. त्याने तीन महिन्यांपूर्वी परिसरात स्वतःची दहशत पसरवण्यासाठी तलवार नाचवत धिंगाणा घातला होता. त्यानंतर पोलीस पकडतील या भीतीने तो लपून बसला होता. याबाबत पोलीस पथकाने त्याचा शोध सुरू केला. अखेर तीन महिन्यांच्या प्रयत्नानंतर हा दरोडेखोर बदलापुरात लपून बसल्याची माहिती उपनिरीक्षक बी. आर. दराडे यांना मिळाली. त्यानुसार हवालदार रामदास मिसाळ, दिलीप चव्हाण, संतोष सांगळे, गणेश राठोड, चंद्रकांत गायकवाड, सागर मोरे यांनी सापळा रचून सुमितच्या मुसक्या आवळल्या.

### अदानींच्या सिमेंट फॅक्टरीला विरोध

**ठाणे** : कल्याणनजीक मोहने परिसरात अदानी समूहाकडून उभारण्यात येणाऱ्या सिमेंट फॅक्टरीविरोधात भूमिपुत्र एकवटले आहेत. एनआरसी कारखान्याची जमीन विकत घेतल्यानंतर त्या ठिकाणी प्रदूषणकारी प्रकल्प सुरू करणार नाही, अशी हमी अदानी व्यवस्थापनाने दिली होती. मात्र, अदानी समूह या ठिकाणी सिमेंट फॅक्टरी उभारणार असल्याची कुणकुण लागताच टिटवाळा, आंबिवली, मोहने, बल्याणी परिसरातील भूमिपुत्रांनी मोहने येथील नालंदा बुद्ध विहारच्या सभागृहामध्ये बैठक घेतली. या बैठकीत प्रदूषणामुळे आरोग्य धोक्यात येण्याबरोबरच परिसरातील जमिनी कायमच्या नापीक होणार असल्याने सिमेंट फॅक्टरीचा डाव हाणून पाडण्याचा निर्धार भूमिपुत्रांनी यावेळी केला. याशिवाय रस्त्यावरची लढाई म्हणून सिमेंट फॅक्टरीविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा निर्णयही घेण्यात आला.

### सहा टन निर्माल्य संकलित

**सिंधुदुर्ग** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गणेशोत्सवात डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे पर्यावरणपूरक उपक्रमाचा एक मोठा टप्पा पार पडला. जिल्ह्यात विविध ठिकाणांवर ६ टन निर्माल्य संकलित करून त्यापासून कंपोस्ट खत तयार करण्याचा उपक्रम राबविण्यात आला. डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रतिष्ठानाच्या श्रीसदस्यांनी जिल्ह्यातील नागरिकांच्या सहकार्याने विविध ठिकाणांवर निर्माल्य गोळा केले. यामध्ये मालवण तालुक्यातील बंदर जेटी, चिंदर, सावंतवाडीतील बांदा, चराठा, कणकवलीतील जानवली, हळवल, कासार्डे, फोंडाघाट, कुडाळत पिंगुळी, वेंगुर्ले येथे अणसूर, देवगडात शिरगाव तसेच वैभववाडी येथे कोकिसरे अशा १३ वेगवेगळ्या ठिकाणांचा समावेश होता. गणेशोत्सवात दीड दिवस ते अकरा दिवसाच्या गणपती विसर्जनादरम्यान, पाण्याच्या स्त्रोतांमध्ये टाकले जाणारे निर्माल्य वाया जाऊ नये आणि पाणी प्रदूषित होऊ नये, यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला. संकलित केलेल्या निर्माल्यापासून कंपोस्ट खत तयार करून भविष्यात प्रतिष्ठानतर्फे लागवड केलेल्या हजारो वृक्षांच्या संवर्धनासाठी वापरण्यात येणार आहे. प्रतिष्ठानाच्या सदस्यांनी नागरिकांना निर्माल्य संकलनासाठी सक्रियपणे आवाहन केले, ज्यामुळे सुमारे ४०५ श्रीसदस्यांनी यात सहभाग घेतला.

# पत्रकारांवरील हल्ल्यांविरोधात निषेध

## वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आंदोलन, सरकारकडून तात्काळ कारवाईची मागणी

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई, पुणे आणि महाराष्ट्रातील इतर भागांत पत्रकारांवर शासकीय अधिकारी, राजकीय नेते तसेच सामाजिक आंदोलनकर्त्यांकडून होणारे गैरवर्तन आणि शारीरिक हल्ले थांबवण्यासाठी नवी मुंबईतील पत्रकारांनी जोरदार निषेध आंदोलन केले. वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात एकत्रित झालेल्या प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल मीडियातील पत्रकार, फोटो जर्नालिस्ट, व्हिडिओ जर्नालिस्ट आणि संपादकांनी या घटनांचा तीव्र निषेध नोंदवला. आंदोलनात सहभागी झालेल्या पत्रकारांनी घोषणाबाजी करत पत्रकारांच्या हक्कांसाठी एकजुटीने आवाज बुलंद केला आहे. या आंदोलनात पत्रकार सर्वस्वी विश्वरथ नायर, सुदिप घोलप, अनंत मिस्त्री, नागमनी पांडे, राजेंद्र बोडके, सुनील तावडे, विठ्ठल दळवी, दिपक सोनवणे, सनी मेहरोल, पुरषोत्तम कनोजीया, कासीम सय्यद, फोरम जोशी, सुमित रेनोसे, साईनाथ भोईर, अथर्व रणदिवे, समीर शेख, प्रकाश शिंदे, दीपक कांबळे, फारुख सय्यद, भरतकुमार कांबळे व इतर पत्रकार उपस्थित होते.




या आंदोलनाचे नेतृत्व नवी मुंबईतील प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल मीडियातील पत्रकार आणि पत्रकार संघटना यांनी केले.

पत्रकार हे लोकशाहीचे चौथे स्तंभ आहेत. त्यांच्यावर होणारे हल्ले हे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर हल्ला आहे. मुंबई, पुणे येथे अलीकडेच घडलेल्या घटा अस्वीकारार्ह आहेत. आम्ही याचा तीव्र निषेध करतो आणि सरकारकडून तात्काळ कारवाईची मागणी करतो असे मत मांडण्यात आले. तर, 'पत्रकारांवर हल्ला बंद करा', 'प्रशासनातील पत्रकार विरोधी मानसिकता बाळगणाऱ्या अधिकाऱ्यांना निषेध असो' अशा घोषणाबाजी करण्यात आल्या.

यावेळी आंदोलकांनी सरकारला इशारा दिला की, जर पत्रकार सुरक्षेसाठीचे कठोर कायदे पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी आणले गेले नाहीत, तर यापुढेही मोठे आंदोलने होणार, आंदोलनाने पत्रकार बांधवांमध्ये एकजूट दिसून आली आणि स्थानिक राजकीय नेत्यांकडूनही या मागण्या मान्य करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. तर आंदोलनात सहभागी झालेल्या विविध पत्रकार संघटनांच्या सदस्यांनी सांगितले की, हे आंदोलन राज्यभरातील पत्रकारांसाठी एक संदेश आहे आणि यापुढेही हक्कांसाठी लढा सुरू राहणार असल्याचे सांगण्यात आले.

### संघटनेकडून खंत व्यक्त

**पत्रकारीतेला देशातील लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला जातो. पत्रकार नेहमीच समाजामधील चुकीच्या गोष्टी लोकांपुढे आणतो. लोकांचे प्रश्न सोडवण्यात मदत करतो. प्रशासनाकडे प्रश्न पत्रकारितेच्या माध्यमातून मांडतो. परंतु, लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी लढणाऱ्या पत्रकारावर अनेक हल्ले देखील होतात. मात्र, ज्या प्रमाणात पत्रकारांना संरक्षण दिले पाहिजे त्या प्रमाणात या कायद्याच्या माध्यमातून संरक्षण मिळत नाही, अशी खंत काही पत्रकार संघटनांकडून व्यक्त करण्यात येत आहे.**

# मिडटाऊनतर्फे सन्मान

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून ५ सप्टेंबर सर्वत्र साजरी केली जाते. या शिक्षक दिनानिमित्त 'रोटरी क्लब खारघर मिडटाऊन' च्या वतीने खारघर आणि परिसरातील शिक्षकांचा मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच दहावी आणि बारावीच्या परीक्षेत प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी रोटरी क्लब खारघर मिडटाऊनचे माजी गव्हर्नर डॉ. शैलेश पालेकर यांनी शिक्षकांचे आपल्या सर्वांच्या आयुष्यामध्ये किती महत्त्वाचे स्थान आहे, याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी मरोटरी क्लबफ्चे अध्यक्ष डॉ. रविकिरण, सुप्रिया सावंत, रोटरी क्लब सदस्य, इतरमान्यवर, शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कर्जत प्रवेशद्वारावरील हायमास्ट होणार सुरु

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्याचा प्रवेशद्वार असलेल्या चार फाटा येथील असलेला हायमास्ट गुरुवार (दि. १०) सप्टेंबर २०२५ ला रिपेरिंग करून सुरु करण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी कळविले आहे.



तालुक्याचे प्रवेशद्वार असलेला चारफाटा चौक सध्या अंधारात आहे. ग्रामपंचायत हालिवली हद्दीत येणाऱ्या या महत्त्वाच्या चौकातील पथदिवे बंद पडल्याने नागरिकांना त्या परिसरात जाण्यास भीती वाटते. विशेषतः रात्रीच्या वेळी महिलांना आणि वयोवृद्धांना या परिसरातून जाणे धोकादायक ठरत आहे. तरी हायमास्ट त्वरित सुरु करावा ही कर्जतकरांची सततची मागणी होती. या बाबत सामाजिक कार्यकर्ते पंकज ओसवाल यांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे सतत पाठपुरावा करून त्वरित सुरु करावे अशी सतत मागणी केली.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने संबंधित कंपनीला एक पत्र पाठवून कर्जत येथील चार फाटा येथील बंद असलेला हायमास्ट तात्काळ दुरुस्त करून संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडे हस्तांतरित करण्याची कारवाई करावी असे पत्र दिले. सदरचा हायमास्ट कधी पर्यंत सुरू होईल. याबाबत विचारणा केली असता संबंधित अधिकाऱ्यांनी १० सप्टेंबरपर्यत हायमास्ट सुरु होईल असे सांगितले आहे.

# मंजुळा पाटील यांचे निधन

**। वाघ्रण । प्रतिनिधी ।**



अलिबाग तालुक्यातील सातघर गावच्या ज्येष्ठ महिला मंजुळा अनंत पाटील यांचे वृद्धपकाळाने ३ सप्टेंबर रोजी निधन झाले. त्या गावातल्या सर्व सामाजीक धार्मिक कार्यक्रमात त्या उपस्थित असायच्या. त्याचे दिवसकार्य रविवार (दि. १४) सप्टेंबर रोजी श्री क्षेत्र भुवनेश्वर येथे होणार असून त्यांच्या मागे महेश, मच्छिंद, प्रदीप असे तीन मुलगे, सुना नातवंडे पती अनंत पाटील असा मोठा परिवार आहे.

# उरण महाविद्यालयात वृक्षारोपण

**। उरण । प्रतिनिधी ।**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने उरण रेल्वे स्टेशन परिसर येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. हरित 'महाराष्ट्र समृद्ध महाराष्ट्र' या महाराष्ट्र शासनाच्या दहा कोटी वृक्ष लागवड मोहिमेअंतर्गत मुंबई विद्यापीठाच्या निर्देशान्वे महाविद्यालयातीच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला होता.

महाविद्यालयाचे प्रा. डॉ. वाल्मीक गर्जे, स्टेशन व्यवस्थापक मा. जगदीश जाधव, आकाश खोब्रागडे, कृष्णा सिंग, रानसिंह मीना, डॉ. ए. आर. चव्हाण, डॉ. एच. के. जगताप, डॉ. एम. जी. लोणे, प्रा. अनुपमा कांबळे, प्रा. विनिता तांडेल, डॉ. दत्ता हिंगमिरे आदींच्या उपस्थितीत विविध वृक्ष लावण्यात आली. यावेळी एकूण १२० वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरण रक्षण व संवर्धन ही काळाची गरज असल्याचा संदेश समाजात रुजवण्याचा प्रयत्न केला गेला. या वृक्षारोपण मोहिमेत विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सक्रिय सहभाग नोंदवला व वृक्षारोपण यशस्वी केले.

# 'मनरेगा योजना शेतकऱ्यांपर्यंत पोचविणार'

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा तालुक्यात मनरेगा मधून सुरू असलेल्या योजनांची माहिति शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी जाणून घेण्यासाठी तालुका शेतकरी संघटनेच्या वतीने तालुका कृषी कार्यालयास भेट देण्यात आली. यावेळी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष चंद्रकांत राऊत, यांनी शेतकऱ्यांना मनरेगा योजनांचा लाभ सहजरित्या मिळावा, योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात तालुका कृषी अधिकारी कांबळे यांच्याकडून माहिति घेतली. पंचायत समिती स्तरावर गटविकास अधिकारी महादेव शिंदे यांच्याकडून देखील शेतकऱ्यांना जास्तीत लाभ मिळवून देण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी संघटनेचे अध्यक्ष चंद्रकांत राऊत यांनी केले. कृषी खाते मनरेगा अंतर्गत सिंचन विहिरी, फळबागा, कुंपण घालणे, तसेच जलसंधारण यांसारख्या कामांसाठी तांत्रिक सहकार्य आणि मार्गदर्शन केले जाते. या योजनेचा उद्देश शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे आणि शेतीला शाश्वत बनवणे हा असून योजनांची अंमलबजावणी कुठलीही तांत्रिक अडचण येऊ नये यासाठी शेतकरी संघटना पुढाकार घेत असून तालुका कृषी कार्यालयाने कार्यान्वित असलेल्या योजनांची माहिति संघटनेला देण्याचे आश्वासन दिले.

# मालकाची चैन खेचून इसम पसार



**पनवेल :** दुकान मालकाची चैन खेचून अज्ञात इसम पसार झाल्याची घटना नवीन पनवेल येथे घडली आहे. नविन पनवेल सेक्टर १७ पीएल-५-बिल्डिंग १२ महेश स्पोर्ट्स येथील दुकानात ग्राहक म्हणून एक इसम आत आला व त्याने दुकान मालकाची चैन खेचून तो पसार झाला आहे. या घटनेची माहिति मिळताच खांदेश्वर पोलीस घटनास्थळी जाऊन घटनेचा तपशिल घेतला.

# अनंत देवघरकर यांना राष्ट्रीय पुरस्कार

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

नवीनमुंबई आणि कामोठे परिसरात अनेक वर्षे विविध प्रकारच्या सामाजिक कार्यांचे आयोजन करणाऱ्या कला-साधना सामाजिक संस्थेच्या वतीने यावर्षी राष्ट्रीय शिक्षक दिनानिमित्त (दि. ७)रोजी कराडी हॉल, कामोठे येथे राष्ट्रीय परमपूज्य साने गुरुजी विविध पुरस्कारवितरण सोहळ्याचे आयोजन केले होते. या सोहळ्यासाठी महाराष्ट्रातून विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या ८३० जणांचे अर्ज आले होते. त्यांतील ५० जणांची निवड करण्यात आली. या ५० जणांत अलिबागचे



रहिवासी, विविध संस्थांशी संबंधित असलेले, कोकण मराठी साहित्य परिषद, अलिबाग शाखेचे सदस्य साहित्यिक अनंत देवघरकर यांची निवड करण्यात आली. साहित्यिक अनंत देवघरकर यांना राष्ट्रीय परमपूज्य साने गुरुजी समाजभूषण पुरस्काराने मंचावरील सर्व थोरांनी गौरविले. देवघरकर यांनी यापूर्वी अनेक पुरस्कार प्राप्त केले असल्याने त्यांच्या अनेक चाहत्यांकडून त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# वाजेकर महाविद्यालयात शिक्षकांचा गुणगौरव

**। उरण । प्रतिनिधी ।**

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून साजरी केली जाते. याच शिक्षक दिनाचे औचित्य साधून सुधीर घरत सामाजिक संस्था, नवघर-उरण यांच्या विद्यमाने वीर वाजेकर महाविद्यालयातील शिक्षकांचा गुणगौरव समारंभ सोमवार (दि. ८) सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आला होता.




शिक्षक गुणगौरव समारंभ प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय सेवक व शिक्षकेतर कर्मचारी यांना पेन, प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरवण्यात आले. या कार्यक्रमात महाविद्यालयातील नॅशनल कॅडेट कोरमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना तसेच विविध स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा. गजानन चव्हाण यांनी तर कार्यक्रमाचे आभार सुप्रिया नवले यांनी व्यक्त केले. कार्यक्रमात डॉ. सुजाता पाटील व डॉ. श्रेया पाटील यांच्या सूत्रसंचालन केले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग, प्रशासकीय सेवक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित होते.

# तरुण बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून कोणाला काहीही न सांगता ३१ वर्षीय मुरारी शुभकांत झा हा कोणार्क सिटी, कोप्रोली-नैरे येथून निघून गेल्याने तो हरवल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. सदर तरुण अंगाने मध्यम असून, त्याचा रंग सावळा आणि चेहरा उभट आहे. त्याची उंची ५.११ फूट असून अंगात सफेद फिकट रंगाचा शर्ट, निळ्या रंगाची जीन्स पँट घातली आहे. तरुणाबाबत माहिति असल्यास हवालदार अण्णासाहेब हसबे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# आरएसपीची अठरा वर्षे सेवा



**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

जिल्हा वाहतूक सुरक्षा दल व नागरी संरक्षण संघटन या पोलीस खाते व शिक्षण खाते अंतर्गत कार्यरत असलेल्या सेवाभावी संस्थेकडून जिल्ह्यातील अनेक ठिकाणी होणाऱ्या गणेश विसर्जन मिरवणुकीत असलेल्या पोलीस बंदोबस्तात सहभाग घेतला जातो. याही वर्षी महाराष्ट्र राज्य वाहतूक सुरक्षा दल व नागरी संरक्षण संघटन, नागपूरचे अध्यक्ष संजय शेंडे, महासमादेशक अनील शेजाळे, उपाध्यक्ष पी.एस.महाजन व इतर यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत राज्यातील अनेक जिल्ह्यांत गणेश मिरवणुकीत वाहतूक नियंत्रणासाठी पोलीस विभागाला सहकार्य केले. शनिवार (दि.६) सप्टेंबर रोजी अलिबाग येथील अनंत चतुर्दशीच्या गणेश विसर्जन मिरवणुकीत सलग अठराव्या वर्षी आरएसपीचे राज्य सल्लागार डॉ. ॲड. के. डी.पाटील, कोकण विभागीय समादेशक श्रीकांत पाटील, अतिरिक्त समादेशक संजय डोंगरे, रमेश पाटील, लियाकत धनसे यांनी सहभाग नोंदविला.

# पीकांच्या नुकसानीमुळे बागायतदार हवालदिल | स्थानिक प्रशासनाची बघ्याची भूमिका

# उनाड घोड्यांमुळे नागरिक त्रस्त

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन तालुक्यात उनाड गुरेढोरे व घोडे हे पादचाऱ्यांसाठी मोठी समस्या झाली आहे. तसेच, शेती-वाड्यांमध्ये जात पीकांचे नुकसान करणे या कारणाने बागायतदार हवालदिल झाले आहेत. रात्री-अपरात्री रस्त्यावरून भटकणारे घोडे, ढोरांमुळे आता अपघातास होत असून स्थानिक प्रशासन बघ्याची भुमिका घेत असल्याने नागरिक संतप्त झाले आहेत.

तालुक्यात गेल्या दिड ते दोन वर्षांपासून पाळीव प्राण्यांबाबतीत मालकांकडून निष्काळजीपणा दाखवण्यात येत आहे. या प्राण्यांना गोठा, तबेल्यात बांधून न ठेवता



मोकाट सोडल जात आहे.

अन्न-पाण्याच्या शोधात भटकणारे हे पाळीव प्राणी वाड्यांमध्ये शिरत लागवड केलेल्या फळबागांचे नुकसान करत आहेत.

आराठी येथे पर्यटकांच्या वाहनाला घोड्याने धावत येत धडक दिल्याची घटना पंधरा दिवसांपूर्वी घडली होती. रात्री अपरात्री रस्त्याच्या मधोमध अथवा कडेला उभ्या राहणाऱ्या घोड्यांमुळे गेल्या पाच दिवसात भट्टीचा माळ व बोर्लीपंचतन येथे दुचाकीस्वार घोड्यावर आदळल्याच्या घटना घडल्या असून या अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाले आहेत.

उनाड घोड्यांमुळे झालेल्या अपघातांची गंभीरता लक्षात घेऊन श्रीवर्धन शहर व तालुक्यातील नागरिकांनी सोमवार (दि. ८) सप्टेंबर रोजी तहसीलदार, पंचायत समिती श्रीवर्धन नगरपरिषद, पोलीस ठाणे येथे निवेदन दिले.

यावेळी अविनाश कोळंबेकर, समाजसेवक हिदायत जमायत, जुनैद दुस्ते यांनी प्रशासनाने उनाड घोडे, ढोरे यांच्या मालकांवर कारवाई करावी तसेच मोकाट गुराढोरांचा बंदोबस्त करावा अन्यथा आम्ही ढोरांना, घोड्यांना पकडून शासकीय कार्यालयात आणून बांधू असा इशारा दिला.

श्रीवर्धन नगरपरिषद मुख्याधिकारी विराज लबडे यांनी श्रीवर्धन नगरपरिषद हद्दीत उनाड घोडे, ढोरे आढळल्यास संबंधित मालकांवर कारवाई करण्यात येईल असे सांगितले. परंतु पंचायत समिती, गटविकास अधिकारी माधव जाधव यांनी प्रतिक्रिया देण्यास टाळले आहे.

### बंदोबस्ताची मागणी

**श्रीवर्धन ग्रामपंचायत हद्दीतील उनाड घोडे व ढोरे यांचा बंदोबस्त करावा या बाबतीत ग्रामस्थांनी पंचायत समिती गटविकास अधिकारी माधव जाधव यांना निवेदन दिले होते, त्यानुसार ०१ जुलै रोजी गटविकास अधिकाऱ्यांनी सरपंच, प्रशासक, ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना ग्रामपंचायत हद्दीतील मोकाट गुरांचा बंदोबस्त करण्याबाबत पत्रव्यवहार केला होता. परंतु, गटविकास अधिकाऱ्यांच्या पत्राला केराची टोपली दाखवण्यात आली.**

## निवडक



### कोमसापची कार्यकरणी जाहीर

**कोर्लई :** कोकण मराठी साहित्य परिषदेच्या रायगड जिल्हाध्यक्षपदी संजय गुंजाळ व जिल्हा प्रतिनिधी म्हणून गणेश कोळी यांची बिनविरोध निवड झाली. त्यानंतर त्यांनी कोकण मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष मधु मंगेश कर्णिक यांची सदिच्छा भेट घेऊन आशीर्वाद घेतले, याप्रसंगी कोकण मराठी साहित्य परिषदेचे जनसंपर्कप्रमुख प्रा. एल. बी. पाटील, तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

### रेल्वे प्रवाशाचे दागिने परत

**पनवेल :** प्रवासादरम्यान रेल्वेत विसरलेली बॅग चोरट्यांच्या हाती लागण्यापूर्वीच रेल्वे पोलिसांनी ताब्यात घेऊन संबंधितांना परत केली आहे. यामध्ये दीड लाखाचे दागिने होते. तळोजा येथे राहणाऱ्या अरविंद चौधरी यांच्यासोबत हा प्रकार घडला. पत्नीसह ते प्रवास करत असताना त्यांची एक बॅग रेल्वेतच राहिली. लक्षात आल्यानंतर त्यांनी रेल्वे पोलिसांना कळवले असता, घणसोली स्थानकात उपस्थित असलेल्या जी. डी. काशीद यांनी तातडीने त्या लोकलच्या डब्यातून बॅग ताब्यात घेतली. रेल्वेत नेहमीच घडतात. मात्र, यावेळी ही बॅग प्रवाशांच्या बॅग पळविण्याचे प्रकार चोरट्यांच्या हाती लागण्यापूर्वीच रेल्वे पोलिसांनी ती संबंधितांना मिळवून दिल्या बद्दल त्यांचे कौतुक होत आहे.

### 'दिव्यांगांपर्यंत योजना पोहचविणार'

**म्हसळो :** संघर्ष दिव्यांग कल्याणकारी संस्थेकडून दिव्यांगांसाठी म्हसळा ग्रामिण रुग्णालयांत झालेला मार्गदर्शन मेळावा घेण्यात आला होता. हा मेळवा नक्कीच सार्थ ठरणारा आसल्याचे गटविकास अधिकारी माधव जाधव आणि म्हसळा ग्रामिण रुग्णालयाचे वैद्यकिय अधिक्षक डॉ. प्रफुल्ल पावसेकर यानी लाभार्थी घटकाना शुभेच्छा देताना सांगितले. माधव जाधव यानी केंद्र आणि राज्य शासनाच्या दिव्यांगांसाठी अनेक योजना असून बहुतांश योजनांची मागणी अर्जदारानी ऑनलाईन पद्धतीने सादर करायची असतात. दिव्यांगाना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असून त्यांना कौशल्य प्रशिक्षण, रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. शासन दिव्यांगाच्या रोजगाराकरिता धोरण तयार करत असून रोजगार व स्टॉल बाबतचे, छोट्या मोठया व्यवसाय धोरण त कौशल्य विकासावर आधारीत आहे. या सर्वबाबत जिल्हापरिषद-पंचायत समितीच्या आधिकार क्षेत्रात आसणाऱ्या सर्व योजनांसाठी आमच्या कडून सहकार्य मिळेल असे सांगितले. यावेळी गटविकास अधिकारी जाधव यानी राज्य शासनाकडून संजय गांधी निराधार, श्रावणबाळ योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात हजार रुपयांची वाढ मंत्रिमंडळाचे निर्णयांत मुख्यमंत्र्यानी मंजूर केल्याचे सांगितले. ग्रामपंचायत, शिक्षण, आरोग्य, जिल्हापरिषद, पंचायत समिती विभागाकडील सर्व योजनांची सविस्तर माहीती दिली.यावेळी म्हसळा ग्रामिण रुग्णालयाचे अधिक्षक डॉ. प्रफुल्ल पावसेकर, म्हसळा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदिप कहाळे, फैज उमर हुर्जुक, मुसद्दीक इनामदार, डॉ.जमादार, शुगुफ्ता जहांगिर, आरती सुगदरे, तमिम जमादार, उत्तम शिंदे, संतोष म्हात्रे, प्राचार्य माळी व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

### दिव्यांग प्रमाणपत्रांचे वाटप



**उरण :** शासकीय ग्रामीण रूग्णालय उरण या रूग्णालयात जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग व मा. मुख्यमंत्री सहायता निधी धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष जिल्हाधिकारी अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग तपासणी व प्रमाणपत्र वाटप शिबीर सोमवार (दि.८) ऑगस्ट रोजी घेण्यात आले. या शिबिरात अस्थिरोग तपासणी, नेत्र तपासणी, मानसिक आजाराची तपासणी करून दिव्यांग प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. यामध्ये एकूण ११० दिव्यांग लाभार्थीनीं नोंद केली त्यातील पात्र लाभार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी करून तपासणी करून व कागदपत्राची पडताळणी करून दिव्यांग प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. बाबासो काळेल वैद्यकीय अधीक्षक इंदिरा गांधी शासकीय ग्रामीण रुग्णालय उरण तसेच इंदिरा गांधी शासकीय ग्रामीण रुग्णालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत केली.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- अलिबाग, श्रीबाग येथे घरकाम व जेवणासाठी बाई पाहिजे आहे. पगार : रू.८,०००/- संपर्क : ९३७२४८०५५४
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. वेटर, मोरी सहाय्यक (Helper) १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसॲप वर मेसेज करावा. मोबाईल : ७५५९१८४६१२
- दुकान गाळा भाड्याने देणे आहे. अलिबाग एसटी स्टँडजवळ ९७६४५४८६७९
- नागावमधील होम स्टे/वाडी सांभाळण्यासाठी पर्मनंट जोडपे हवे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क- ९८२०६०९४५०.
- Teachers Required : Full Time/Part Time Teachers are to be appointed Subjects : Science, Maths, English. Std : 8th,9th. Job location : Alibag. Attractive Salary. Apply : shikshaknokri@gmail.com

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# बँक ऑफ इंडियाच्या वतीने वृक्षारोपण

**रायगड :** बँक ऑफ इंडियाच्या १२० व्या स्थापन दिनाचे औचित्य साधून बँक ऑफ इंडिया ऑफिसर्स असोसिएशन मुंबई व गोवा युनिट यांच्या पुढाकाराने सामाजिक संस्था माणुसकी प्रतिष्ठान, रोटरी क्लब अलिबाग सीशोअर व उज्वल भविष्य यांच्या सहकार्याने चाळमळा डोंगरी येथे वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला.

या मोहिमेत तब्बल २०० देशी वृक्षांची लागवड करण्यात आली. बँकऑफइंडियारायगडविभागाच्या विभागीय व्यवस्थापक दीपन्विता सहानी यांच्या हस्ते वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यांनी वृक्ष लागवडीबरोबरच वृक्ष संवर्धनासाठी आवश्यक ती सर्व मदत करण्याचे आश्वासन दिले. डॉ. नितीन गांधी यांनी संपूर्ण चाळमळा डोंगर वृक्षारोपणाने हिरवागार करण्याचा निर्धार व्यक्त केला. माणुसकी प्रतिष्ठानचे राजाराम हुलवान यांनी बँक ऑफ इंडिया सोबत पुढील काळातही विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचा संकल्प केला. उज्वल भविष्य संस्थेचे अध्यक्ष अंकुश पाटील यांनी लावलेल्या वृक्षांचे संवर्धन करण्याचे आवाहन केले.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, खालील प्रमाणे वर्णन केलेल्या जमीन मिळकती ह्या मिळकती समोर लिहिलेल्या कब्जेदारांकडून आमचे आशिल १) श्री.मिलिंद अरविंद केणी रा. देवनार बाग मुंबई २) श्री. अनंत जर्नादन म्हात्रे रा. जासई ओल्ड पनवेल यांनी कायम खरेदी घेण्याबाबत बोलणी/करार केलेला आहे. सदर मिळकतीचे ७/१२ उताऱ्या प्रमाणे वर्णन खालील प्रमाणे

**जमीन मिळकतींचे वर्णन**
**मौज-बेलवडे बुद्रुक, ता.पेण. जि.रायगड**

| जमीने मालकाचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| शंकर बामा गायकर<br>सुनिल बामा गायकर<br>-सामाईक क्षेत्र- | २४९ | ०.०३.००<br>पो.ख. ०.२३.००<br>एकूण ०.२६.०० | ०.०५ |

शंकर बामा गायकर व सुनिल बामा गायकर यांच्या हिश्याची सामाईक क्षेत्र एकूण ०.२६.०० एवढी मिळकत आमचे अशिल कायमस्वरूपी खरेदी करीत आहेत.

तरी वरील मिळकतींचे बाबतीत अन्य कोणचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षीस, चार्ज, अॅटेचमेंट, लिज, लीन, वैगरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध, असल्यास हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून (सात) ०७ दिवसांच्या आत खालील पत्यावर प्रथम दर्शनी पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकतीं ह्या बोजाविरहित आहे, असे समजून आमचे आशिल सदर मिळकतींचे खरेदीखताचा व्यवहार मालकांन सोबत पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. व त्या आमचे आशीलांचे लाभामध्ये सोडून दिलेल्या आहेत असे समजण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

पेण
दि. ०९/०९/२०२५

सही/-
**श्री. नितीन हरिश्चंद्र पाटील**
अॅडव्होकेट
पाटील वाडा, कवंडाळ तलाव, पेण,
ता.पेण, जि.रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे कुदे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत विद्यमान मालक श्री. सुरेश धर्मा वावेकर रा.मु.पो.सुडकोली, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशी तोंडी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| कुदे<br>ता.अलिबाग<br>जि.रायगड | ३३० | १-२२-००<br>पो.ख.०-१०-१०<br>एकूण १-३२-१० | २३-४७ |

सदरहु मिळकतींपैकी श्री. सुरेश धर्मा वावेकर यांच्या मालकीच्या ०-८७-० हे.आर.पैकी ०-१६-० हे.आर मिळकत.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्युपत्र, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे अॅडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. ८-०९-२०२५

सही/-
**अॅड. नंदकुमार पांडुरंग तांबडकर**
मु.पो.सुडकोली, ता.अलिबाग
मोबाईल नं. ९०११७७९०८१/
९२७२२७४०५५

## जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक आशिष विनोद अग्रवाल व शालिनी आशिष अग्रवाल यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

| गावाचे नाव | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे अंजप, ता.कर्जत, जि.रायगड | ७९/३ | २.१७.०० | १.०० |
| | ७९/६ | ०.१३.०० | ०.०५ |
| | ८०/३ | ०.४५.१० | २.२४ |
| | ८०/२/ब | १.१७.६० | २.०० |

वरील वर्णनाच्या शेत जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : १०/०९/२०२५

**अॅड. उमेश आनंद भगत**
**अधिवक्ता**
मु.पो.चिंचवळी ता.कर्जत
जि. रायगड
मो.नं.९०४९४८६८०५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे मजगाव, ता. मुरुड, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक शोएब निसार कासकर, रा. मु.पो. राजपुरी, ता. मुरुड, जि. रायगड यांच्या नांवे असलेली भातशेती मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| मजगाव<br>ता.मुरुड | २१८/२ | ०-२१-३०<br>पो.ख.०-०३-००<br>एकूण ०-२४-३० | २.८३ |

सबब सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहू सदर मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : /०९/२०२५

सही/-
**अॅड. धिरज जयवंत म्हात्रे**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड.

सही
मूळ मालक शोएब निसार कासकर

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे - आर्ढे, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.-पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| सुर्याजी विठ्ठल शेळके व इतर | ६७ | ९अ | ०-४८-३० | ५ | ५० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

सही/ -
**अॅड.जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- ०९/०९/२०२५
मो. नं. ९०२८९८२२७७

कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं.४, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका कार्यालयाशेजारी, ता.कर्जत, जि.रायगड.४१०२०१ ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीप्रमाणे नमुद मौजे वांदेली, ता.मुरूड, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक शैलेश गजानन खोत यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे

**मौजे वांदेली, ता. मुरुड, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| वांदेली<br>ता.मुरुड | १२८ | क्षेत्र १-४७-००<br>पो.ख.०-२४-००<br>एकुण क्षेत्र १-७१-०० | १.१९ |

**वर नमुद मिळकतीपैकी विद्यमान मालक शैलेश गजानन खोत यांच्या नावे असलेले क्षेत्र ०-२०-२० हे. आर. या जमिन मिळकतीबाबतचे**

दिनांक : ०९/०९/२०२५
अशिलांची सही

**अॅड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर सूचना

असे सूचित करण्यात येते की,श्री. महेंद्र वसंतराय दोशी व इतर यांचेकरिता श्री.महेंद्र वसंतराय दोशी अधिकृत स्वाक्षरीकर्ता तथा प्रकल्प अधिकारी यांच्या मौजे मापगाव, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खाजगी जमीन गट क्र. 163 करिता पोहोच रस्त्यासह पाण्याची पाईपलाईन, इलेक्ट्रिकल लाईन, रस्त्यालगत ड्रेनेज लाईन बांधकामासाठी आणि इतर उपयुक्त सेवा इ.कामाकरिता मौजे मापगाव, ता. अलिबाग, जि.रायगड येथील जुना सर्व्हे क्र. 96/1/1 आणि सर्व्हे क्र. 94 येथील 0.0754335 हेक्टर (मूळ क्षेत्र 0.2012 हेक्टर) संरक्षित वनजमिन वन (संरक्षण व संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत वळती करण्याच्या प्रस्तावास भारत सरकार (एम.ओ.इ.एफ.सी.सी.) प्रादेशिक कार्यालय, नागपूर यांचे पत्र क्र. ऑनलाईन प्रस्ताव नं एफपी/एमएच/रोड/422815/2023, दिनांक 11/03/2024 आणि पत्र क्र. ऑनलाईन प्रस्ताव नं. एफपी/एमएच/रोड/422815/2023, दिनांक 24/09/2024 अन्वये अनुक्रमे तत्वत: मान्यता व अंतिम मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र शासन (वन विभाग), मुख्य वनसंरक्षक (प्रा.),ठाणे वनवृत्त, ठाणे यांचेकडील आदेश जा. क्र. कक्ष 10/वसं/ब-20/प्र.क्र.99/24-25/146/2025-26, दिनांक 25/07/2025 अन्वये मौजे मापगाव, ता.अलिबाग,जि. रायगड येथील जुना सर्व्हे क्र.96/1/1 आणि सर्व्हे क्र.94 येथे पाण्याची पाईपलाईन, विद्युत वाहिनी,नाले लाईन व इतर सेवांकरिता दळणवळण रस्ता बांधण्यासाठी वन (संरक्षण व संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत 0.0754335 हेक्टर (मूळ क्षेत्र 0.2012 हेक्टर) संरक्षित वनजमीन वळतेकरण प्रस्ताव एकरेषीय (Linear) प्रकल्पास काम सुरु करण्याची (Working Permission) परवानगी सुद्धा देण्यात आलेली आहे.सदरची परवानगी खालील अटी/शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन राहून देण्यात आली आहे.

1) सदर परवानगी प्रकल्पांतर्गत प्रस्तावित वळतेकरण वनक्षेत्रात कामे सुरु करणे पुरती मर्यादित आहे. आणि सदर परवानगी सहा महिन्यासाठीच म्हणजेच दि.25.01.2026 पर्यंतच वैध (Valid) राहील म्हणजेच सदर परवानगी दिनांक 26.01.2026 पासून आपोआप रद्द झालेचे समजण्यात येईल. सदर परवानगी जारी झाल्यानंतर सहा महिन्याचे कालावधीत प्रकल्प यंत्रणेस केंद्र शासन तत्वत: व अंतीम मान्यता पत्रातील सर्व अटी व शर्तीची पूर्तता करुन राज्य शासनाकडून वळतेकरण आदेश प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

2) केंद्र शासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र. 1.2 अन्वये वळतीकरण क्षेत्राच्या सिमांकनासाठी प्रकल्प यंत्रणेने रक्कम रुपये 2,39,862/- उप वनसंरक्षक, अलिबाग यांचेकडे दिनांक 10.07.2025 रोजी धनाकर्षाद्वारे अदा केलेले आहेत.

3) केंद्र शासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र. 1.3 अन्वये 10 पट वृक्षांच्या लागवड व देखभाल करीता प्रकल्प यंत्रणेने रक्कम रुपये 2,53,204/- कॅम्पा प्राधिकरणाकडे दिनांक 15.07.2024 रोजी अदा केलेले आहेत.

4) केंद्र शासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र. 1.4 अन्वये नक्त वर्तमान मूल्य अंतर्गत प्रकल्प यंत्रणेने रक्कम रुपये 84,252/- कॅम्पा प्राधिकरणाकडे दिनांक 15.07.2024 रोजी अदा केलेले आहेत.

5) केंद्र शासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र. 1.7 अन्वये सदर प्रस्तावामध्ये वृक्षतोड नाही.

6) केंद्रशासन पत्रातील अट क्रमांक 1.11 नुसार जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील दि. 03.04.2025 रोजीचे वन हक्क कायदा, 2006 प्रमाणपत्र प्रकल्प यंत्रणेने सादर केलेले आहे. प्रस्तावांतर्गत वनक्षेत्रात पट्टेधारक पात्र प्लॉट धारक इत्यादी येत असल्यास नियमानुसार पुर्नवसन / मोबदला देण्याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील. बाबत प्रकल्प यंत्रणेने बंधपत्र सादर केलेले आहे.

7)केंद्र शासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र. 1.12 ला अनुसरुन प्रकल्प यंत्रणेने सदर प्रकल्पासाठी आवश्यकतेनुसार पर्यावरणीय मान्यता मिळविणेबाबत नमूद केले आहे. याबाबत प्रकल्प यंत्रणेने बंधपत्र सादर केले आहे.

8) प्रकल्प यंत्रणेने प्रस्तावित क्षेत्रात कामे सुरु करण्यापुर्वी, उप वनसंरक्षक अलिबागयांना कळविणे आवश्यक आहे. उप वनसंरक्षक अलिबाग यांनी कामे सुरु असताना प्रस्तावित वन जमिनीवर वनभंग झाला आहे का ते पाहणे. वनभंग झाल्याचे निदर्शनास आल्यास केंद्र शासनाचे पर्यावरण,वन व जलवायु मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील Hand Book मधील परिच्छेद क्र. 1.16 अनुसार कारवाई करतील.

9) प्रकल्पामुळे प्रकल्पांतर्गत क्षेत्रातील पक्षी / वन्यजीवांचे वस्तीस्थान नष्ट न होता अबाधित राहण्याकरीता काही उपाययोजना सुचविल्यास आवश्यक ती उपाययोजना प्रकल्प यंत्रणा करेल.

10) प्रकल्पांतर्गत वनक्षेत्रात प्रकल्प प्राधिकरणाकडून कामे करताना वनसंपदेचे नुकसान होणार नाही, याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

11) केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र. 1.1,1.5,1.6, 1.8, 1.9, 1.10, 1.13, 1.14, 1.15,1.16, 1.17, 1.18, 1.19 व 1.20 बाबत प्रकल्प यंत्रणेने दिलेले बंधपत्रातील मुद्द्यांबाबत प्रकल्प प्राधिकरणाकडून विहित कालावधीत पूर्तता केली जाईल याबाबत उप वनसंरक्षक, अलिबाग यांची जबाबदारी राहील,

उपरोक्त अटींपैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न केल्यास (Non Compliance) उप वनसंरक्षक, अलिबाग हे वन (संरक्षण व संवर्धन) अधिनियम, 1980 आणि नियम 2023 अंतर्गत केंद्र शासनाचे पर्यावरण, वन व जलवायू मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील Hand Book मधील परिच्छेद क्रमांक 1.16 अनुसार अहवाल सादर करतील.

**सदर जमिनीचा तपशील खालीलप्रमाणे :**

**तपशील**

| तालुका | गाव | जुना सर्व्हे नं. | सर्व्हे नं. | वन क्षेत्र (हेक्टर मध्ये) | वनाचा वैधानिक दर्जा |
|---|---|---|---|---|---|
| अलिबाग | मापगाव | 96/1/1 | 94 | 0.0754335 | संरक्षित वन |

वर नमूद तत्वत: मान्यता व अंतिम मान्यता पत्र केंद्र शासनाच्या www.parivesh.nic.in या संकेत स्थळावर आणि महाराष्ट्र शासन वनविभागाचे आदेश हे www.mahaforest.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

दिनांक : 08/09/2025
ठिकाण : मुंबई

सही/-
**प्रतीक महेंद्र दोशी**
**दिवंगत श्री.महेंद्र वसंतराय दोशी यांच्या वतीने**
**अधिकृत स्वाक्षरीकर्ता**
**तथा प्रकल्प अधिकारी**
**पत्ता:-** 203,एम्बॅसी सेंटर,नरिमन पॉईंट,
मुंबई - 400021

IIFL FINANCE
**CIN: L67100MH1995PLC093797**
**Regd. Office:** IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

## सोन्याचा दागिन्यांचा ई-लिलावाची सार्वजनिक सूचना

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांसाठी गहाण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा **ई-प्रोक्योरमेंट टेक्नोलॉजीज लिमिटेड** मार्फत त्यांच्या **https://egold.auctiontiger.net** या ऑनलाईन लिलाव मंचावरून दिनांक **16.09.2025 रोजी दुपारी 02:00 ते 05:00** दरम्यान सार्वजनिक लिलाव करण्यात येणार आहे. स्थान किंवा तारखेतील बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे दर्शविला जाईल. येथे उल्लेख केलेल्या तारखेस कोणत्याही कारणास्तव ई-लिलाव होऊ शकला नाही किंवा त्याच दिवशी पूर्ण झाला नाही, तर लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर त्याच अटी व शर्तीसह उक्त लिलाव पुढील कोणत्याही तारखेला आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. लिलावात विक्री न झालेले सोन्याच्या दागिन्यांचा लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर प्रदर्शित केल्यावर पुढील कामकाजी दिवसांवर लिलाव केला जाईल. शाखा स्तरावरील लिलाव अयशस्वी झाल्यास, **26.09.2025** रोजी त्यांचा निर्दिष्ट जिल्हा केंद्रात जिल्हा स्तरावर आणखी कोणत्याही नोटीसशिवाय पुन्हा लिलाव करण्यात येईल. कोणत्याही कारणास्तव, येथे उल्लेखित तारखेस जिल्हा स्तरावर लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर त्याच अटी व शर्तींसह पुढील कोणत्याही तारखेला जिल्हा स्तरावर लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. जर ग्राहकाचा मृत्यू झाला, तर सर्व नियम आणि अटी त्याच्या नॉमिनी/ वैधानिक वारसदार यांच्यावर लागू होणार.

जिल्हा केंद्र: **नागोठणे-मोनालिसा कॉम्प्लेक्स - आयआयएफएल फायनान्स, शांती नगर नागोठणे, बाजार पेठ रोड कोकणे हॉस्पिटल समोर, ता. रोहा, जिल्हा-रायगड पिन 412106**

**शाखेचे नांव: अलिबाग- श्री बाग जीएल, तालुका - अलिबाग.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL34206264, GL34395377, GL34239383, GL34497852, GL34507104, GL35685018, GL35048486, GL39985762, GL34506435, GL34492482, GL34499527.
**शाखेचे नांव: महाड - रायगड जी एल, तालुका - महाड**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक:** GL34480287, GL34471506, GL34506975, GL37460279, GL38718291, GL39027782, GL34497330, GL39673452, GL38457497, GL34508753.
**शाखेचे नांव: माणगाव-माणगाव मुंबई गोवा रोड जीएल, तालुका - माणगाव.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL34529661, GL34515618, GL34390955, GL34602762, GL34438472.
**शाखेचे नांव: मुंबई एनएम-पेण नगरपालिका इमारत जीएल, तालुका - पेण.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL34269467, GL34251504, GL34276499, GL34483487, GL38347694, GL37444585, GL34503615, GL34487047, GL34503439, GL37726624.
**शाखेचे नांव: मुंबई-रोहा जीएल, तालुका - रोहा .**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL34481414, GL34392734.
**शाखेचे नांव: नागोठणे - मोनालिसा कॉम्प्लेक्स, तालुका - रोहा .**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक:** GL34515182, GL34461821, GL34457197, GL34529044, GL34415185.
**शाखेचे नांव: पोयनाड नसरापूर जीएल , तालुका - अलिबाग.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL34269571, GL34251157.
**शाखेचे नांव: रेवदंडा - रेवदंडा जी एल, तालुका - अलीबाग.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक:** GL34528134, GL34518356, GL34446767, GL34462421, GL34475735, GL34477933.
**शाखेचे नांव: श्रीवर्धन-श्रीवर्धन जीएल, तालुका - श्रीवर्धन.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL34470928, GL34480117, GL40042871.
**शाखेचे नांव: सुधागड पाली-पाली जीएल , तालुका - सुधागड-पाली**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL34460543, GL34454712, GL34461558, GL34444951.

ई-लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. ई-लिलाव प्रक्रिया आणि विक्री (झाल्यास) ई-लिलावाकरिता असलेल्या अटी आणि नियम या संपूर्णपणे आयआयएफएलच्या अनुसार किंवा लागू करतांना त्यांना अनुरूप वाटतील त्या पद्धतीच्या असतील. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरून ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

**तारीख : 11.09.2025**
**स्थळ: रायगड**

**स्वाक्षरीकर्ता/-**
**अधिकृत स्वाक्षरीकर्ता**
**आयआयएफएल फायनान्स लिमिटेड**

IIFL FINANCE
**CIN: L67100MH1995PLC093797**
**Regd. Office:** IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

## सोन्याचा दागिन्यांचा ई-लिलावाची सार्वजनिक सूचना

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांसाठी गहाण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा **ई-प्रोक्योरमेंट टेक्नोलॉजीज लिमिटेड** मार्फत त्यांच्या **https://egold.auctiontiger.net** या ऑनलाईन लिलाव मंचावरून दिनांक **16.09.2025 रोजी दुपारी 02:00 ते 05:00** दरम्यान सार्वजनिक लिलाव करण्यात येणार आहे. स्थान किंवा तारखेतील बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे दर्शविला जाईल. येथे उल्लेख केलेल्या तारखेस कोणत्याही कारणास्तव ई-लिलाव होऊ शकला नाही किंवा त्याच दिवशी पूर्ण झाला नाही, तर लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर त्याच अटी व शर्तीसह उक्त लिलाव पुढील कोणत्याही तारखेला आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. लिलावात विक्री न झालेले सोन्याच्या दागिन्यांचा लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर प्रदर्शित केल्यावर पुढील कामकाजी दिवसांवर लिलाव केला जाईल. शाखा स्तरावरील लिलाव अयशस्वी झाल्यास, **26.09.2025** रोजी त्यांचा निर्दिष्ट जिल्हा केंद्रात जिल्हा स्तरावर आणखी कोणत्याही नोटीसशिवाय पुन्हा लिलाव करण्यात येईल. कोणत्याही कारणास्तव, येथे उल्लेखित तारखेस जिल्हा स्तरावर लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर त्याच अटी व शर्तींसह पुढील कोणत्याही तारखेला जिल्हा स्तरावर लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. जर ग्राहकाचा मृत्यू झाला, तर सर्व नियम आणि अटी त्याच्या नॉमिनी/ वैधानिक वारसदार यांच्यावर लागू होणार.

जिल्हा केंद्र: **पनवेल-सेक्टर 19 जीएल - आयआयएफएल फायनान्स लिमिटेड, गिरिजा आनंद बनवली , ग्रा. मजला, दुकान क्रमांक 1/2/3, से-19, स्टेशन रोड, विजय मार्ग , नवीन पनवेल-410206**

**शाखेचे नांव: कर्जत-कर्जत जीएल, तालुका - कर्जत.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL34488827, GL34506401, GL34478192, GL39810121, GL34476517, GL34503815, GL35057695, GL36694224, GL34483634.
**शाखेचे नांव: मुंबई एनएम-कळंबोली जीएल, तालुका - पनवेल.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL34480647, GL34473071, GL34529567, GL34520191, GL39221891, GL35856790, GL34481353, GL35843607, GL34475529.
**शाखेचे नांव: मुंबई एनएम-खोपोली जीएल, तालुका - खालापूर.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL34504185, GL34487619, GL34463958, GL34450682, GL34454037, GL34464343, GL34452414, GL33845635, GL33859402.
**शाखेचे नांव: मुंबई एनएम-मोहोपाडा-न्यू पोसरी जीएल, तालुका - खालापूर.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL27781226, GL34000749, GL38612832, GL34513337, GL34524978.
**शाखेचे नांव:मुंबई एन एम - पनवेल उरण नाक, तालुका - पनवेल.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक:** GL34525193, GL36784331, GL34516570, GL39993595, GL38377020, GL34449501.
**शाखेचे नांव: कामोठे-सेक्टर 18 जीएल, तालुका - पनवेल.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL34512657, GL34525157, GL34486678, GL34502797, GL27187945, GL34481504.
**शाखेचे नांव: मुंबई-खारघर-सेक्टर 13 कुलस्वामिनी, तालुका - पनवेल.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL38259597, GL34946729, GL34504076, GL34491079, GL35150310, GL34504692, GL34491624, GL34409362.
**शाखेचे नांव: मुंबई-पनवेल सेक्टर 19 जीएल, तालुका - पनवेल.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL34440630, GL34353355, GL34469121, GL34526200, GL34479572, GL34521247, GL35916872, GL35916822, GL19426202.
**शाखेचे नांव: मुंबई-उरण बाजार पेठ जीएल, तालुका - उरण.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL30582511, GL31357195.
**शाखेचे नांव: तळोजा फेज 1 जीएल, तालुका - पनवेल.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL34478467, GL34466071, GL37980171, GL34453154, GL34528516.
**शाखेचे नांव: नेरल - जी एल, तालुका - कर्जत.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक:** GL34463939, GL35652580, GL34450557.
**शाखेचे नांव: उलवे जीएल, तालुका - पनवेल.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL33709839, GL33688140.

ई-लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. ई-लिलाव प्रक्रिया आणि विक्री (झाल्यास) ई-लिलावाकरिता असलेल्या अटी आणि नियम या संपूर्णपणे आयआयएफएलच्या अनुसार किंवा लागू करतांना त्यांना अनुरूप वाटतील त्या पद्धतीच्या असतील. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरून ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

**तारीख : 11.09.2025**
**स्थळ: रायगड (एमएच)**

**स्वाक्षरीकर्ता/-**
**अधिकृत स्वाक्षरीकर्ता**
**आयआयएफएल फायनान्स लिमिटेड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे झुगरेवाडी, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ४६/७ | एकुण क्षेत्र २-०९-०० हे.आर. | १.२५ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेउन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

**सही/-**
दिनांक :- १०/०९/२०२५
ठिकाण :- पनवेल

**अॅड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ता:- शॉप नं.२३, प्लॉट नं. ५१, कल्पतरु कॉम्प्लेक्स, सेक्टर ०९ खांदा कॉलनी, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६

## माणगांव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, उतेखोल
**माणगांव-रायगड**
**सत्तावीसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस (फक्त सभासदांसाठी)**

मा.श्री./सौ.

माणगांव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित उतेखोल, ता. माणगांव या संस्थेच्या भागधारकांची सत्तावीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. आनंद शिवराम यादव यांचे अध्यक्षतेखाली शुक्रवार दिनांक १२/०९/२०२५ रोजी सकाळी ठिक ११.३० वाजता चौधरी कॉम्प्लेक्स, निजामपूर रोड, माणगांव जि.रायगड येथे घेण्यांत येणार आहे. तरी आपण सर्वांनी सभेकरीता वेळेवर उपस्थीत राहून सहकार्य घ्यावे हि विनंती.

**** सभेपुढील कामे ****

१) दिनांक २०/०९/२०२४ रोजी झालेल्या सव्वीसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे लिखीत इतिवृत्त वाचून मंजुर करणे.
२) संचालक मंडळाने सादर केलेले ३१ मार्च २०२५ अखेरचे संस्थेचे नफा-तोटा पत्रक, ताळेबंद पत्रक व वार्षिक अहवाल वाचून मंजुरी देणे.
३) सन २०२४-२०२५ सालचा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल वाचून मंजुर करणे.
४) सन २०२४-२०२५ या वर्षासाठी मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मान्यता देणे व लाभांश जाहिर करणे.
५) सन २०२५-२०२६ सालच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
६) संस्थेच्या संचालक व त्यांचे नातेवाईकांस दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
७) सन २०२५-२०२६ या वर्षाकरीता निबंधकांनी जाहिर केलेल्या पॅनलमधिल पात्र वैधानिक लेखापरिक्षक यांची नेमणूक करणे.
८) तक्रार व तडजोड समिती स्थापन करणे.
९) अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी उपस्थित होणारे विषय.

दिनांक : २८/०८/२०२५
ठिकाण: उतेखोल-माणगांव

संचालक मंडळाचे अनुज्ञेने,
**पुंडलीक तु. गायकवाड**
**व्यवस्थापक**
**माणगांव ग्रामीण बिगरशेती सह. पतसंस्था मर्यादित, उतेखोल-माणगांव**

## सार्वजनिक वाचनालय आणि जिल्हा ग्रंथालय अलिबाग-रायगड
**वार्षिक अहवाल २०२४-२०२५**
**वार्षिक सर्वसाधारण सभेचा अजेंडा**
**(फक्त सभासदांसाठी)**

स.न.वि.वि

सार्वजनिक वाचनालय आणि जिल्हा ग्रंथालय,अलिबाग-रायगड या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक २६ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता डोंगरे हॉल,अलिबाग येथे भरविण्यात येणार आहे. तरी सर्व सभासदांनी या सभेस उपस्थित रहावे. ही विनंती.

**सभेपुढील कामकाज**

१. मागील सभेचे इतिवृत्त वाचून त्यास मंजुरी देणे.
२. सन २०२४-२०२५ चे हिशोब तपासणीसांकडून आलेले हिशेब, ताळेबंद मंजूर करणे.
३.कार्यकारी मंडळाने सादर केलेल्या सन २०२४-२०२५ च्या अहवालसास मंजुरी देणे.
४. संस्थेच्या सन २०२५-२०२६ च्या वार्षिक अंदाजपत्रकास मंजुरी देणे
५. सन २०२५-२०२६ या सालाकरीता संस्थेच्या हिशोब तपासणीसांची नेमणूक करणे.
६. मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या आयत्या वेळच्या कामांचा विचार करणे.

अलिबाग
दिनांक : १०/०९/२०२५

आपला
**अॅड.गौतम प्रमोद पाटील**
अध्यक्ष
सार्वजनिक वाचनायल, अलिबाग

**विशेष सूचना :**
१) संस्थेच्या हितास अधिन राहून अहवाल काळातील आवश्यक ती कागदपत्रे सभेपूर्वी तीन दिवस अगोदर कार्यालयीन वेळेत सायंकाळी ६.०० ते ७.०० या कालावधीत लेखी मागणी केल्यास पहावयास मिळतील.
२) सदर सभा कोरम अभावी तहकूब झाल्यास ती त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल. सभेत कोरमची आवश्यकता राहणार नाही.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# निवडक

## सूर्यकुमार यादवचा आक्रमक बाणा

**नवी दिल्ली** : आशिया कप स्पर्धेतील पाकिस्तान विरुद्धच्या हायहोल्टेज सामन्याआधी भारतीय संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव याने मोठं वक्तव्य केले आहे. आम्ही मैदानात आक्रमक अंदाजातच उतरतो, असे सांगत पाकिस्तानविरुद्धही हाच बाणा दिसेल, असे तो म्हणाला. भारत-पाक यांच्यातील आशिया कप स्पर्धेतील लढत ही १४ सप्टेंबरला दुबईच्या मैदानात रंगणार आहे. पहलगाम येथील दहशतवादी हल्ला अन् त्यानंतर भारत-पाक यांच्यात निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीनंतर पहिल्यांदाच दोन देशातील संघ क्रिकेटच्या मैदानात समोरासमोर येणार आहेत. सूर्यानं आपलं मत व्यक्त केल्यावर पाकिस्तान संघाटा कर्णधार सलमान अली आगानं वाकड्यात शिरण्याचा प्रकार केल्याचे दिसून आले. तो म्हणाला की, जे कुणी आक्रमक अंदाज दाखवणार असतील त्यांचे स्वागत आहे. पण ही आक्रमकता फक्त मैदानापर्यंतच राहू दे.'' त्याचे हे वक्तव्य फुकचा अहंकार दाखवणारे आहे, अशा आशयाच्या कमेंट सोशल मीडियावर उमटताना दिसत आहेत.

## कॅलम फ्रॅक्चरमुळे दौऱ्यातून बाहेर

**नवी दिल्ली** : इंडिया ए टीम आशिया कप स्पर्धेदरम्यान मायदेशात ऑस्ट्रेलिया ए विरुद्ध भिडणार आहे. इंडिया ए विरुद्ध ऑस्ट्रेलिया ए यांच्यात ४ दिवसांचे २ सामने होणार आहेत. त्यानंतर ३ अनऑफिशियल वनडे सामने होणार आहेत. ऑस्ट्रेलिया ए टीम या दोन्ही मालिकांसाठी भारत दौऱ्यावर येणार आहे. त्याआधी ऑस्ट्रेलिया ए टीमला मोठा झटका लागला आहे. ऑस्ट्रेलिया ए टीमच्या युवा खेळाडूला दुखापतीमुळे भारत दौऱ्यातून बाहेर व्हावं लागलं आहे. ऑस्ट्रेलिया ए टीमचा वेगवान गोलंदाज कॅलम विल्डर याला स्ट्रेस फ्रॅक्चरमुळे दौऱ्यातून बाहेर व्हावं लागलं आहे. विल्डरआधी ऑस्ट्रेलियाच्या प्रमुख खेळाडूंनाही दुखापतीमुळे मल्टी डे टेस्ट सीरिजमधून बाहेर व्हावं लागलंय. दुखापत झालेल्या खेळाडूंमध्ये पॅट कमिन्स, लान्स मॉरिस आणि ब्रॉडी काउच यांचा समावेश आहे. कॅलम विल्डर याला सरावादरम्यान पाठीत त्रास जाणवू लागला. विल्डरने त्रास होत असल्याची माहिती दिली. त्यानंतर विल्डरच्या आवश्यक चाचण्या करण्यात आल्या. त्यात विल्डरला स्ट्रेस फॅक्चर असल्याचं समोर आलं. त्यामुळे विल्डरला पूर्णपणे फिट होण्यासाठी वेळ लागेल.

## अयान पुणेरी पलटनवर पडला भारी!

**मुंबई** : प्रो कबड्डी लीग स्पर्धेच्या १२ व्या हंगामातील २२ वा सामना पुणेरी पलटन आणि पटना पायरेट्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात पटना पायरेट्सकडून दमदार खेळ पाहायला मिळाला. दोन्ही संघातील चढाईपटूंनी एकसमान गुण कमावले. पण बचावत पुणेरी पलटनचा संघ मागे पडला. अयान एकटाच पुणेरी पलटनवर भारी पडला. हा सामना पटना पायरेट्सने ४८- ३७ च्या फरकाने आपल्या नावावर केला. या सामन्यात पटना पायरेट्सकडून अयानने एकट्याने २१ गुणांची कमाई केली. तर मिलन दहियाने ५ गुण कमावले. पुणेरी पलटनकडून सचिन तन्वरने ६ आणि अभिषेक गुंगेने ५ गुणांची कमाई केली. पण एकटा अयान पुणेरी पलटनवर भारी पडला. या सामन्यातील दुसऱ्या चढाईत अयानने १ गुण घेत पटना पायरेट्सला दमदार सुरुवात करून दिली. प्रत्युत्तरात पंकज मोहितेने १ गुण घेत पुणेरी पलटनला खातं उघडून दिलं. अयानने पटना पायरेट्ससाठी दुसरी चढाई करताना सुपर रेड करत संघाला आघाडी मिळवून दिली. सामन्यातील पाचव्या मिनिटाला पुणेरी पलटनला पहिला मोठा धक्का बसला.

## अनायाला लग्नासाठी प्रपोज

**नवी दिल्ली** : अनाया बांगरसोबत लग्न करायला मुलं उत्सुक आहेत, असा आश्चर्यजनक खुलासा तिने केला आहे. त्यामुळे सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत. अनाया सध्या अश्नीर ग्रोव्हरच्या रिॲलिटी शो राईज अँड फॉलमध्ये सहभागी आहे. यावेळी बोलताना अनायाने तिच्यासोबत लग्न करण्यासाठी मुलं किती उत्सुक आहेत, याचा खुलासा केला.माझ्याकडे आतापर्यंत ३० ते ४० हजार स्थळं आली आहेत. मी लग्न करण्यास खूप उत्सुक आहे, पण सध्या माझ्याकडे एवढा वेळ नाही की मी सर्वांशी संवाद साधू शकेन.अनाया बांगर ही सोशल मीडियावर तिच्या हटके व्हिडिओंमुळे खूप लोकप्रिय झाली आहे. लोक तिच्या व्हिडीओंवर मोठ्या प्रमाणात लाईक्स आणि कमेंट्स करतात. तिच्या एका व्हिडिओमध्ये तिने सांगितले की, लोक तिला लग्नासाठी प्रपोज करत आहेत आणि तिला इतके स्थळे आली आहेत की तिला त्या सगळ्यांना उत्तर देणे शक्य होत नाही. तिने हेही स्पष्ट केले की, ती सध्या फक्त तिच्या करिअरवर लक्ष केंद्रित करत आहे. पण भविष्यात जेव्हा ती लग्न करण्याचा विचार करेल, तेव्हा ती नक्कीच या प्रस्तावांचा विचार करेल. अशाप्रकारे अनायाने लग्नाबद्दल खास खुलासा केला त्यामुळे सर्वांच्या भुवया उंचावल्या.

---

सीएएफए नेशन्स कप

# भारताला कांस्यपदक



### ओमानला पेनल्टी शूटआउटमध्ये हरवले

**। ताजिकिस्तान । वृत्तसंस्था ।**

भारतीय फुटबॉल संघाने पहिल्याच नेशन्स कपमध्ये ओमानचा पेनल्टी शूटआउटमध्ये ३-२ असा पराभव करून कांस्यपदक जिंकले. फुटबॉल क्रमवारीत ओमान ७९ व्या स्थानावर आहे, तर भारत १३३ व्या स्थानावर आहे. ताजिकिस्तानमधील हिसोर सेंट्रल स्टेडियमवर खेळला गेलेला तिसऱ्या स्थानाचा प्लेऑफ १-१ असा बरोबरीत संपला.

### हाफ टाइमनंतर दोन्ही संघांचे गोल

सामन्याच्या ५५ व्या मिनिटाला ओमानकडून जमील अल याहमादीने गोल केला, परंतु ८० व्या मिनिटाला उदंता सिंगने शानदार हेडरने गोल करून बरोबरी साधली. त्यानंतर सामना अतिरिक्त वेळेत गेला. ९६ व्या मिनिटाला ओमानच्या अली अल बुसैदीला रेड कार्ड मिळाले आणि संघ १० खेळाडूंवर घसरला. तरीही, बराच वेळ वर्चस्व गाजवूनही भारत विजयी गोल करू शकला नाही आणि सामना पेनल्टीद्वारे निकाली काढण्यात आला.

### भारताने पहिल्यांदाच ओमानला हरवले

यासह, भारतीय संघाने आंतरराष्ट्रीय फुटबॉल सामन्यात ओमानला पहिल्यांदाच हरवले आहे. दोन्ही संघ त्यांच्या गटात दुसऱ्या स्थानावर राहिले, ज्यामुळे त्यांना तिसऱ्या स्थानाच्या सामन्यात खेळण्याची संधी मिळाली. २००० पासून भारताने ओमानविरुद्ध नऊ पैकी सहा सामने गमावले आहेत. दोन्ही संघांमधील शेवटचा सामना मार्च २०२१ मध्ये खेळला गेला होता जो १-१ असा बरोबरीत सुटला.

पेनल्टी शूटआउटमध्ये भारताकडून लालियानझुआला छांगटे, राहुल भेके आणि जितिन एमएस यांनी गोल केले. आणि भारताला ऐतिहासिक विजय मिळवून दिला.

---

आशिया कप क्रिकेट स्पर्धा २०२५

# विजेत्या संघावर होणार पैशांचा वर्षाव

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आशिया कपमध्ये ८ संघ सहभागी होत आहेत, ज्यांना ४-४ अशा दोन गटांत विभागण्यात आलं आहे.ग्रुप-एमध्येभारत,पाकिस्तान, ओमान आणि यूएई आहेत. तर ग्रुप-बी मध्ये गतविजेता श्रीलंका, अफगाणिस्तान, बांगलादेश आणि हाँगकाँग या संघांचा समावेश आहे. स्पर्धा सुरू होण्याआधीच सर्व संघांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. आशिया कप २०२५ च्या बक्षीस रकमेत तब्बल १ कोटी रुपयांची वाढ करण्यात आली आहे.

जेव्हा श्रीलंकेने २०२२ मध्ये टी स्वरूपात आशिया कप जिंकला होता, त्यावेळी त्यांना सुमारे १.६ कोटी रुपयांची बक्षीस रक्कम मिळाली होती. तर उपविजेता ठरलेल्या पाकिस्तानला ७९.६६ लाख रुपयांचं पारितोषिक देण्यात आलं होतं. तिसऱ्या आणि चौथ्या स्थानावर राहिलेल्या संघांना अनुक्रमे सुमारे ५३ लाख आणि ३९ लाख रुपये मिळाले होते.

२०२६ च्या टी २० वर्ल्ड कपला लक्षात घेऊन एशियन



क्रिकेट कौन्सिलने या वेळेस बक्षीस रक्कम वाढवली आहे. २०२२ टी २० आशिया कपच्या तुलनेत, या वर्षी विजेत्या संघासाठी बक्षीस रक्कम २.६ कोटी रुपये आहे, जी अंदाजे ३००,००० अमेरिकन डॉलर्स इतकी आहे. म्हणजेच मागच्या वेळेपेक्षा जवळपास १ कोटी रुपयांची वाढ झाली आहे. तर उपविजेता संघाला १.३ कोटी रुपयांची बक्षीस रक्कम मिळण्याची अपेक्षा आहे. याशिवाय, स्पर्धेच्या अखेरीस प्लेयर ऑफ द सिरीजला १२.५ लाख रुपयांचं पारितोषिक देण्यात येणार आहे.

---

## ख्रिस गेलला रडू कोसळलं!

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आक्रमक खेळाडू ख्रिस गेलने एक धक्कादायक खुलासा केला आहे. आयपीएलमध्ये पंजाब किंग्सकडून खेळताना मिळालेली वागणूक पाहता ख्रिस गेल नाराज झाला होता. इतकंच काय तर आयपीएल स्पर्धेला रामराम ठोकण्याची वेळ आली. एक वेळ ख्रिस गेलला डिप्रेशनमध्ये जातो की काय अशी भीती सतावत होती. ख्रिस गेलने एका मुलाखतीत आरोप करताना सांगितलं की, पंजाब किंग्सने त्याचा अपमान केला. त्यावेळेस संघाचा प्रशिक्षक असलेल्या अनिल कुंबळेसोबत फोनवरून चर्चा केली होती. मानसिक तणावात असल्याचं सांगितलं होतं. गेलने सांगितलं की, कुंबळेसोबत बोलत असताना रडू कोसळलं होतं.

---

आंतरराष्ट्रीय मास्टर्स वूमन्स टेबल टेनिस स्पर्धा

## स्नेहल, शिवप्रिया, मंगल यांची चमकदार कामगिरी

**। गोवा । वृत्तसंस्था ।**

गोव्यात ५ ते ७ सप्टेंबरदरम्यान शी पॅडल आंतरराष्ट्रीय मास्टर्स वूमन्स टेबल टेनिस स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं होतं. या स्पर्धेत टेबल टेनिसमधील अनेक दिग्गज खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत विविध वयोगटातील खेळाडूंनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेत एकूण ५० जणांनी सहभाग घेतला होता. यात रोमानियाच्या आंतरराष्ट्रीय खेळाडूचाही समावेश होता.

भारतात झालेल्या या पहिल्या स्पर्धेत स्नेहल भोले, शिवप्रिया नाईक आणि मंगल सराफ यांनी विविध वयोगटात चमकदार कामगिरी केली. स्नेहल भोले, शिवप्रिया नाईक आणि मंगल सराफ यांनी अनुक्रमे ४०+, ५०+ आणि ६०+ वयोगटातील एकेरी विजेतेपद पटकावलं. स्नेहल भोले यांनी ४०+ इव्हेंटमध्ये मौसमी चॅटर्जी यांचा पराभव केला. तर शिवप्रिया नाईक यांनी ५०+ एकेरी स्पर्धेत त्रुप्ती माचवे यांच्यावर मात केली. मंगल सराफ या भारताच्या अनुभवी खेळाडूंपैकी एक आहेत. त्यांनी ६०+ वयोगटातील स्पर्धेत मास्टर्स वर्ल्ड चॅम्पियन मांटू मुर्मू यांचा पराभव केला. मौसमी चॅटर्जी, त्रुप्ती माचवे आणि मांटू मुर्मू या तिघींना उपविजेतपदावर समाधान मानावं लागलं. तसेच गायत्री मोहन आणि स्वाती झुबे या दोघी ४०+ वयोगटातील स्पर्धेत संयुक्तरित्या तिसऱ्या स्थानी राहिल्या.

---

# श्रावणी कोंडविलकरला 'रौप्य'

**। महाड । प्रतिनिधी ।**

चॅम्पियन्स कराटे क्लबच्या श्रावणी कोंडविलकरने श्रीलंकेत झालेल्या साऊथ एशियन कराटे चॅम्पियनशिप २०२५ मध्ये भारताचे प्रतिनिधित्व करताना रौप्य पदक पटकावले. तिच्या या कामगिरीने रायगड जिल्ह्यासह महाराष्ट्राचे आणि भारताचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल केले आहे.

श्रीलंका देशातील कोलंबो स्टेडियमवर कॅडेट ज्युनिअर अंडर २१ सिनियर साऊथ एशियन कराटे चॅम्पियनशिप २०२५ आतंरराष्ट्रीय कराटे स्पर्धा खेळवण्यात आल्या, यावेळेस जगातील ६ देश सहभागी झाले होते. ज्यामध्ये भारत, श्रीलंका, नेपाळ, भूतान, पाकिस्तान, बांगलादेश या देशांचा समावेश होता. या स्पर्धेत २५० कराटे स्पर्धक सहभागी झाले होते. अंतिम फेरीत श्रीलंका आणि भारत अशी



लढाईत श्रावणीने आपल्या उत्कृष्ट कौशल्याने व दमदार कामगिरीने स्पर्धेतील प्रतिस्पर्ध्यावर मात करत सामन्यात घवघवीत यश संपादन केले. श्रावणीने आंतरराष्ट्रीय एशियन कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत रौप्य पदक मिळविले असून, राज्यपातळीवर मुंबई, ठाणे, डोंबिवली, पुणे, सातारा, बारामती, उत्तराखंड, महाड अशा विभागीय स्तरावर एकूण सुवर्ण पदक ४० तर ८ रौप्य पदकांची कमाई केली. अवघ्या १४ वर्षांच्या वयात एकूण ४८ पदके प्राप्त करून यश मिळवणे अतुलनीय आहे. हे यश तिच्या मेहनतीसोबतच प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाचेही फळ आहे.

> **'श्रावणीचे यश संपूर्ण देशासाठी प्रेरणादायी आहे. तीने दाखवलेले कौशल्य आणि मेहनत हे देशातील इतर खेळाडूंनाही प्रोस्ताहन देतील.'**
> **- प्रसाद सावंत, मुख्य प्रशिक्षक, चॅम्पियन्स कराटे क्लब महाड**

---

## सिराजला 'प्लेअर ऑफ द मंथ' पुरस्कारासाठी नामांकन

**। दुबई । वृत्तसंस्था ।**

भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज याला ऑगस्ट महिन्याच्या आयसीसी 'प्लेअर ऑफ द मंथ' पुरस्कारासाठी नामांकन मिळाले आहे. त्याच्या व्यतिरिक्त न्यूझीलंडचा मॅट हेन्री आणि वेस्ट इंडिजचा जायडेन सील्स यांनाही नामांकन मिळाले आहे.

इंग्लंडविरुद्धच्या ओव्हल कसोटीत त्याच्या दमदार काम गिरीसाठी सिराजला हे नामांकन मिळाले आहे. त्याने शेवटच्या डावात ५ विकेट्स घेत भारताला ६ धावांनी रोमांचक विजय मिळवून दिला. या विजयासह, भारत २-१ ने पिछाडीवर असूनही मालिका बरोबरीत



आणण्यात यशस्वी झाला. या ५ सामन्यांच्या मालिकेत भारत आणि इंग्लंडमधील अनेक खेळाडू जखमी झाले होते, परंतु सिराज सलग ५ कसोटी सामन्यांमध्ये खेळला. एवढेच नाही तर २३ विकेट्स घेत तो सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने १८५.३ षटके गोलंदाजी केली.

---

भविष्याकडे लक्ष देत मोर्चेबांधणी; आशिया करंडक क्रिकेट स्पर्धा

# भारतीय क्रिकेट संघाची तयारी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

श्रेयस अय्यरला वगळल्याचे आश्चर्य, शुभमन गिलची निवड आणि थेट उपकर्णधार, पुरेशी विश्रांती मिळाली असतानाही इंग्लंड दौऱ्यातील अखेरच्या कसोटीतीतून जसप्रीत बुमराची विश्रांती, तोच बुमरा आशिया करंडक स्पर्धेसाठी सज्ज... प्रश्न निर्माण करणाऱ्या अशा सर्व घडामोडींचे एकच कारण, पुढील वर्षी होणारी टी-२० विश्वकरंडक स्पर्धा. भारतीय निवड समिती आणि संघ व्यवस्थापनाने याच दृष्टीने मोर्चेबांधणी सुरू केली आहे.

मागचा टी-२० विश्वचषक भारतीय संघाने जिंकला आणि कप्तान रोहित शर्मा, विराट कोहली आणि रवींद्र जडेजाने आंतरराष्ट्रीय



टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. निवड समितीने धाडसी निर्णय घेताना सूर्यकुमार यादवला भारतीय टी-२० संघाचे कर्णधार बनवले. आयपीएलमुळे भारतीय संघाला टी-२० क्रिकेटसाठी खेळाडूंचे भरपूर पर्याय उपलब्ध होत राहतात. मग असे पर्याय जे संधी मिळाली की थेट आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधे धमाका उडवतात. आयपीएल खेळून भारतीय खेळाडू टी-२० क्रिकेटसाठी अगदी परिपक्व बनलेले असतात, असे दिसून येते.

पहिला सामना नवख्या संयुक्त अरब अमिराती संघाबरोबर असला तरी भारतीय संघ अत्यंत मन लावून सराव करून सर्व शक्तीनिशी खेळायच्या तयारीत दिसतो आहे.

---

## ऋषभ पंत भारतात परतला

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय यष्टीरक्षक-फलंदाज ऋषभ पंत इंग्लंडहून भारतात परतला आहे. ऋषभ पंतला इंग्लंडविरुद्ध मँचेस्टरमध्ये खेळल्या गेलेल्या चौथ्या कसोटी सामन्यादरम्यान उजव्या पायाला दुखापत झाली होती. तेव्हापासून तो इंग्लंडमध्ये सतत उपचार घेत होता. ऋषभ पंतचा फिटनेस रिपोर्ट अद्याप पूर्णपणे समोर आलेला नसला तरी, ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या वेस्ट इंडिजविरुद्धच्या भारताच्या पुढील मालिकेत तो पुनरागमन करेल असे मानले जाते. जर ऋषभ पंत तोपर्यंत तंदुरुस्त झाला नाही, तर तो ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या व्हाईट-बॉल मालिकेत पुनरागमन करण्याची शक्यता आहे.

---

स्पर्धेत खेळाडूंसाठी एकूण सहा प्रकार | जगातील सर्वात कठीण स्पर्धा

# लडाख मॅरेथॉन लवकरच!

**। लडाख । वृत्तसंस्था ।**

लडाख मॅरेथॉन ही लेहमध्ये दरवर्षी होणारी लांब पल्ल्याच्या धावण्याची स्पर्धा आहे. २०१२ मध्ये सुरू झालेल्या या स्पर्धेत कठीण आव्हानांना सामोरं जावं लागतं. लडाखमधील खेळाडूंना स्वतःचे नाव कमावण्याची संधी देण्यासाठी सुरू झालेली ही स्पर्धा जागतिक पातळीवर आता चर्चेचा विषय ठरली आहे.

या मॅरेथॉन स्पर्धेत एकूण सहा प्रकार असून सर्व श्रेणीतील धावपटूंना, हौशींपासून ते जागतिक खेळाडूंपर्यंत प्रत्येकासाठी काहीतरी आहे. ५ किमी रन फॉर फन इव्हेंटपासून ते १२२ किमी अंतर कापणाऱ्या कठीण सिल्क रूट अल्ट्रा मॅरेथॉनपर्यंत शर्यतींचा समावेश आहे. त्यामुळे जगातील



सर्वात कठीण लांब पल्ल्याच्या शर्यतींपैकी एक आहे. या सहा शर्यती समुद्रसपाटीपासून ११,५०० ते १७,६१८ फूट उंचीवर पार पडतात. या वर्षी सिल्क रूट अल्ट्रा गुरुवार ११ सप्टेंबर रोजी सुरू होईल. दुसऱ्या दिवशी म्हणजेच १२ सप्टेंबर रोजी खारदुंगला चॅलेंज सुरू होईल. ४२.१९५ किमी मॅरेथॉन, हाफ मॅरेथॉन आणि ११.२ किमी स्पर्धा रविवार १४ सप्टेंबर रोजी होतील. रन लडाख फॉर फन ही सर्वात सोपी आणि सर्व वयोगटातील लोकांमध्ये सर्वात लोकप्रिय स्पर्धा १३ सप्टेंबर रोजी होईल. सिल्क रूट अल्ट्रा ही सर्वात आव्हानात्मक स्पर्धा आहे. समुद्रसपाटीपासून १०७०० फूट उंचीवर नुब्रा व्हॅलीमधील क्यागर येथे सुरू होते. पारंपारिक सिल्क रूटवरून १२२ किमी लांब आणि १७,६१८ फूट उंचीवर असलेल्या खारदुंगला खिंडीपर्यंत आहे. ही शर्यत समुद्रसपाटीपासून ११५६२ फूट उंचीवर लेहमध्ये संपते. अल्ट्रामॅरेथॉनमध्ये भाग घेणाऱ्या स्पर्धकाची वयोमर्यादा २० वर्षे निश्चित करण्यात आली आहे. सिल्क रूट अल्ट्रा मॅरेथॉनचे (१२२ किमी अंतर) नियम अधिक कडक आहेत. फक्त निवडक ८९सहभागींनाच परवानगी आहे आणि आव्हान स्वीकारणाऱ्यांनी मागील वर्षी सिल्क रूट अल्ट्रा किंवा २४ तासांच्या आत १०० मैलांची शर्यत किंवा १४ तासांच्या आत १०० किमीची शर्यत पूर्ण केलेली असावी. मागील आवृत्तीत १४ तासांच्या आत खारदुंगला चॅलेंज पूर्ण करणारे धावपटू देखील पात्र आहेत. त्यांच्यासाठी किमान वयाची अट २४ वर्षे आहे.

खारदुंगला चॅलेंज समुद्रसपाटीपासून १३,०९० फूट उंचीवर असलेल्या खारदुंगला गावातून सुरू होते आणि लेहपर्यंत ७२ किमी चालते. लडाख मॅरेथॉनच्या छत्राखालील या दोन अल्ट्रामॅरेथॉन सर्वात जास्त मागणी असलेल्या स्पर्धा आहेत.

---

## उस्मानची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती

**। लाहोर । वृत्तसंस्था ।**

पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज उस्मान शिनवारीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. त्याने २०१९ मध्ये शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळला होता. उस्मानने त्याच्या कारकिर्दीत तिन्ही फॉरमॅटमध्ये ३४ सामने खेळले. या गोलंदाजाने २०१३ मध्ये श्रीलंकेविरुद्ध टी२० मध्ये आंतरराष्ट्रीय पदार्पण केले. त्याने श्रीलंकेविरुद्ध एकदिवसीय आणि कसोटी पदार्पण केले. उस्मानने १७ एकदिवसीय आणि १६ टी-२० सामने खेळले. २०१९ मध्ये त्याने श्रीलंकेविरुद्ध एकमेव कसोटी सामना खेळला. २०१८ मध्ये झालेल्या आशिया कपमध्येही उस्मान पाकिस्तानी संघाचा भाग होता.

---

## भारत महिला हॉकी आशिया कपच्या सुपर-४ मध्ये

**। हांगझोउ । वृत्तसंस्था ।**

महिला हॉकी आशिया कपच्या सुपर-४ मध्ये भारताने आपले स्थान निश्चित केले आहे. शानदार कामगिरी करत सिंगापूरला १२-० ने हरवले. भारताकडून नवनीत कौर आणि मुमताजने हॅटट्रिक केली. नेहाने दोन गोल केले. तर लालरेमसियामी, उदिता, शर्मिला आणि ऋतुजा पिसाळ यांनी प्रत्येकी एक गोल केला. भारतीय संघ १० सप्टेंबर रोजी सुपर-४ सामन्यात पूल-ए मधील दुसऱ्या क्रमांकाच्या संघाशी सामना करेल.

संघाने ३ सामने खेळले, त्यापैकी २ जिंकले आणि १ बरोबरीत सोडवला. भारताने एकूण २५ गोल केले आणि फक्त २ गोल स्वीकारले, त्यामुळे



संघाचा गोल फरक +२३ होता. भारताने पूलमध्ये ७ गुणांसह स्थान मिळवले.

जपानने सुपर-४ साठी देखील पात्रता मिळवली. संघाने ३ पैकी २ सामने जिंकले आणि १ बरोबरी साधली. जपानने १७ गोल केले आणि फक्त २ गोल स्वीकारले, +१५ च्या गोल फरकाने संघ ७ गुणांसह दुसऱ्या स्थानावर राहिला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)